विकास समर्पित मासिक

ISSN-0971-8397

# योजना

विशेषांक

वर्ष ४४ अंक ३ पाने ७६ ऑक्टोबर २०१६ मूल्य ३० रु.



## ‘वस्त्रोद्योग’

भारतीय हस्तव्यवसायाची शाश्वतता
स्मृति इरानी

हातमाग: भूतकाळ, वर्तमान व भविष्य
जया जेटली

वस्त्रोद्योग क्षेत्रात रोजगार व सर्वसमावेशक विकासाच्या नव्या संधी
रश्मी वर्मा

वस्त्रोद्योग क्षेत्रातील कामगार कल्याण योजना
अजय तामता


(फोकस)
खादी : आधुनिक भारताच्या उभारणीसाठी मूलभूत ताकद
व्ही. के. सक्सेना

(विशेष लेख)
वस्त्रोद्योगाची व्यापकता
प्रकाश वासूदेवन

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केंद्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४४ ❖ ❖ अंक ३ ❖ ❖ ऑक्टोबर २०१६ ❖ ❖ मूल्य ३० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक ॲड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक ॲड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ■ भारतीय हस्तव्यवसायाची शाश्वतता | स्मृति इरानी | ५ |
| ■ हातमाग: भूतकाळ, वर्तमान व भविष्य | जया जेटली | ९ |
| ■ वस्त्रोद्योग क्षेत्रात रोजगार व सर्वसमावेशक विकासाच्या नव्या संधी | रश्मी वर्मा | १३ |
| ■ भारतीय वस्त्रोद्योग- जागतिक परिदृश्य | आर. के. दालमिया | २० |
| ■ कपड्यांच्या निर्यातीसाठी उपलब्ध असलेले उदयोन्मुख बाजार | अदिती दास रावत | २४ |
| ■ भारतीय ताग उद्योगाला चालना देण्याचे प्रयत्न | सुब्रत गुप्ता | ३१ |
| ■ वस्त्रोद्योगाची व्यापकता (विशेष लेख) | प्रकाश वासूदेवन | ३७ |
| ■ भारतीय कापड उद्योगाला चालना | डॉ. कविता गुप्ता | ४२ |
| ■ खादी : आधुनिक भारताच्या उभारणीसाठी मूलभूत ताकद (फोकस) | व्ही. के. सक्सेना | ४७ |
| ■ खादी: भारतीय स्वातंत्र्याचा मानबिंदू | ए. अन्नामलाई | ५१ |
| ■ वस्त्रोद्योग क्षेत्रातील कामगार कल्याण योजना | अजय तामता | ५५ |
| ■ महाराष्ट्रातील वस्त्रोद्योग : स्वरुप, व्याप्ती आणि आव्हाने | उज्ज्वल उके | ५९ |
| ■ महाराष्ट्रातील रेशीम उद्योग | एन.पी.एगलेवाड | ६५ |
| ■ महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगासाठी हमखास नगदी पिक : कापूस | डॉ. वैशाली जयंत जोशी | ७१ |


योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

संपादकीय

# धागा प्रगतीचा

वस्त्र किंवा कापड हे नुसते नाव घेतले तरी सुती, रेशमी, शिफॉन, लेस, आदी वस्त्रप्रावणांचे विविधरंगी मोहक प्रकार आपल्या नजरेसमोर तरळू लागतात. मोहेंजोदाडोकालीन रेखीव स्त्री असो की इजिप्तची क्लिओपात्रा असो की अगदी व्हिक्टोरीअन काळातील बॉल डान्सवेळी राणी किंवा राजकन्या घालत असलेला गाऊन असो- वस्त्रे ही नेहमीच आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग राहिली आहेत. कालपरत्वे कपड्यांच्या प्रकारात तेव्हढा बदल होत गेला. सुरुवातीच्या काळात नैसर्गिक धाग्यांपासून बनलेले सुती, ताग आणि रेशीम अशा कापडांचा वापर होई. विज्ञानाच्या प्रगतीसोबत त्यात रेयॉन, शिफॉन,आणि मलमल अशा कापडांची भर पडली.

आकर्षक रंग आणि कलाकुसरींमुळे भारतीय वस्त्रांना जगभर ओळख आहे. विविधतेने नटलेली संस्कृती आणि वस्त्र परंपरेतील वैविध्य यातील संबंध जसा भारतात पाहायला मिळतो तसा तो इतर कोणत्याही देशात आढळून येत नाही. राजस्थानची बंधानी, बंगालचा कांथा, गुजरातची तनचोई किंवा तामिळनाडूचे कांजीवरम ही त्याची काही उदाहरणे . यातील प्रत्येक वस्त्रावर स्थानिक संस्कृती आणि परंपरांचा ठसा आढळतो. बनारसी सिल्क, ओडिसा सिल्क, टस्सर, मूंगा आणि चंदेरी हे असे काही ब्रॅण्ड्स आहेत, जे जगभर ओळखले आणि नावाजले जातात.

सुती कापडाचे उत्पादन आणि वापराच्या बाबतीत भारत नेहमीच आघाडीवर राहिला आहे. ऐतिहासिकदृष्ट्या सुती कापड हे जनसामान्यांचे वस्त्र म्हणूनच ओळखले जाते. धोतर, कुर्ता, साडी किंवा लेहेंगा हे त्याचे काही प्रकार. कापसाचा मोठा उत्पादक देश असल्यामुळे भारतातील कापड उद्योग एके काळी इतका महत्वाचा आणि विशाल होता की, तत्कालीन ग्रेट ब्रिटनमधील वस्त्रोद्योगाला त्याचा धोका निर्माण झाला होता. त्यामुळेच ब्रिटिशांनी त्यांचा सुती कापडाचा उद्योग वाचविण्यासाठी भारतीय कापडाच्या जगभरातील निर्यातीवर आणि आपल्या देशातील विक्रीवर अनेक निर्बंध लादले. भारतीयांना ब्रिटनमध्ये निर्मित कपडे घेण्यासाठी बाध्य करण्यात आले. पारतंत्र्याविरुद्ध राष्ट्रीय चळवळ आकार घेण्यासाठी ब्रिटीशांची ही धोरणे अनेकार्थाने कारणीभूत ठरली. त्यातूनच पुढे स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणून खादीचा जन्म झाला.

नंतर हीच खादी मोठ्या जनसमूहाचे, विशेष करून ग्रामीण महिलांचे उदरनिर्वाहाचे साधन, उच्च वारशाचा अमूल्य ठेवा बनली. लक्षावधी लोकांना रोजगार पुरवण्याची खादीमध्ये असलेली क्षमता पाहून पंतप्रधानांनी अलीकडेच आपल्या 'मन की बात' कार्यक्रमात खादीचे एकतरी वस्त्र खरेदी करण्याचे आवाहन देशातील युवकांना केले. खादीचा धागा सर्वात स्वच्छ आणि शाश्वत प्रकारचा असून पर्यावरणीय दृष्ट्या हानीकारक असलेल्या आधुनिक सिंथेटिक धाग्यांना खादी सशक्त पर्याय उभी करू शकते. हातमाग हे असेच दुसरे पर्यावरणस्नेही क्षेत्र आहे. पंतप्रधानांनी म्हटल्याप्रमाणे पारंपरिक हातमाग उत्पादनांना आपण योग्य ते महत्त्व देऊन केवळ भारतच नव्हे तर जागतिक पातळीवर या उत्पादनांना फॅशनच्या केंद्रभागी आणायला हवे.

भारतीय रेशीम कापड अनेक वर्षांपासून जगभर प्रसिद्ध आहे. मोती आणि मसाल्याप्रमाणेच रेशमी कापड अनेक वर्षांपासून भारतातून निर्यात केले जाई. भारतीय रेशीम आणि मलमल या उत्पादनांना जगभर मागणी असे. अनेक वर्षांपर्यंत प्रामुख्याने पॅकेजिंगसाठी वापरला जाणाऱ्या तागाला आता फॅशन क्षेत्रातही चांगले दिवस आले आहेत. अभियांत्रिकी, वाहन उद्योग आणि वैद्यकीय क्षेत्रात वापर होणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या कपड्यांची बाजारपेठही आता विस्तारली आहे.

भारत वस्त्रांचे उत्पादन आणि निर्यात अशा दोन्ही क्षेत्रात जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारतात वस्त्रोद्योग रोजगार पुरविणारे कृषिनंतर दुसऱ्या क्रमांकाचे क्षेत्र आहे. या क्षेत्रात ४५ दशलक्ष लोकांना थेट तर ६० दसलक्षाहून अधिक भारतीयांना अप्रत्यक्षरित्या रोजगार उपलब्ध होतो. भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात वस्त्रोद्योगाचा चार टक्के इतका वाटा आहे. या क्षेत्रात गुंतलेले मनुष्यबळ आणि त्याचे महत्व जाणून या उद्योगातील कामगारांच्या आणि त्यांच्या कुटूंबियांच्या कल्याणासाठी सरकार विविध योजना राबवत आहे.

२०१५-१६ मध्ये जागतिक व्यापारात वस्त्रोद्योग क्षेत्राचा वाटा ५.६५ इतका होता तर भारताच्या एकूण निर्यातीमध्ये १४ टक्के हिस्सा या क्षेत्राचा राहिला. या उद्योगाचा विस्तार व्हावा यासाठी सरकार विविध उपाययोजना करीत आहे. त्यामुळे वस्त्रोद्योग हा भारतीय अर्थव्यस्थेचा एक प्रमुख घटक बनून तर राहीलच शिवाय निर्यातीचेही नव नवे उच्चांक गाठल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळेच वस्त्रोद्योगमध्ये सामान्य माणसाच्या जिव्हाळ्याची बाब असणारे 'रोटी कपडा और मकान' हे घटक पुरविण्याची पुरेपूर क्षमता आहे, असे म्हणावे लागेल.

■ ■ ■

# भारतीय हस्तव्यवसायाची शाश्वतता

स्मृति इरानी



**कृषी आणि पशुपालन व्यवसायातील ग्रामीण जमाती परंपरागतरित्या त्यांच्या हस्त कौशल्यावर व विणकाम कौशल्यावर उत्पन्नासाठी अवलंबून आहेत. मात्र हा जोडधंदा समजून ते हा उत्पन्नाचा दुय्यम स्त्रोत समजतात. अंदाजे, २३ दशलक्ष लोक विणकाम व हस्त व्यवसायात आजघडीला व्यस्त आहेत. मात्र हा समाज आर्थिक समुहाच्या उतरंडीमध्ये (फिनान्शिअल पिरॅमिड) तळाला आहे.**

भारतीय हस्तव्यवसाय आणि हातमाग उद्योग हा देशाच्या वैभवशाली सांस्कृतिक वारशाचा एक अविभाज्य भाग आहे. मात्र हा उद्योग असंघटित, विकेंद्रीत, आणि ग्रामीण हस्तकौशल्याच्या स्वरुपात आहे, जो ग्रामीण आणि निम शहरी हस्तकारागिरांना रोजगार उपलब्ध करुन देतो. त्याशिवाय हा उद्योग देशाच्या परकीय चलनामध्येही वाढ करतो. सोबत देशाच्या वैभवशाली आणि अद्वितीय सांस्कृतिक वारशाची जपणूक करतो.

कृषी आणि पशुपालन व्यवसायातील ग्रामीण जमाती परंपरागतरित्या त्यांच्या हस्त कौशल्यावर व विणकाम कौशल्यावर उत्पन्नासाठी अवलंबून आहेत. मात्र हा जोडधंदा समजून ते हा उत्पन्नाचा दुय्यम स्त्रोत समजतात. अंदाजे, २३ दशलक्ष लोक विणकाम व हस्त व्यवसायात आजघडीला व्यस्त आहेत. मात्र हा समाज आर्थिक समूहाच्या उतरंडीमध्ये (फिनान्शिअल पिरॅमिड) तळाला आहे. यांचे निर्यातीतील योगदान प्रकटपणे दिसते व ते वाखाणण्याजोगे आहे. भारतीय हस्तकौशल्याला जगभर मागणी आहे. उदाहरणार्थ, विकसित देश म्हणजेच अमेरिका, इग्लंड, सौदी, जर्मनी, फ्रान्स, लॅटीन अमेरिकन देश इटली,नेदरलँड्स , कॅनडा, ऑस्ट्रेलिया इ.इ. सांस्कृतिक पातळीवर सांगायचे झाल्यास आपल्या देशाला वर्षानुवर्षे लाभलेले वैभव व परंपरांचा सुगंध असलेले हस्तव्यवसाय व कौशल्याचे सौंदर्य सर्वदूर पसरवण्यात उपरोक्त देशांचे योगदान आहे.

स्वस्त श्रमिकांची मुबलक उपलब्धता, स्थानिक स्त्रोतांचा वापर, स्वस्त भांडवली गुंतवणूक आणि अद्वितीय आणि वैश्विक स्तरांवर प्रोत्साहन लाभलेले उद्योजक ही या उद्योगांची शक्तिस्थळे आहेत.या शक्तिस्थळांखेरीज, उद्योग समूहास निरनिराळ्या स्तरांवर अडचणींना तोंड द्यावे लागते. जसे की, अल्प साक्षरता व अल्प शैक्षणिक पातळी, आधुनिक तंत्रकौशल्यांचे निकृष्ट सादरीकरण, कच्च्या मालासाठी अपुरा भांडवलपुरवठा, कच्ची संस्थात्मक चौकट. हातमाग उद्योगांना सातत्याने यंत्रमाग आणि सिन्थेटिक कापडांच्या स्पर्धेस तोंड द्यावे लागते. आज, काच आणि मेलामाईन पर्यावरणीय दृष्ट्या सुरक्षित बनवले जातात. तर मातीची भांडी (कुल्हड, शिकोरा) तर काळाच्या पडद्याआड गेली आहेत.

इतक्या अडचणी असूनही, असा अंदाज वर्तवला जातो की, या क्षेत्रामध्ये वाढीसाठी वाव आहे.

हस्तव्यवसायांमध्ये गुंतवणूक करणे ही एक सोनेरी संधी आहे. ज्याद्वारा, ग्रामीण कुटुंबांच्या आर्थिक तसेच पर्यावरणीय आणि सामाजिक परिस्थितींमध्ये सुधार घडवू शकतो. हस्तकौशल्यांच्या जागतिक बाजारपेठेत अंदाज वर्तवल्यानुसार, उलाढाल ७०० अब्ज अमेरीकन डॉलर पर्यंत येत्या २०१९ पर्यंत झेपावणार आहे. आजमितीला भारताचा हिस्सा केवळ २% वा त्याहूनही कमी आहे. हा आकडाच संधीची वेळ असल्याचे खुणावतो. याचे प्राकृतिक फायदेही आहेतच. या व्यवसायामध्ये होणारी कार्बन निर्मिती ही अत्यंत नगण्य असते. शिवाय स्थानिक उपलब्ध मालाला, नैसर्गिक जैविक घटकांना प्रोत्साहन मिळते. ही तेथील स्थानिकांना रोजगार संधी असते. गृहीणी, अल्पकुशल स्त्रियांसाठी. ज्यायोगे त्यांना त्यांच्या कुटुंबात आणि समाजात मानाचे स्थान मिळवता येऊ शकते.

सारांश हाच की, स्थनिक गुणवत्ता हस्तव्यवसाय विकासाच्या कामात गुंतवल्यामुळे परंपरा जपली जाते, कारागिरांना उत्पन्न प्राप्त होते व या क्षेत्राला बळकटी मिळते.

हस्तव्यवसायात गुंतलेल्या कारागिरांना सातत्याने हे स्मरण द्यावे लागते व या बाबतीत जागरुक करावे लागते की, त्यांचे कौशल्य प्रशिक्षित असावे, अद्ययावत असावे शिवाय त्यांच्या निर्मित वस्तूंना बाजारपेठ मिळते की नाही, या बाबींकडेही लक्ष द्यावे लागते. याच कामात, वस्त्रोद्योग मंत्रालयाने जिल्हा हातमाग कार्यालयांतर्गत विणकाम सेवा केंद्रे उभारली आहेत. त्यांची ही कौशल्ये अद्ययावत करण्यात त्यांची क्षमतावृध्दी करण्यात, व उत्तम उत्पादन निर्मितीसाठी तांत्रिक सहाय्य देण्यात व विणकरांचे उत्पन्न कसे वाढेल या बाबींत महत्वाची भूमिका बजावतात. या विणकारांना नव्या डिझाइन्स (नक्षी), विणकाम पूर्व व पश्चात आणि विणकाम करते वेळी प्रशिक्षण पुरवतात. यामध्ये, तारांच्या गुंडाळया, हातमागावरील सूताचे ताणकाम,सूताचा आकार, रंगकाम, डॉबी जॅकॉर्ड आणि न्यूमाटिक विणकामाच्या पध्दती, संगणककृत नक्षीनमुने तयार करणे इ.चा समावेश असतो. ही केंद्रे बऱ्याच वेळा थेट बाजारपेठेत प्रवेश मिळावा म्हणून व्यापारी पेठा व प्रदर्शनांचे आयोजन करतात.

***हस्तकला ह्या नेहमीच समकालीन असाव्यात किंवा काळाशी मिळत्याजुळत्या असाव्यात. तसेच नागरी राहणीमानाला सुसंगत असाव्यात. भारतीय हस्तकलेचे ब्रँडींग होण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. नवी व्यवसाय मॉडेल्स सामाजिक आणि व्यावसायिक उद्दीष्ट्ये डोळयांसमोर ठेवून बनली जावीत. इंडिया हँडलूम ब्रँड हे पणन आणि ब्रँडिंग च्या संदर्भात उचलले गेलेले पहिले पाऊल आहे.***

'मेगा हँडलूम क्लस्टर्स' योजना ठराविक मालासाठी प्रसिध्द असलेल्या ठिकाणांच्या विकासासाठी आहेत. यासाठी ही केंद्रे कौशल्य विकास, नवनवीन नक्षीकामाचे नमुने विणकरांना पुरवतात, पायाभूत सोयीसुविधा आणि आरोग्यसेवा पुरवतात. ज्यायोगे बदलत्या बाजाराच्या मागण्यांना देश आणि आंतराष्ट्रीय पातळीवर पारखता येऊ शकेल. त्याच बरोबरीने हातमाग उद्योगांमध्ये गुंतलेल्या विणकरांचा जीवनमानाचा दर्जा उंचावू शकेल.

राष्ट्रीय हातमाग दिनाच्या (७ ऑगस्ट) निमित्ताने, वस्त्रोद्योग मंत्रालय आणि कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाने एक सामंजस्य करार केला. ज्याचा हेतू हातमाग क्षेत्रात कौशल्यांचा आणि उद्योजकतेचा विकास व्हायला हावा होता. या करारानुसार, दोन्ही मंत्रालये एकत्रितपणे, ज्ञानाची देवाण घेवाण, स्त्रोतांचा पुरेपूर वापर आणि संस्थात्मक मार्गांनी हातमाग उद्योग व विणकाम कौशल्यास प्रोत्साहित करतात.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे, हस्तकला ह्या नेहमीच समकालीन असाव्यात किंवा काळाशी मिळत्याजुळत्या असाव्यात. तसेच नागरी राहणीमानाला सुसंगत असाव्यात. भारतीय हस्तकलेचे ब्रँडींग होण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. नवी व्यवसाय मॉडेल्स सामाजिक आणि व्यावसायिक उद्दीष्ट्ये डोळयांसमोर ठेवून बनली जावीत. इंडिया हँडलूम ब्रँड हे पणन आणि ब्रँडिंग च्या संदर्भात उचलले गेलेले पहिले पाऊल आहे. याचे अनावरण ७ ऑगस्ट २०१५ रोजी माननीय पंतप्रधानांच्या हस्ते झाले. या उच्च प्रतीच्या हातमाग मालाच्या ब्रँडींगच्या अनुषंगाने महत्व मोठे आहे. शून्य त्रूटी आणि पर्यावरणस्नेही असे उत्पादन उच्चतम दर्जाची खात्री होय. कच्चामाल, प्रक्रिया, सौंदर्यवर्धन,

डिझाइन्स आणि इतर प्रमाणदर्शक पाहता उदा. सामाजिक आणि पर्यावरणीय संदर्भ पाहता एकूण निर्मिती ही दर्जेदार आहे.

दुसरे असे की, ग्राहकाचा चोखंदळपणा आणि प्राधान्यक्रमांनुसार मालाच्या रुपामध्ये बदल करावा लागतो, हे समजण्यासाठी कारागिरांना व्यावसायिक सल्ले मिळत नाहीत. हे लक्षात आल्यानंतर, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी(एन आय एफ टी) ने क्राफ्ट क्लस्टर इनिशिएटिव्ह अंतर्गत त्यांच्या विद्यार्थ्यांना मोकळीक दिली व पाठ्यक्रमात बदल केले. ज्यामुळे ते विद्यार्थी देशाच्या विविध भागांतील कलाकार व विणकरांबरोबर काम करतील. यामुळे होणारा फायदा असा की, या विद्यार्थ्यांना कारागिरांचे वा विणकरांचे प्रश्न व अडचणी समजतील. त्यांचे निराकरण करण्याहेतूने ते विद्यार्थी नक्षीकामाचे नवे नमुने, तंत्र आणि मटेरिअल यांच्या फायद्यांची विणकर व कारागिरांना ओळख करुन देतील. नव्या विपणन प्रणाली अंगिकारताना येणाऱ्या अडचणींशी त्यांची तोंडओळख होईल. एनआयएफटी चेन्नईने केरळमधील कोझीकोड गटाबरोबर (कोझीकोड गटात वाडकारा, कोईलँडी आणि कोझीकोड या गावांचा समावेश) सुमारे दोन पिढ्यांपासून चालत आलेले हातमाग आणि ऊरु बनवण्याचे काम केले.हातमाग क्षेत्रात सुमारे ३०सहकारी सोसायट्या काम करतात तर दुसरीकडे कारागिर ऊरु अर्थात परंपरागत बनवल्या जाणाऱ्या लाकडी होड्या बनवण्यात गुंतले आहेत.

कारागिरीसाठी लागणाऱ्या उत्तम दर्जाच्या मालाची सहज उपलब्धता आणि मालाला नियमित बाजारपेठ मिळण्यात सहजता आल्यास कामाचा दर्जा आणि वेतन या गोष्टी सुरळीत चालू राहतील. आज घडीला कारागिरास येणारा एक अडथळा म्हणजे थेट बाजारापेठेची अनुपलब्धता आणि शहरी बाजाराशी जवळीक नसणे. सामान्य कारागिर आणि गट (क्लस्टर) यांची बाजारपेठेशी संलग्नता बळकट व्हावयास हवी, यासाठी तंत्रज्ञानाची मदत होणे अपेक्षित आहे.

---

***हातमागावर बनवलेल्या वस्तूंना ई-कॉमर्सद्वारा प्रोत्साहन देणे ही वस्त्रोद्योग मंत्रालयासाठी प्राधान्यक्रमावरील बाब होय. या वस्तूंचे ई-कॉमर्सद्वारा अत्यंत पारदर्शकपणे आणि स्पर्धात्मक व योग्य रितीने विपणन होण्यासाठी विविध मंच आज उपलब्ध आहेत. अशा मंचावर न्याय मिळाल्याने, कारागिरांना अद्ययावत उपजीविकेचे साधन प्राप्त होईल व त्यांचे सबलीकरण शक्य होईल.***

---

हातमागावर बनवलेल्या वस्तूंना ई-कॉमर्सद्वारा प्रोत्साहन देणे ही वस्त्रोद्योग मंत्रालयासाठी प्राधान्यक्रमावरील बाब होय. या वस्तूंचे ई-कॉमर्सद्वारा अत्यंत पारदर्शकपणे आणि स्पर्धात्मक व योग्य रितीने विपणन होण्यासाठी विविध मंच आज उपलब्ध आहेत. अशा मंचावर न्याय मिळाल्याने, कारागिरांना अद्ययावत उपजीविकेचे साधन प्राप्त होईल व त्यांचे सबलीकरण शक्य होईल.

विविध क्षेत्राच्या सहभागातून हस्तकला क्षेत्राला लाभ होऊ शकतो. या कामी शासन, विविध वित्तीय संस्था, 'ना नफा' तत्वावर चालणाऱ्या संस्था यांचा उल्लेख करावा लागेल. त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रातील कौशल्यप्राप्त संस्था महत्वाची कामगिरी बजावू शकतात. विविध संस्थांच्या मार्फत पर्यावरणीय अनुषंगाने बांधणी करताना, कोण कोणती भुमिका बजावू शकेल हे अधोरेखित होईल. या करिता आसाम स्थित नॉर्थ इस्टर्न डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन चे 'अॅक्वा व्हिव्ज' हे उदाहरण प्रातिनिधीक ठरावे. या संस्थेने प्रदुषित पाण्यावर तयार होणाऱ्या एका प्रकारच्या वनस्पतीवर ज्या वर विविध रंगांची फुले येतात, त्यापासून विविध प्रकारच्या पिशव्या, गृहसजावट, तसेच इतर अनेक उपयुक्त अशा वस्तू तयार केल्या. शिवाय हा बारमाही उद्योग चालतो. अहमदाबाद येथील नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ डिझाइन या संस्थेच्या मागदर्शनाखाली, त्यांच्या कौशल्याचा आधार घेत ही संस्था कार्यरत आहे. थायलंड, मलेशिया नेपाळ या देशांबराबरच सातासमुद्रापलिकडे जपान वगैरे देशांमध्ये आपल्या उत्पादनांचा दबदबा त्यांनी निर्माण केला आहे. साहजिकच यामध्ये कार्यरत असलेल्या कारागिरांना याचा लाभ मिळत आहे.

भारतामध्ये हातमाग आणि हस्तकला व्यवसाय फार मोठ्या प्रमाणात विखुरलेला आहे तसेच त्यामध्ये मोठ्या प्रमाणात विविधता आहे. भौगोलिक संलग्नता, हवामानविषयक स्थिती, आपल्या प्राचिन परंपरा आदी बाबींचा विचार करता भारतातील विविध प्रांतात विविध प्रकारची लोकप्रिय उत्पादने तयार केली जातात.

यातील उल्हासित करणारी बाब अशी की, सुमारे १४३ फॅब्रिक्स आणि हस्तकला उत्पादनांना प्रादेशिक संकेतांची

(भौगोलिक संकेत) नोंदणी झालेली आहे.

या प्रादेशिक संकेतामध्ये मध्य भारतातील 'चंदेरी' जिचा इतिहास इ.स. १३०५ पासून नोंद केलेल्या आहे. त्याप्रमाणे उभ्या आडव्या रेशमी




तसेच सुती धाग्यांनी विणकाम केलेल्या राजस्थानातील बरान जिह्यातील, कैथुन गावातील 'कोराडोरिया' या विणकामाचीही प्रादेशिक नोंद झाली आहे.

अनोखे आणि अप्रतिम असे कपडयांचे प्रसिध्द प्रकार म्हणजे 'पोचमपली, 'कांजीवरम रेशम', 'श्रीकलाहस्ती कलामकारी', 'महेश्वर','कांथा' (हा प्रकार बंगालमध्ये प्रसिध्द असलेले अस्सल भारतीय वस्त्र) , जामदानी( शुध्द सुतीकापडाचा वस्त्रप्रकार), बलुचारी, आणि प्रसिध्द ओरिसा इकत. वर्षानुवर्षे हे प्रकार कौशल्यपूर्ण विणकामासाठी प्रसिध्द आहेत.

प्रादेशिक संकेत नोंदणी, विणकर आणि कारागिरांच्या बिरादरीचे पारंपारिक ज्ञान जतन करते. त्याच प्रमाणे त्यांना कायदेशीर संरक्षणही पुरवते व या कलेचा दुरुपयोग होऊ देत नाही. ही प्रादेशिक संकेत नोंदणी संयुक्त मक्तेदारीला प्रोत्साहन देते. ज्यामुळे विणकामाची कला आणि हस्तकला यांचे सांस्कृतिक वैभव जपले जाते.

दिवसेंदिवस यांत्रिक आणि एकसुरी बनत चाललेल्या जगात, भारताचे बहुपूर्ण हस्तकौशल्य, त्याबाबतचे तंत्र आणि पारंपारिक ज्ञान यांची शाश्वतता जपणे हे मोठे आव्हान ठरत आहे. योग्य ती किंमत मिळवण्यासाठी तसेच तयार मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी होणारी पायपीट पाहून कारागिरांच्या कुटुबांमधून ग्रामीण तरुण वर्ग परंपरागत हस्तकौशल्यापासून दुरावत चालला आहे.

जनतेला या हस्तकौशल्याविषयी महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. याकरिता कारागिरांच्या मुलांना शिक्षण, प्रशिक्षण, बाजारापेठेमध्ये हक्काचे स्थान आणि समाधानाने जगू शकतील, एवढा रोजगार त्यांच्या पदरी पडावा याकरिता आपल्याला कठोर परिश्रम करावे लागतील. ज्यामुळे त्यांची कुटुंबे आणि समाज पारंपारिक कला कौशल्याला प्रवाही ठेवू शकतील. परिणामी भारत हा जगाच्या इतिहासात कला आणि कौशल्यासाठी आपले मानाचे अद्वितीय स्थान कायम राखू शकेल.

■ ■ ■


*लेखिका केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री आहेत.*

email: mot_fb@nic.in,
minister.textile@gov.in


## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत,

हे नम्र आवाहन.

# हातमाग: भूतकाळ, वर्तमान व भविष्य

जया जेटली



**सातत्यामुळे भारतात हातमाग टिकून राहिला. धार्मिक व पवित्र सणांच्या निमित्ताने त्याला एक नैसर्गिक अर्थ मिळाला, व्यक्तीला ओळख मिळाली. प्रदेश व धर्म हे दुसरे कारण ठरले तर जाती व्यवस्थेच्या मर्यादांमुळे काही लोकांना या व्यवसायात रहावे लागले, कारण तो घराण्यातून चालत आलेला व्यवसाय होता. त्यांना इतर व्यवसाय करण्याची परवानगी नव्हती. काही विणकरांना विजयनगर व दक्षिण भारतातील राजांनी मदत केली, पण नंतर तसे फार घडले नाही.**

आपल्या देशात सर्जनशील हस्तकलेचे मोठे भांडार आहे. त्यात सौंदर्याचे आविष्कार तर आहेतच शिवाय मोठा वारसा आहे. आपण नेहमी कृत्रिम बाबीत अडकून पडतो व एकसाची असलेल्या इतर समकालीन संस्कृतीकडे आकर्षित होतो, पण आपण आपली सांस्कृतिक मुळे विसरलो आहोत व देशातील नवी परिस्थिती व वास्तवाचा भाग बनलो आहोत. आपल्या जुन्या परंपरा ही आपली खरी भारतीय म्हणून ओळख आहे, त्याच आपल्याला विश्वास देतात.

### अर्थ, ओळख व शैली

भारत हा नेहमी अध्यात्मिकतेसाठी प्रसिद्ध देश मानला जातो. भारतातील पोशाख हे प्रार्थना लिहिलेले, बौद्ध संदेश असलेले आहेत त्यामुळेच बौद्ध संदेश पूर्वेकडे गेला व रेशमी कपडे धार्मिक श्लोकांसह सोन्याच्या धाग्यात विणले जात. ते कपडे देवतांना दिले जात असत व राजेरजवाड्यांच्या अंगावरही शोभत असत. त्यात पवित्रतेचा भाव होता. सुखी वैवाहिक जीवनासाठी काठापदराची साडी हे प्रतीक होते. ओडिशातील इकात साड्यांवर पल्लवांची चित्रे व भजनेही होती. भारतात कुठल्याही कार्यक्रमात आशीर्वाद महत्वाचे मानले जातात. त्यात तरूण माणूस हाताने विणलेली साडी आईसाठी त्याच्या पहिल्या कमाईतून विकत घेत असे.त्यात आदर व कृतज्ञतेची भावना होती. विविध समुदायात संस्कृतीनुसार कपडे परिधान केले जातात, त्यात हाताने विणलेले कपडे महत्वाचे मानले जातात. त्यामुळे भारतीय कपडे हे वेगळे व अर्थपूर्ण ठरतात. दक्षिण अमेरिका, आफ्रिका, दक्षिण आशियातील अनेक वांशिक जमाती अजूनही अशी वस्त्रे तयार करतात व विशेष समारंभात ते वापरतात पण ते प्रमाण भारताइतके कुठेही नाही. पूर्व भारतात शालीचा वापर केला जातो. त्या विणलेल्या असतात, भारताच्या प्रत्येक भागात हातमाग व्यवसाय आहेत.

भारतात मुघल येण्यापूर्वी कपडे शिवले जात नसत, गुंडाळले जात असत, लुंगी, धोती, वेष्टी, अंगवस्त्रम, तुरबान, झगा, वेस्टकोट, शाली हे पुरूषांचे तर साडी, लुंगी, बुरखा, स्कार्फ, शाली महिला वापरत असत. मुघल राजांनी कलाकार आणले, त्यांच्यात शिंपी कामाची

कौशल्ये होती. पर्शियन शेरवानी, पायजमा, सलवार, कुर्ता, शरारा, लेहंगा मागणीनुसार विणले जाऊ लागले. तो उद्योग बनारसमध्ये सुरू झाला. बंगालमध्ये १४ व्या व १५ व्या शतकात युरोप व भारतातील राजदरबाऱ्यांसाठी वस्त्रे विणली जात असत. नंतर ब्रिटीशांच्या काळात यांत्रिकीकरण आले. मँचेस्टर व लँकेशायरच्या कापड गिरण्यांनी हातमाग विणकरांना धोक्यात आणले. त्यात कराचे अडथळे होते. त्यात मजबूत ते टिकले गरीब बाजूला पडले.स्पर्धा सुरू झाली त्यात हे घडले. यात जे पोशाख वाचले त्यात उशा त्यांचे अभ्रे, टॉवेल, कमरपट्टे, तुरबान, अर्धी लुंगी, बेडशीट हे सर्व पोशाख नसले तरी ते वाचले. लाल उपरणे, कर्नाटकातील थिगलरू आधिवासी युधीष्ठिराच्या आराधनेसाठी वापरत असलेले कपडे राहिले. काही प्रथाही त्यास कारणीभूत होत्या.

**सातत्य**

सातत्यामुळे भारतात तरीही हातमाग टिकून राहिला. धार्मिक व पवित्र सणांच्या निमित्ताने त्याला एक नैसर्गिक अर्थ मिळाला, व्यक्तीला ओळख मिळाली. प्रदेश व धर्म हे दुसरे कारण ठरले तर जाती व्यवस्थेच्या मर्यादांमुळे काही लोकांना या व्यवसायात रहावे लागले, कारण तो घराण्यातून चालत आलेला व्यवसाय होता. त्यांना इतर व्यवसाय करण्याची परवानगी नव्हती. काही विणकरांना विजयनगर व दक्षिण भारतातील राजांनी मदत केली पण नंतर तसे फार घडले नाही. ब्रिटनमधील कापडगिरण्यांनी या व्यवसायाला फटका दिला.

**ग्राहक**

भूतकाळाचे मूल्यमापन करताना त्या काळातील ग्राहकांचा विचार करावा लागेल. वरील उल्लेखांप्रमाणे काही वर्षांपूर्वी केवळ लपेटण्याचे कपडे होते. त्यांना आकार नव्हता. हातमागाचे कपडे केवळ गुंडाळले जात असत. ग्राहकांची सेवा हातमागाने केली. मुघलांनी कपडे शिवण्याची कला आणली. त्यामुळे उच्च वर्गातील लोक महागड्या कपड्यांकडे वळले. कनिष्ठ वर्गातील लोक नेहमीचे कपडे वापरत होते, विजार, चोळी व कुर्ता असे कपडे काही जण वापरत होते.

***राजाश्रयाचा अभाव व मुक्त बाजार संधी यामुळे जग बदलून गेले. तरी सरकारी हस्तक्षेपामुळे हातमाग टिकला व खादी जिवंत राहिली, निदान नाहीशी झाली नाही. कला व वस्त्रोद्योग खात्याने खासगी व संस्थात्मक भागीदारीतून वस्त्रोद्योग व खादीला वाचवण्याचे प्रयत्न केले.***

आज मध्यम वर्ग आयात कपडे वापरतो. ते वेगळ्या संस्कृतीच्या जीवनशैलीतील आहेत. त्यामुळे त्यांचा भारताच्या वस्त्रोद्योगाशी वारसा नाही. जागतिक फॅशनमध्ये हातमागाचा समावेश नाही. चमकते कृत्रिम धागे महत्वाचे आहेत. काही स्थानिक लोकांनी मात्र हातमाग परंपरा जपली आहे. पण आता सरकारच्या काही उपक्रमांनी हातमागाला प्रतिष्ठा येत आहे.

**स्वतंत्र भारतातील प्रशासन**

स्वातंत्र्यापूर्वी भारतातील बाजारपेठेवर ब्रिटनचे वर्चस्व होते, राज्यकर्त्यांनी निर्बंध लादले होते. कल्याण, विकास व मदत व्यवस्था सरकारने १९४७ नंतर सुरू केली. महात्मा गांधी यांनी खादीची चळवळ सुरू केली त्यानंतर कमलादेवी चट्टोपाध्याय व पुपुल जयकर यांनी हातमागाच्या पुनरूज्जीवनाचे प्रयत्न केले पण औद्योगिकीकरणामुळे कृत्रिम धाग्यांच्या कापडांना यंत्रमागाला महत्व आले. विणकर कमी होऊ लागले. बाजारपेठ, निर्यात किंवा अनुदाने यावर गंभीर पाहणी न करता उपाययोजना केल्या गेल्या. अनेक स्त्रोतातून नवीन माहिती उपलब्ध असताना त्याचा वापर केला गेला नाही. निधीचा अचूक वापर झाला नाही, त्यात पारदर्शकता नव्हती. लाभार्थी बाजूलाच राहिले व विणकरांची स्थिती सुधारली नाही. त्यांनी ते काम सोडून दिले रिक्षा चालवणे सुरू केले. दाणे विकणे सुरू केले. १९८० च्या मध्यावधीत यंत्रमाग वाढले पण ग्राहक शिक्षण झाले नाही. लोकांना वस्त्रांवरील अतिक्रमण कळले नाही, त्यामुळे हातमाग धोक्यात आला. सरकारनेही हातमागांना नीट उत्तेजन दिले नाही. खासगी क्षेत्रातील वस्त्रोद्योगांच्या जाहिराती मात्र झळकतच राहिल्या. त्यामुळे ते कपडे खेडी व शहरात सामाजिक व व्यावसायिक पातळीवर आले, हातमाग व वस्त्रोद्योग मागे पडला. त्याला उत्तेजन मिळाले नाही. कल्पनाशक्तीचा अभाव व निष्काळजीपणा यामुळे वस्त्रोद्योगास फटका बसला. राजाश्रयाचा अभाव व मुक्त बाजार संधी यामुळे जग बदलून गेले तरी सरकारी हस्तक्षेपामुळे हातमाग टिकला व खादी

जिवंत राहिली, निदान नाहीशी झाली नाही. कला व वस्त्रोद्योग खात्याने खासगी व संस्थात्मक भागीदारीतून वस्त्रोद्योग व खादीला वाचवण्याचे प्रयत्न केले, विश्वकर्मा प्रकल्पात १९८० मध्ये हातमाग व खादीची प्रदर्शने झाली. सरकारने ७०-८० च्या दशकात त्यात पुढाकार घेतला. नंतर दोन दशकात बाजारपेठ शक्तींनी हिसका दाखवला तरी हातमाग टिकून राहिला, कारण काही विपणन मंच कायम होते. फॅशन उद्योगातील काही घटकांनी त्याला हात दिला.

**सहायक प्रणालीतील नवीन दृष्टिकोन**

प्रशासकीय प्रणालीने नंतर हातमागासाठी प्रयत्न केले. हातमाग किंवा वस्त्रोद्योग हा काही दया दाखवण्याचा विषय नव्हता तर ती एक उद्योगसंधी होती. अनेक विकास योजना त्यासाठी बदलायला हव्या होत्या. स्वयंरोजगार स्वरूपाचा हा व्यवसाय असून त्याला मुद्रा कर्जातून अर्थपुरवठा कसा दिला जातो , स्टार्ट अप व स्कील इंडिया कार्यक्रमातून मदत मिळते हे आता लोकांना माहिती हवे. मनरेगातून विणकरांना फायदा झाला नाही, त्यांची कौशल्ये परत शिकवली गेली नाहीत. बँकांनाही आता प्रशिक्षणाची व संवेदनशीलतेची जाणीव करून देणे गरजेचे आहे. कौशल्ये टिकवणे अवघड असते. त्यासाठी मनरेगा, कौशल्य विकास व हातमाग अधिकाऱ्यांत समन्वय हवा. दर्जेदार धागे किफायतशीर दरात मिळवून देणे गरजेचे आहे. ताग, सेंद्रीय कापूस, लिनन या पर्यायी धाग्यांची माहिती असली पाहिजे. त्यात वस्त्रोद्योग व फॅशन डिझायनर नवीन प्रयोग करू शकतात. नवीन धागे व पोत हातमागासाठी तयार करता येतील. दोन वर्षे चांगले काम केले तर फॅशन शो व इतर कार्यक्रमातून या वस्त्रोद्योग व हातमागास फायदा होईल. नैसर्गिक कापड रंग कला प्रदूषण कमी करून पर्यावरणाचे संरक्षण करू शकते. जगात त्याला मागणी आहे. त्यातील टाकाऊ घटक हानिकारक नसतात त्यामुळे भारताच्या भवितव्यासाठी ते महत्वाचे आहे. देशात कपड्यांच्या नैसर्गिक रंगपद्धतींचे शिक्षण सुरू केले

***पर्वतीय व किनारी प्रदेशातील नैसर्गिक धागे आंतरराष्ट्रीय सहकार्यातून करता येतील. बांबू, केळी, अननस यांचे धागे उपयुक्त ठरतात. या नव्या साधनांना महत्व देऊन नवीन सेंद्रीय स्त्रोत आता विणकरांनी हातमाग क्षेत्रात आणले पाहिजेत. बाजारपेठ संधी यात वाढत आहेत. अमेझॉन, फ्लिपकार्ट, इंडीमार्ट या ऑनलाइन मंचावर हातमाग, हस्तवस्तू यांची विक्री करता येते.***

पाहिजे. पर्वतीय व किनारी प्रदेशातील नैसर्गिक धागे आंतरराष्ट्रीय सहकार्यातून तयार करता येतील. बांबू, केळी, अननस यांचे धागे उपयुक्त ठरतात. या नव्या साधनांना महत्व देऊन नवीन सेंद्रीय स्त्रोत आता विणकरांनी हातमाग क्षेत्रात आणले पाहिजेत. बाजारपेठ संधी यात वाढत आहेत. अमेझॉन, फ्लिपकार्ट, इंडीमार्ट या ऑनलाइन मंचावर हातमाग, हस्तवस्तू यांची विक्री करता येते. काही खासगी उद्योजक तेथे असे वेगळे हातमाग वस्त्र विकत आहेत. वेळेत माल देणे यात आवश्यक आहे. वस्त्रोद्योगकारांनी फेसबुक खाते चालवणे व संकेतस्थळ चालवणे असे उपक्रम सुरू केले आहेत. साध्या पण बुद्धीमान विणकरांना कागदोपत्री सोपस्कार करता येत नाहीत. पण ते वस्तू एका राज्यातून दुसरीकडे पाठवताना आवश्यक आहेत. जीएसटी येईपर्यंत वस्तू पाठवण्यात अडचणी आहेत. ती गुंतागुंत आता कमी होईल. सध्या कराची भीती, बाजारपेठेत वस्तू पोहोचवणे व बाजारपेठेत विस्तार या बाबी अडचणीच्या ठरत आहेत. देशांतर्गत बाजारपेठेत हातमागाची विक्री वाढली पाहिजे. त्यामुळे लोकांची क्रयशक्ती वाढून सांस्कृतिक आपलेपण जपले जाईल. बहुस्तरीय बाजारपेठा विकसित केल्या तर त्या हातमागाला उपयुक्त आहेत. हातमाग कपड्यांची निर्यातही झाली पाहिजे. एनजीओ म्हणजे स्वयंसेवी संस्था यात मदत करू शकतात. सरकारशी खुली, पारदर्शक भागीदारी करू शकतात. एनजीओंचे प्रस्ताव मागवून त्यातील काही चांगल्या बाबींचा वापर करता येईल. वास्तविकतेवर आधारित कार्यक्रम यात राबवता येतील. विणकर सेवा केंद्रे देशात १९८० मध्ये सुरू झाली ती आजही सुरू आहेत. स्थानिक पातळीवर त्यांचे काम चांगले असले तरी ते जगासमोर आले नाही. ही केंद्रे प्रदर्शने व विकास केंद्रांच्या माध्यमातून आणखी नाते विणकरांशी निर्माण करू शकतात. त्यात व्यवस्था सुधारण्याची आवश्यकता असून संघटित प्रयत्नांची त्यात गरज आहे. माहितीची देवाणघेवाण महत्वाची आहे. विणकरांना माहिती देण्यासाठी स्वतंत्र

अभ्यासाची गरज आहे. त्यातील क्षमता ओळखण्याची गरज आहे. काही चांगले विणकर त्यामुळे शिकाऊ विणकरांना प्रशिक्षण देऊ शकतील. त्यामुळे मागणी प्रमाणे पण चांगला पुरवठा करता येईल. या उद्योगाची कागदोपत्री नोंद आकर्षक पुस्तिकांच्या माध्यमातून व्हायला हवी. ऑनलाईन उद्योगात हातमागास प्रोत्साहन हवे. यात कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. त्यातूनच सध्याच्या विणकरांची कौशल्ये पुढे येऊन पद्धतशीर मार्गाने हा व्यवसाय पुढे नेता येईल. यात छायाचित्रण, अकाउंटिंग, शो विंडो प्रेझेंटेशन, प्रदर्शने, पॅकेजिंग यांचा उपयोग ऑनलाईन विक्रीत होईल, हातमागाचा विकास होईल.

**पुनरूज्जीवन**

आता हातमागाचे पुनरूज्जीवन सुरू झाले आहे. त्यात नैसर्गिकता असल्याने जागतिक उत्पादनांना ती स्पर्धा निर्माण करू शकतात. भारतातील हातमाग धागे व कला वेगळी व व्यक्तीगत आवडीची उत्पादने तयार करणारी आहे. त्यात परंपरा व वारसा आहे. त्यातून आर्थिक व इतर फायदे मिळतील. हातमागाशी एक सांस्कृतिकता निगडित आहे. समाजमाध्यमांचा वापर यात होत आहे.#Iwearhandlooms हा हॅशटॅग वस्त्रोद्योग मंत्रालयाने तयार केला आहे.#100 saris pact व इतर उपक्रमांना त्यामुळे उजाळा मिळणार आहे. नवीन ग्राहक हातमागास मिळणार आहेत. भारत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. त्यामुळे आपला देश जगात आकर्षण ठरला आहे. मेक इन इंडिया, स्कील इंडिया कार्यक्रमांमुळे भारत आता तिसऱ्या जगातील देश उरणार नाही तर समृद्ध वारसा व तात्विक परंपरा असलेला देश राहील त्याला आधुनिकतेची जोड आहे. जेवढी जास्त प्रसिद्धी मिळेल तेवढा हातमागाला फायदा होईल त्यात सुधारणा होईल. सर्जनशीलता व कलात्मकता वाढेल. हातमाग विणकरांना उत्तेजन दिले तर विकासाकडे वाटचाल करणाऱ्या भारताच्या आर्थिक प्रगतीत ते साक्षीदार ठरतील.

हातमागात क्षमता व संधी भरपूर आहे व समस्याही आहेत पण सर्जनशीलता टिकवणे त्याला प्रेरणा देणे आवश्यक आहे तरच भारताचा बहुस्तरीय वारसा कायम टिकेल. वेगळे कौशल्य,तंत्र जपले जाऊन ते जगापुढे येईल. अनेकांना रोजीरोटी मिळून विणकर समाजाचे सक्षमीकरण होईल.

■■■

*- लेखिका दस्तकारी हाट समितीच्या संस्थापक असून हातमाग आणि हस्तकला या क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत.*

email: dastkarihaat@gmail.com

## आगामी अंक

**नोव्हेंबर २०१६**
**'कर विषयक सुधारणा'**

## सूचना

वाचकांना विनंती आहे की, त्यांनी योजना मासिका संबंधीत अभिप्राय योजना कार्यालयः- 'बी' विंग, केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर - ४००६१४ या पत्त्यावर पाठवावे. अभिप्राय सूचनांचे नेहमीच स्वागत असेल.



# वस्त्रोद्योग क्षेत्रात रोजगार व सर्वसमावेशक विकासाच्या नव्या संधी

रश्मी वर्मा



**भारतातील वाढत्या कार्यसक्षम लोकसंख्येसाठी अधिकाधिक प्रमाणात नोकरीच्या संधी निर्माण करण्याचे मोठे आव्हान देशासमोर आहे. लोकसंख्येच्या विभाजनानुसार येणाऱ्या काळात भारत हा पूर्णपणे तरूणांचा देश असेल. उच्च शिक्षण व आधुनिक तंत्रज्ञानात निपुण होत चाललेल्या तरूणाईला आपल्या भावी जीवनात चांगल्या नोकरीच्या संधींची अपेक्षा आहे. सद्यस्थितीत उपलब्ध सर्व कार्यक्षेत्रांच्या कार्यकक्षा रूंदावत नेऊन नवनव्या रोजगारसंधी निर्माण करण्याच्या दृष्टीने भारत सरकार सकारात्मक प्रयत्न करित आहे.**

भारतातील वाढत्या कार्यसक्षम लोकसंख्येसाठी अधिकाधिक प्रमाणात नोकरीच्या संधी निर्माण करण्याचे मोठे आव्हान देशासमोर आहे. लोकसंख्येच्या विभाजनानुसार येणाऱ्या काळात भारत हा पूर्णपणे तरूणांचा देश असेल. उच्च शिक्षण व आधुनिक तंत्रज्ञानात निपुण होत चाललेल्या तरूणाईला आपल्या भावी जीवनात चांगल्या नोकरीच्या संधींची अपेक्षा आहे. सद्यस्थितीत उपलब्ध सर्व कार्यक्षेत्रांच्या कार्यकक्षा रूंदावत नेऊन नवनव्या रोजगारसंधी निर्माण करण्याच्या दृष्टीने भारत सरकार सकारात्मक प्रयत्न करित आहे.

परंपरागत काळापासून वस्त्रोद्योग व कापडनिर्मिती उद्योगाला भारताच्या अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान लाभलेले आहे. अगदी सुरूवातीच्या काळापासून ते आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळातही वस्त्रोद्योग क्षेत्राला नेहमीच मोठ्या संख्येने विशिष्ट कार्यकैशल्याच्या तसेच सर्वसामान्य कौशल्याच्या मनुष्यबळाची आवश्यकता वारंवार निर्माण होत राहिली आहे. काळानुरूप या उद्योगाचे स्वरूप विस्तारत गेले व त्यातूनच या क्षेत्रात नोकरीच्या नवनवीन संधींची भर पडली. म्हणूनच भारताला भेडसावणाऱ्या बेरोजगारीच्या प्रश्नावर वस्त्रोद्योगातील नोकरींच्या संधी उत्तम पर्याय ठरू शकते.

सद्यस्थितीत आर्थिक मंदीच्या सावटापासून भारताला कोणताही धोका किंवा आर्थिक नुकसान संभवत नाही. या प्राप्त परिस्थितीचा पूर्ण लाभ घेण्याच्या दृष्टीने सरकारने कापडउद्योग, वस्त्रनिर्मिती व तत्सम व्यवसायांसाठी विशेष आर्थिक योजना घोषित केल्या आहेत. तसेच सरकारतर्फे तरूणांना या क्षेत्रात काम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविध कौशल्यविकासासाठीही विशेष प्रशिक्षण कार्यक्रम व नवीन अभ्यासक्रमांची घोषणाही करण्यात आली आहे.

**वस्त्रोद्योग क्षेत्राच्या विकासासाठी सरकारने घेतलेले पुढाकाराचे पाऊल** संबंधीत नव्या योजना व ध्येयधोरणे इ. द्वारे देशाच्या वस्त्रोद्योग व कापडनिर्मिती क्षेत्राची व्याप्ती वाढण्याबरोबर या क्षेत्रात सर्व स्तरावर अधिक प्रमाणात नवीन रोजगाराच्या संधी तयार करणे, या वस्त्रोद्योग उत्पादनांची परदेशी निर्यात वृध्दींगत करून देशाच्या विविध स्तरांतील तत्सम व्यवसाय व उद्योगांचा विकास घडवून आणणे व त्यातून देशाच्या सामाजिक व आर्थिक व्यवस्थेला मजबूती देणे असा व्यापक उद्देश आहे.

आर्थिक मंदीच्या दूरगामी परिणामांनी जगातील बहुतांश देशांत नैराश्यमय परिस्थिती असतांना गेल्या काही वर्षांत सातत्याने ७ टक्के विकास दर कायम ठेवत भारतासारख्या काही मोजक्या देशांनी आर्थिक विकासाच्या दृष्टीने आशादायक वाटचाल केली आहे. असे असले तरिही, आर्थिक विकासाच्या तुलनेने जास्त वेगाने वाढणाऱ्या देशातील कार्यसक्षम लोकसंख्येसाठी अधिकाधिक प्रमाणात रोजगार व नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याची गरज असल्याची गंभीर चिंता देशाच्या धोरणकर्ते व राज्यकर्त्यांना लागून राहिली आहे. याबाबत उपाययोजना करण्याच्या संदर्भात आधुनिक जगाचा इतिहास पाहता असे लक्षात येते की, पूर्वी अशा प्रकारच्या परिस्थितीत अनेक देशांतील धोरणकर्त्यांनी अधिकाधिक लोकांना वस्त्रोद्योगक्षेत्रातून नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या होत्या. तसेच भारतातही औद्योगिक क्रांती होण्यापूर्वीच्या काळापासून ते आजतागायत देशात वस्त्रोद्योग क्षेत्राला अनुकूल असे वातावरण लाभले असून या उद्योगाद्वारे देशाच्या विविध स्तरांत रोजगारसंधी उपलब्ध करून देण्यास प्रचंड वाव आहे. हे महत्वाचे संदर्भ लक्षात घेऊन सरकारने देशासमोरील प्रमुख ध्येयधोरणांच्या पूर्ततेत वस्त्रोद्योग क्षेत्राचे विशेष स्थान मान्य केले आहे. त्यामुळे एकीकडे आजच्या घडीला संपूर्ण जग उद्भवलेल्या आर्थिक मंदीतून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करत असताना भारताने मात्र पुढील काही वर्षात उच्च विकासदर गाठण्याचे उद्दिष्ट निश्चित करून त्यानुषंगाने वस्त्रोद्योग व कापडनिर्मिती क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले आहे.

**भारतीय वस्त्रोद्योगातील चढ उतार:**

वस्त्रोद्योगाला भारताच्या आर्थिक, सांस्कृतिक व राजकिय इतिहासात विशेष स्थान आहे. या उद्योगातून देशाच्या आर्थिक विकासाची पायाभरणी झाली तसेच देशाच्या आधुनिक नागर संस्कृतीचा विकास व शहरीकरणाचा प्रारंभ वस्त्रोद्योगाच्या विस्तारातूनच झाल्याचे ऐतिहासिक संदर्भात आढळून येते. अनेक शतकांपासून भारत सूती कापड व तलम रेशमी वस्त्रांच्या निर्मिती व निर्यातीत अग्रणी देश होता. पण पारतंत्र्याच्या काळात ब्रिटीश राजवटीच्या अन्याय्य धोरणांमुळे भारताच्या वस्त्रनिर्मिती उद्योगाला उतरती कळा लागली. मात्र स्वातंत्र्याप्राप्तीनंतरच्या काळात पुन्हा वस्त्रोद्योग क्षेत्रानेच देशाच्या ग्रामीण भागातील लाखो कुटुंबांना आर्थिक आधार दिला. कारण या काळात ग्रामीण भागातून हजारोंच्या संख्येने कामगार देशाच्या प्रमुख शहरातील वस्त्रोद्योग गिरण्यांच्या परिसरात कायमस्वरूपी रोजगारासाठी स्थलांतरित झाले व देशात शहरीकरणाने जोर धरला. त्यानंतर १९९१ पासून देशाने स्वीकारलेल्या खुल्या आर्थिक धोरणाचा व शासनाच्या विशेष योजनांचा मोठा लाभ वस्त्रोद्योगाला मिळाला व या क्षेत्राची नव्याने भरभराट होऊ लागली. याच काळात अमेरिकन संयुक्त राज्ये व युरोपातील अनेक देशांत कापड निर्मितीचे मूल्य तुलनेने महाग झाल्यामुळे काही मोजक्या आशियायी देशांपैकी आर्थिक प्रगतीतून नव्याने उदयास येणाऱ्या भारतात मोठ्या संख्येने व तुलनेने कमी वेतनावर उपलब्ध असणारे मनुष्यबळ, मुबलक प्रमाणातील नैसर्गिक साधनसंपत्ती व अनुकूल आर्थिक धोरणांमुळे कापड निर्मिती उद्योगाचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला व वस्त्रनिर्मितीत भारत जगातील प्रमुख राष्ट्रांपैकी एक बनले. वस्त्रोद्योगासाठी आवश्यक असणारे नैसर्गिक कापूस पिक तसेच मानवनिर्मित कृत्रिम धाग्यांची मोठ्या प्रमाणावर उपलब्धता व प्रचंड संख्येने असलेले मनुष्यबळ या काही प्रमुख कारणांमुळे देशात वस्त्रोद्योगाची भरभराट झाली. विदेशी बाजारपेठांत भारतीय वस्त्राला मोठी मागणी आहेच परंतु त्याबरोबरीने देशांतर्गत बाजारपेठेतही देशी कापडाला प्रचंड मागणी आहे. त्यामुळे देशातील वस्त्रोद्योगाच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले मोठे आर्थिक पाठबळही देशाजवळ आहे. त्यामानाने आशियातील बांग्लादेश व व्हिएतनामसारख्या देशांतील वस्त्रोद्योग क्षेत्राच्या आर्थिक अस्तित्वाची भिस्त पूर्णपणे निर्यातीवर अवलंबून आहे. या सर्व अनुकूल परिस्थितींचा लाभ घेत गेल्या काही वर्षांपासून सातत्याने भारत कापड व पोषाख निर्मितीत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा निर्यातदार देश म्हणून नावारूपाला आला आहे. वस्त्रोद्योगातील भारताचे वार्षिक निर्यात उत्पन्न सुमारे ४० अब्ज अमेरिकन डॉलर म्हणजेच एकूण जागतिक व्यापाराच्या अंदाजे ५ टक्के एवढे आहे. तसेच देशाच्या २.३ ट्रीलिअन अमेरिकन डॉलर मूल्य एवढ्या वार्षिक सकल उत्पादनात सुमारे २ टक्के वाटा हा वस्त्रोद्योग क्षेत्राचा आहे, जे देशातील शेतीनंतर दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक रोजगार देणारे क्षेत्र आहे. याबरोबरच देशाच्या एकूण निर्यातीतील१३ टक्के योगदान वस्त्रोद्योगाचे असून या क्षेत्राचे वार्षिक औद्योगिक उत्पादन दहा टक्के एवढे आहे.

**भारताचे लोकसंख्यानिहाय विभाजन व रोजगारनिर्मितीची आवश्यकता:** लोकसंख्येच्या बाबतीत भारत जगात दुसऱ्या स्थानावर आहे. आज भारताची लोकसंख्या सुमारे १.२८ अब्ज एवढी आहे. त्यापैकी जवळजवळ ६६ टक्के म्हणजेच सुमारे ८५०

दशलक्ष लोक कार्यक्षम वयोगटातील आहेत. २०३० पर्यंत भारतातील कार्यसक्षम तरूण वयोगटातील लोकसंख्या सुमारे १६९ दशलक्षाने वाढेल असा अंदाज आहे. या कार्यक्षम मनुष्यबळाच्या जोरावर नजीकच्या काळात कामगार केंद्रित उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या उद्योगांत जगातील यशस्वी राष्ट्र म्हणून नावारूपाला येण्याची उत्तम संधी देशाला लाभली आहे. कार्यक्षम मनुष्यबळाचा देशाच्या आर्थिक विकासाला लाभ मिळवून देण्यासाठी सर्वप्रथम देशाचा आर्थिक विकासदर ८ ते १० टक्क्यांपर्यंत वाढवणे व त्याबरोबर दरमहा दशलक्ष या प्रमाणात नव्या रोजगारसंधी निर्माण करण्याची गरज आहे.

**वस्त्रोद्योग क्षेत्राची रोजगारनिर्मिती क्षमता:**

रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने वस्त्रोद्योग क्षेत्राला फार महत्वाचे स्थान आहे. आज सुमारे ५ कोटी लोक या क्षेत्रात थेट कार्यरत असून सुमारे ६.७ कोटी लोकांना वस्त्रोद्योगाशी संबंधीत इतर उद्योगांतून जसे कापूस व ताग निर्मिती, मेंढ्याचे संगोपन, व कापड यंत्रणा इ मार्फत रोजगार प्राप्त झालेला आहे.

*सारणी क्र. १ कापडउद्योग व पोषाख निर्मिती क्षेत्रातील अनुमानित रोजगारसंधी*

*(मूल्य दशलक्ष)*

| उद्योग क्षेत्र | मार्च २०११ (मागील वर्षात) | २०१७ (येणा-या काळात) | २०१५-१६ (चालू वर्षात) |
|---|---|---|---|
| कापूस / मानवनिर्मित धागा / सूत कापड / मिल सेक्टर (एसएसआय हातमाग आणि वीण युनिट विशेष समावेश) | १.४ | १.६१ | १.५८ |
| मानवनिर्मित धागे/ केसर सूत उद्योग (कापडपोत उद्योगासह) | ०.२४ | ०.२८ | ०.२७ |
| विकेंद्रित यंत्रमाग क्षेत्र | ५.०८ | ५.८४ | ५.७१ |
| हातमागक्षेत्र | ७ | ८.०५ | ७.८८ |
| विणकामक्षेत्र | ०.४५ | ०.५२ | ०.५१ |
| प्रक्रियाक्षेत्र | ०.४४ | ०.५१ | ०.५० |
| लोकरी उत्पादने | ३.२ | ३.६८ | ३.६० |
| तयार वस्त्रे | ११.२२ | १२.९ | १२.६२ |
| रेशमाच्या किड्यांची शेती | ७.७ | ८.८६ | ८.६७ |
| हस्तव्यवसाय | ८ | ९.२ | ९.०० |
| ताग उद्योग: | | | |
| **संघटित उद्योग** | ०.२६ | ०.३ | ०.२९ |
| विकेंद्रित ज्यूट उद्योग | ०.२ | ०.२३ | ०.२३ |
| | ४५.१९ | ५१.९७ | ५०.८४ |
| तत्सम उद्योग: | | | |
| कापूस: | | | |
| कापूस शेती | २० | २३ | २२.५० |
| कापूस वटणी व दाबणी | १.३ | १.५ | १.४७ |
| कापूस व्यापार | १९ | २१.८५ | २१.३८ |
| | ४०.३ | ४६.३५ | ४५.३४ |
| मेंढीपालन | २.८ | ३.२२ | ३.१५ |
| ताग शेती | १७ | १९.५५ | १९.१३ |
| वस्त्रनिर्मिती यंत्रणा व सामग्री | ०.१ | ०.१२ | ०.१२ |
| एकूण | ६०.२ | ६९.२३ | ६७.७३ |
| सर्वाची एकूण | १०५.४ | १२१.२ | ११८.५७ |

*स्त्रोत: भारत सरकारच्या बाराव्या पंचवार्षिक योजनेत सहभागी वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या कार्यकारी गटाच्या अहवालानुसार*

*सारणी क्र. २- वस्त्रोद्योग व कापडनिर्मिती क्षेत्राचे रोजगारनिर्मितीतील इतर उद्योगांच्या बरोबरीत असलेले योगदान*

| उत्पादन व निर्मिती क्षेत्र | स्थायी भांडवल ( मूल्य लक्ष) | रोजगार मिळालेल्या व्यक्तींची संख्या | रोजगारातील गुंतवणूक (मूल्य प्रति कोटी रूपये याप्रमाणे) |
|---|---|---|---|
| दुग्धोत्पादने | १२०३८६९ | १४५६०१ | १२ |
| शीतपेये | २६७५२४७ | १५८५०७ | ६ |
| फर वस्त्रांव्यतिरिक्त इतर परिधानपर वस्त्रे | १२८०५६४ | ७१३८३३ | ५६ |
| विणलेली वस्त्रे | १२६९१४१ | २६४२६१ | १९ |
| काग व कागदपासून बनलेली उत्पादने | ६४२५३६ | २४८५२९ | ३९ |
| रबर उत्पादने | २६६८५१२ | २१८७५४ | ८ |
| मूलभूत लोखंड व पोलाद | ४०९९९६६१ | ६५०६८० | २ |
| विजेवर चालणारी यंत्रणा | ४२११५४ | ७६६१९ | १८ |
| सर्वसामान्य वापराची यंत्रसामुग्री | ३४१७४५३ | ३३८९६४ | १० |
| मोटर व वाहने | ७०८८०२० | १७६५२३ | २ |

*स्त्रोत: देशातील एकुण उद्योग क्षेत्राच्या वार्षिक सर्वेक्षणाचा अहवाल (वर्ष २०१३-१४)*

सर्वसाधारणपणे नियमानुसार उभारलेल्या सुमारे एक कोटी रूपयांची गुंतवणूक असलेल्या संपूर्ण एकसंध कापडनिर्मिती उद्योगात ३० नव्या रोजगार संधी उपलब्ध होऊ शकतात. तर तयार वस्त्र निर्मितीच्या १ कोटी उत्पादनाच्या व्यवसायात ७० रोजगार संधी असतात. भारताच्या वस्त्र व कपडे उद्योगाच्या २०११-१२ च्या सर्वेक्षण अहवालानुसार एक कोटी गुंतवणूक असलेल्या पण लघु उद्योगात न मोडणाऱ्या कापडव्यवसायात ६८ ते १६९ रोजगार संधी उपलब्ध होत्या. या सांख्यिकी वरून हे स्पष्ट होते की तुलनेने कमी भांडवल असलेल्या वस्त्रोद्योगातही रोजगाराच्या बऱ्याच संधी आहेत.

**महिला व वंचितांच्या सर्वांगिण विकासात वस्त्रोद्योगक्षेत्राची भूमिका:**

वस्त्रोद्योग क्षेत्राने देशात रोजगारनिर्मितीबरोबरच सरकारच्या महिला सक्षमीकरण योजनांत महत्वाची भूमिका बजावली आहे. वस्त्रोद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या एकूण कामगारांमध्ये सुमारे ७० टक्के महिला आहेत. वस्त्रोद्योगातील प्राथमिक स्तरातील विविध कामांसाठी विशेष कौशल्य व शिक्षणाची गरज लागत नसल्यामुळे सर्वसामान्य महिलांप्रमाणे लाखो गरिब अशिक्षित व वंचित लोकांनाही वस्त्रनिर्मिती व त्यासंबंधी व्यवसायातून ३ ते ४ आठवड्यांच्या जुजबी प्रशिक्षणानंतर लगेचच नियमित काम व स्थिर वेतन लाभते. त्यामुळे मोठ्या संख्येने ग्रामीण भागात स्थिरावलेल्या भारतातील शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या असमानता असणाऱ्या लोकसमाजाकरिता नव्यारोजगारसंधी निर्माण करण्याबाबत प्रामुख्याने वस्त्रोद्योगावर लक्ष केंद्रित करणे स्वाभाविक ठरते.

**जागतिक व्यापारातील रचनात्मक घडामोडी:**

जागतिक व्यापारात वस्त्रोद्योग क्षेत्रात प्रथम क्रमांकावर गेली तीन दशके चीनने निर्विवाद वर्चस्व गाजवले आहे. गेली २० वर्षे धागे निर्मिती व तयार वस्त्र उत्पादनात चीनचा वाटा अबाधितपणे ४० टक्क्यांहून अधिक राहिला आहे. परंतु २००९ च्या आर्थिक संकटानंतर चीनचे या क्षेत्रातील अव्वल स्थान डळमळीत होऊ लागले. २००९ मध्ये चीनची वस्त्रव्यापारातील वाढ सरासरी १५ टक्के एवढी होती ती २०१४ मध्ये केवळ ४ टक्के इतकी मंदावली. चीनची व्यापार वृध्दीतील ही घट भविष्यातही उद्भवत राहिल असा अंदाज आहे. तसेच सद्यस्थितीत वस्त्रोद्योगातून जादा वेतनाची मागणी पूर्ण करण्याची क्षमता नसल्याने चीनने आपले लक्ष देशांतर्गत व्यापारावर केंद्रीत केले आहे. त्यामुळे आपसूकच जागतिक बाजारपेठेत चीनने रिक्त केलेली जागा भरून काढण्याची आयती संधी भारताला मिळू शकते.

**वस्त्रोद्योग व्यापारातील अपेक्षित वृध्दी:**

सध्याच्या परिस्थितीत अंदाजित निर्यातवृध्दी बरोबरच सर्वसामान्य

ग्राहकांच्या हातखर्चातील रक्कमेच्या प्रमाणातील वाढ व कपड्यांवर वारंवार खर्च करण्याचा ग्राहकांचा वाढता कल यांमुळे देशांतर्गत वस्त्र व्यापारातही झपाट्याने वाढ होत आहे. जागतिक व स्थानिक बाजारपेठांतील घडामोडींवरून मांडलेल्या अंदाजांनुसार भारतीय वस्त्र व कापड उद्योगाचा व्यापार येत्या दशकभराच्या कालावधीत ११९ अब्ज अमेरिकी डॉलर वरून ४०० अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंत मजल मारेल.

भारतीय वस्त्रोद्योगात स्पर्धात्मकता टिकवून ठेवण्यासाठी वस्त्रनिर्मिती व्यवसायासाठी विशेष योजनांची यादीही सरकारने नुकतेच प्रकाशित केली. यामध्ये उल्लेखित नव्या नियमांनुसार उत्पादकतेवरील निर्बंध कमी करण्यात आले असून निर्यात व रोजगारनिर्मिती वाढवणाऱ्या उद्योजकांना विशेष सवलत मिळण्याची तरतूद करण्यात आली आहे.

*सारणी क्र. ३: भारतीय वस्त्र व कापड उद्योगातील वृध्दीचे अंदाजपत्रक*

| | २०१५-१६ | २०२५-२६ | सीएजीआर |
|---|---|---|---|
| निर्यात | ४० अब्ज अमेरिकी डॉलर. | १५० अब्ज अमेरिकी डॉलर. | १४% |
| देशांतर्गत बाजारपेठ | ७९ अब्ज अमेरिकी डॉलर | २५० अब्ज अमेरिकी डॉलर | १२% |
| एकूण | ११९ अब्ज अमेरिकी डॉलर | ४०० अब्ज अमेरिकी डॉलर | १३% |

*स्त्रोत: वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत अंदाजपत्रकानुसार*

**रोजगारनिर्मिती व सर्वसमावेशक विकासधोरण:** वस्त्रोद्योग क्षेत्राची रोजगारनिर्मिती क्षमता व या क्षेत्रासाठी जागतिक बाजारपेठेत खुल्या झालेल्या नव्या संधी लक्षात घेऊन भारत सरकारने वस्त्रोद्योग क्षेत्राच्या विकासासाठी व या क्षेत्रात नोकरीच्या अधिकाधिक क्षमता पडताळण्यासाठी विशेष धोरण तयार केले आहे. सध्या राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांमध्ये या क्षेत्राला आवश्याक सर्व पायाभूत सुविधांची निर्मिती, तंत्रज्ञानातील सुधारणा व पारंपारिक कार्यपध्दतींचे उन्नयन करण्याबरोबरच या क्षेत्रातील नवीन संधींसाठी आवश्यक नैपुण्य व क्षमता विकसित करण्यासाठी कौशल्यविकास प्रशिक्षण उपक्रमांवर विशेष भर देण्यात आला आहे.

**कुशल मनुष्यबळ नैपुण्य प्रशिक्षण योजना:** येणाऱ्या वर्षांत रोजगारनिर्मितीच्या प्रक्रियेत झपाट्याने वाढ होणे अपरिहार्य ठरेल. यासाठी उत्पादन व निर्मिती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे आवश्यक असेल. उत्पादन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कुशल मनुष्यबळाची गरज असते. या गरजेच्या पूर्ततेसाठी व एकूणच रोजगारनिर्मितीच्या प्रक्रियेला चालना देण्यासाठी देशात अधिकाधिक कौशल्यविकासकार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत. वस्त्र व कापडनिर्मिती क्षेत्रात कुशल मनुष्यबळ विकासासाठी एकात्मिक कौशल्यविकास कार्यक्रम (Integrated Skill Development Scheme) राबवण्यात येत आहे. या कार्यक्रमाअंतर्गत तज्ञ मार्गदर्शनाबरोबरच देशाच्या विविध भागातील वस्त्रनिर्मिती प्रशिक्षण संस्थांना भेट देऊन विविध प्रक्रियांची प्रात्यक्षिके दाखवली जातात. सहभागी व्यक्तींना जास्तीतजास्त प्रमाणावर सर्व प्रक्रियांची योग्य माहिती मिळेल व प्रक्रिया प्रत्यक्ष करून पाहता येईल यावरही लक्ष दिले जाते. तसेच खाजगी क्षेत्रातील उद्योजक व राज्य सरकारांच्या संस्थांच्या सहभागातून

***देशासमोरील प्रमुख ध्येयधोरणांच्या पूर्ततेत वस्त्रोद्योग क्षेत्राचे विशेष स्थान मान्य केले गेले आहे. त्यामुळे एकीकडे आजच्या घडीला संपूर्ण जग उद्भवलेल्या आर्थिक मंदीतून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करत असताना भारताने मात्र पुढील काही वर्षात उच्च विकासदर गाठण्याचे उद्दिष्ट निश्चित करून त्यानुषंगाने वस्त्रोद्योग व कापडनिर्मिती क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले आहे.***

या कार्यक्रमांची व्याप्ती अधिकाधिक व्यवसाय पूरक करण्यावर भर दिला जातो. ताज्या आकडेवारीनुसार १ सप्टेंबर २०१६ पर्यंत सुमारे ७.७ लाख लोकांनी एकात्मिक कौशल्यविकास कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण घेतले असून त्यापैकी ५.०६ (६६ टक्के) लोकांना लगेचच या क्षेत्रात नोकरी मिळाली आहे. एकात्मिक कौशल्यविकास कार्यक्रमाद्वारे २०१६-१७ वर्षाअखेरीपर्यंत सुमारे १५ लाख कामगारांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे.

याशिवाय, वस्त्रोद्योगाशी संबंधित असंघटित क्षेत्रात हातमाग व हस्तोद्योग व हस्तकला क्षेत्रातील

कौशल्यविकासकार्यक्रमामार्फत त्या त्या व्यवसायांचे नैपुण्य प्रशिक्षण दिले जाते. राष्ट्रीय कौशल्यविकास अभियानाअंतर्गत प्रभावी व सर्वसमावेशक असा नैपुण्यविकास कार्यक्रम देशभरात नुकताच राबवण्यात आला. तसेच कापड आणि पोषाख क्षेत्रांसाठी दोन स्वतंत्र कौशल्य परिषदांची स्थापनाही करण्यात आली आहे.

**वस्त्रनिर्मिती क्षेत्राच्या विकासासाठी विशेष उपाययोजना:**

देशाच्या वस्त्रोद्योग क्षेत्राला विविध समस्यांनी घेरलेले आहे.या समस्यांमध्ये जागतिक बाजारापेठेत व्यापारप्रवेशाच्या असमान संधी, तुलनेने जास्त वेतन खर्च, उत्पादकतेच्या आड येणारे प्रतिबंधात्मक कामगार कायदे, गुंतवणूक व निर्यातीवर मिळणाऱ्या अपुऱ्या सवलती इ.चा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

या समस्यांच्या बेड्या मोडून वस्त्रोद्योग क्षेत्राला वृध्दिंगत करण्यासाठी सरकारने या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्पर्धात्मकता वाढीसाठी विशेष सवलतींची नुकतीच घोषणा केली. यामध्ये कापड उद्योगावरील व्यापारात सरकारकडून अतिरिक्त जकातीचा परतावा मिळणे, कामगार कायद्यांमधील सुधारणांनुसार ठराविक काळासाठी रोजगार, जादा कामाच्या मेहनतान्यात वाढ, व उत्पन्न कराच्या कलम ऐंशी जेजेएए तील नियमांत शिथिलता इ.चा समावेश आहे.

या क्षेत्रात नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पहिल्या तीन वर्षांच्या कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीचा पूर्ण १२ टक्के अधिभार सरकारतर्फे भरण्यात येणार आहे. ठराविक हंगामात रोजगार उपलब्ध करून देण्याच्या पध्दतीतून उद्योग तेजीच्या काळात वस्त्र क्षेत्रात श्रम पुरवठा आणि रोजगार वृद्धी होऊ शकेल., असा कयास आहे. याबरोबरच ठराविक काळासाठी रोजगारावर असणाऱ्या कर्मचा-यांना नियमित कर्मचाऱ्याप्रमाणे कामाच्या वेळा, वेतनात ठराविक मुदतीने वाढ व इतर कायदेशीर भत्ते इ. सर्व लाभ देउ करण्याचे ठरवण्यात आले आहे. प्रत्येक तिमाहीत अतिरिक्त कामाच्या वेळांचा मेहनताना ५० तासांवरून १०० तासांपर्यंत वाढवण्यात आल्यामुळे प्रत्येक कामगाराला अतिरिक्त वेतन मिळण्याची सोय झाली आहे. या सर्व उपाययोजनांमुळे वस्त्रोद्योग क्षेत्रात १ कोटी नव्या रोजगारसंधी निर्माण होण्याचा अंदाज आहे.

वस्त्रोद्योग क्षेत्रात कार्यकुशल मनुष्यबळ वाढवण्याच्या धोरणामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मितीची हमी निर्माण झाली आहे. यातूनच पुढे या क्षेत्रातील देशांतर्गत तसेच थेट परदेशी गुंतवणूकीचे प्रमाण वाढत जाईल. भारताच्या विद्यमान पंतप्रधांनांच्या भारताला जगातील प्रमुख उत्पादक राष्ट्र बनवण्याच्या संकल्पात वस्त्रोद्योगक्षेत्रातील वाढती उत्पादकता महत्वाची भूमिका बजावेल. नुकत्याच संपन्न झालेल्या 'ट्रान्सफॉर्मिंग इंडिया' या व्याख्यानमालेच्या उद्घाटनपर भाषणात सिंगापूरचे उपपंतप्रधान श्री. थार्मन शान्मुगुरात्नाम यांनी सांगितल्याप्रमाणे आजच्या घडीला भारत आर्थिक मंदीने घेरलेल्या जगातील सर्व प्रमुख राष्ट्रांसमोर देशभरात विखुरलेल्या

*सारणी क्र. ४: भारतीय वस्त्र व कापड उद्योगातील रोजगार योजना व त्यानसार रोजगार क्षमतेतील वृध्दीचे अंदाजपत्रक*

| उपाययोजना | प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारवृध्दी (एकांश लक्ष) |
|---|---|
| वस्त्रोद्योग क्षेत्रात स्पर्धात्मकता वाढविण्यासंबंधी केलेले उपाय | ९.७ |
| उत्पन्न करात ८० जेजेएए अंतर्गत सवलतीचे नवे सुधारित कलम | १२.२५ |
| वस्त्रनिर्मिती साठी अतिरिक्त टीयूएफएस | ९.५ |
| ३.६७% अतिरिक्त कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी लाभ | |
| कापड उद्योगावर सरकार कडून अतिरिक्त जकातीचा परतावा मिळणे | |
| कामगार कायदा सुधारणा | १.७५ |
| अपस्ट्रीम विभागांना ३५%रोजगार (सूत, फॅब्रिक आणि प्रक्रिया | १०.७ |
| अप्रत्यक्ष रोजगार (१:१.३) | ५६.४ |
| एकूण | १००.३ |

*स्त्रोत:वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत अंदाजपत्रकानुसार*

विविध क्षेत्रांत रोजगारनिर्मिती वाढवून मोठ्या प्रमाणावर सामाजिक स्थलांतर घडवून आणण्याबरोबर दिर्घकालीन ध्येयधोरणांची क्रमवारपणे पध्दतशीर अंमलबजावणी करण्याचा व देशात मोठ्या संख्येने उपलब्ध असलेल्या सामाजिक व मानवी भांडवलांचा योग्य विनिमय करण्याचा आदर्श घालून देत आहे. वस्त्रोद्योगाची उच्च निर्मिती क्षमता व त्यासाठी लागणाऱ्या कार्यकुशल मनुष्यबळाला वेळीच प्रशिक्षित करून देण्याच्या सरकारच्या प्रयत्नांतून याक्षेत्रातील रोजगार व व्यापारसंधींत वाढ होण्याबरोबरच व्यापक प्रमाणात देशाचा सर्वांगिण सामाजिक विकास सुध्दा साधला जाईल.

**ठळक मुद्दे :**

भारतातील वाढत्या कार्यसक्षम लोकसंख्येसाठी अधिकाधिक प्रमाणात नोकरीच्या संधी निर्माण करण्याचे मोठे आव्हान देशासमोर आहे. देशाच्या सुमारे १.२८ अब्ज लोकसंख्येपैकी जवळजवळ ६६ टक्के म्हणजेच सुमारे ८५० दशलक्ष लोक कार्यक्षम वयोगटातील आहेत. २०३० पर्यंत भारतातील कार्यसक्षम तरूण वयोगटातील लोकसंख्या सुमारे १६९ दशलक्षाने वाढण्याचा अंदाज आहे. या कार्यक्षम मनुष्यबळाच्या जोरावर नजीकच्या काळात कामगार केंद्रित उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या उद्योगांत जगातील यशस्वी राष्ट्र म्हणून नावारूपाला येण्याची उत्तम संधी देशाला लाभली आहे. भारताला भेडसावणाऱ्या बेरोजगारीच्या प्रश्नावर वस्त्रोद्योगातील नोकरींच्या संधी उत्तम पर्याय ठरू शकतात.

रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने वस्त्रोद्योग क्षेत्राला फार महत्वाचे स्थान आहे. परंपरागत काळापासून वस्त्रोद्योग व कापडनिर्मिती उद्योगाला भारताच्या अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान लाभलेले आहे. अगदी सुरूवातीच्या काळापासून ते आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळातही वस्त्रोद्योग क्षेत्राला नेहमीच मोठ्या संख्येने विशिष्ट कार्यकुशलतेच्या तसेच सर्वसामान्य कौशल्याच्या मनुष्यबळाची आवश्यकता भासलेली आहे. आज सुमारे ५ कोटी लोक या क्षेत्रात थेट कार्यरत असून सुमारे ६.७ कोटी लोकांना वस्त्रोद्योगाशी संबंधीत इतर उद्योगांतून जसे कापूस व ताग निर्मिती, मेंढ्याचे संगोपन, व कापड यंत्रणा इ मार्फत रोजगार प्राप्त झालेला आहे. वस्त्रोद्योग क्षेत्राने देशात रोजगारनिर्मितीबरोबरच सरकारच्या महिला व वंचितांच्या सक्षमीकरण योजनांतही महत्वाची भूमिका बजावली आहे. वस्त्रोद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या एकूण कामगारांमध्ये सुमारे ७० टक्के महिला आहेत. वस्त्रोद्योगातील प्राथमिक स्तरातील विविध कामांसाठी विशेष कौशल्य व शिक्षणाची गरज लागत नसल्यामुळे सर्वसामान्य महिलांप्रमाणे लाखो गरिब अशिक्षित व वंचित लोकांनाही या क्षेत्राने मोठ्या संख्येने नियमित काम व स्थिर वेतन उपलब्ध करून दिले आहे.

देशात एकूणच रोजगारनिर्मितीच्या प्रक्रियेला चालना देण्यासाठी अधिकाधिक कौशल्यविकास कार्यक्रम राबवण्यात येत आहे. वस्त्र व कापडनिर्मिती क्षेत्रात कुशल मनुष्यबळ विकासासाठी एकात्मिक कौशल्यविकास कार्यक्रम (Integrated Skill Development Scheme) राबवण्यात येत आहे. १ सप्टेंबर २०१६ पर्यंत सुमारे ७.७ लाख लोकांनी एकात्मिक कौशल्यविकास कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण घेतले असून त्यापैकी ५.०६ (६६ टक्के) लोकांना लगेचच या क्षेत्रात नोकरी मिळाली आहे. एकात्मिक कौशल्यविकास कार्यक्रमाद्वारे २०१६-१७ वर्षाअखेरीपर्यंत सुमारे १५ लाख कामगारांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. तसेच विविध नव्या उपाययोजनांतून वस्त्रोद्योग क्षेत्रात १ कोटी नव्या रोजगारसंधी निर्माण होण्याचा अंदाज आहे.

गेल्या काही वर्षांपासून सातत्याने भारत कापड व पोषाख निर्मितीत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा निर्यातदार देश म्हणून नावारूपाला आला आहे. वस्त्रोद्योगातील भारताची वार्षिक निर्यात उत्पन्न सुमारे ४० अब्ज अमेरिकन डॉलर म्हणजेच एकूण जागतिक व्यापाराच्या अंदाजे ५ टक्के एवढी आहे. तसेच देशाच्या २.३ ट्रीलिअन अमेरिकन डॉलर मूल्याच्या वार्षिक सकल उत्पादनात सुमारे २ टक्के वाटा हा वस्त्रोद्योग क्षेत्राचा आहे, जे देशातील शेतीनंतर दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक रोजगार देणारे क्षेत्र आहे. याबरोबरच देशाच्या एकूण निर्यातीतील१३ टक्के योगदान वस्त्रोद्योगाचे असून या क्षेत्राचे वार्षिक औद्योगिक उत्पादन दहा टक्के एवढे आहे. गेल्या काही वर्षांतील जागतिक व स्थानिक बाजारपेठांतील घडामोडींवरून मांडलेल्या अंदाजांनुसार भारतीय वस्त्र व कापड उद्योगाचा व्यापार येत्या दशकभरात११९ अब्ज अमेरिकी डॉलर वरून ४०० अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंत मजल मारेल.

■■■

*लेखिका भारत सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयात सचीवपदी कार्यरत आहेत.*
email: secy-textiles@nic.in

# भारतीय वस्त्रोद्योग- जागतिक परिदृश्य

आर. के. दालमिया



**२०१५ मध्ये जागतिक व्यापाराच्या आकारमानात अतिशय सावकाश वाढ झाली. ही वाढ अतिशय तुटपुंजी असली तरी २.७ टक्के इतकी धन क्षेत्रातील वाढ विशेष करून जागतिक २.४ टक्के या विकासदराला अनुसरून होती. जागतिक व्यापार संघटनेच्या अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या (जुलै २०१६) अहवालानुसार या धीम्या गतीला अनेक घटक कारणीभूत आहेत.**

जागतिक पातळीवर आर्थिक मंदीच्या स्थितीतील सुधारणा प्रक्रिया सुरू असली तरी ही प्रक्रिया अतिशय धीम्या आणि फारच सावधगिरीने सुरू आहे. २०१५ मध्ये जागतिक व्यापाराच्या आकारमानात अतिशय सावकाश वाढ झाली. ही वाढ अतिशय तुटपुंजी असली तरी २.७ टक्के इतकी धन क्षेत्रातील वाढ विशेष करून जागतिक २.४ टक्के या विकासदराला अनुसरून होती. जागतिक व्यापार संघटनेच्या अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या (जुलै २०१६) अहवालानुसार या धीम्या गतीला अनेक घटक कारणीभूत आहेत. त्यामध्ये चीनमधील आर्थिक मंदी, महाकाय अर्थव्यवस्थांमध्ये आलेली अतिशय तीव्र स्वरूपाची मंदी, खनिज तेल आणि इतर वस्तूंच्या सातत्याने घसरणाऱ्या किमती आणि विनिमय दरांमध्ये सातत्याने होणारे चढउतार यांचा समावेश आहे. सध्याच्या जागतिक व्यापाराच्या स्थितीकडे पाहता, जागतिक व्यापार संघटनेच्या अहवालानुसार केवळ काही ठराविक उदयोन्मुख स्वरूपांचा उल्लेख करणे योग्य ठरेल.सर्वप्रथम व्यापार वाढीच्या डॉलरमधील मूल्यात घट झाली असली तरी आकारमानातील वाढ स्थिर राहिली आहे आणि प्रत्यक्षात त्यात वाढीची नोंद झाली आहे. दुसरी बाब म्हणजे वस्तू व्यापारातील घट आणि तयार वस्तूंच्या व्यापारातील वाढ अशा प्रकारची एकंदर व्यापाराची रचना निर्माण झाली आहे. तिसरी बाब म्हणजे पुरवठ्याच्या दिशेने ''फॅक्टरी एशिया''च्या योगदानात आशियातील मागणीचे(२०११-१३ या काळात ज्यामुळे विकासाला गती मिळाली होती) अमेरिका/युरोपकडे झालेल्या स्थानांतरणाचे देखील व्यापारात झालेल्या किरकोळ वाढीमध्ये योगदान आहे. मात्र, २०१५ मध्ये झालेल्या धन क्षेत्रातील वाढीमुळे जागतिक आर्थिक विकासाच्या भवितव्यावर विपरित परिणाम झाला. जागतिक व्यापाराचे मूल्य २०१५ मध्ये -१३% घसरून १६ ट्रिलियन अमेरिकी डॉलर झाले. मुख्यत: निर्यातीच्या दरातील घसरणीमुळे हा परिणाम झाला. मंदीच्या काळात जागतिक बाजारपेठेत विविध क्षेत्रातील मागणी ठप्प राहिली असताना भारताच्या वस्त्रोद्योग क्षेत्रात २०१६ या आर्थिक वर्षात १ टक्के वाढ झाली. कदाचित ही वाढ सर्वोत्तम वाढीच्या तुलनेत सामान्य वाटू शकते पण याच काळात जागतिक वस्त्रोद्योग क्षेत्रात ५ टक्के घट झालेली असताना त्या

तुलनेत ही वाढ सर्वोत्तम म्हणावी लागेल.

**वस्त्रोद्योग व्यापार: भारत आणि जग**

भारतीय वस्त्रोद्योग आणि वस्त्रप्रावरणे उद्योग भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा राहिला आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात याचे योगदान ४ टक्के असून, या उद्योगांच्या माध्यमातून २१ टक्के रोजगारांची निर्मिती होत आहे आणि औद्योगिक उत्पादनात १४ टक्क्यांची भर पडत आहे, उत्पादित मालापैकी १/३ उत्पादनाची निर्यात केली जात आहे. त्यामुळे परकीय चलनात १२ टक्क्यांची भर पडून या क्षेत्राकडे गेल्या १५ वर्षांत सुमारे ३ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित झाली आहे आणि १ कोटी रोजगार निर्माण झाले आहेत. हा उद्योग मुख्यत्वे कापूस आधारित(६५ टक्क्यांच्या वर) आहे.

वस्त्रोद्योग आणि वस्त्रप्रावरणे या क्षेत्रातील जागतिक व्यापार २०१५ मध्ये अंदाजे ७४५ अब्ज डॉलर होता आणि येत्या काही वर्षात तो ६ टक्के सीएजीआर या दराने वाढण्याची आणि २०२० पर्यंत ११२० अब्ज डॉलरपर्यंत जाण्याची अपेक्षा आहे. यामध्ये सर्वात मोठा वाटा वस्त्रप्रावरणांचा, त्याखालोखाल तयार कपडे, कापड आणि सूत यांचा असेल. जगभरात वस्त्रोद्योग क्षेत्रात १७ कोटी लोकांना रोजगार उपलब्ध झाला असून त्यामध्ये सर्वात जास्त रोजगार आशिया खंडात आहेत.

२०११-२०१५ या पाच वर्षांच्याकाळात टी एन्ड सी क्षेत्रात मूल्याच्या आधारे सीएजीआरच्या ०.५४ टक्के वाढ झाली आहे. २००८-२००९ या वर्षातील आर्थिक संकटानंतर आणि २०१४ पर्यंत, आशियाने इतर कोणत्याही प्रदेशापेक्षा या आर्थिक संकटातील पुनरुज्जीवन प्रक्रियेमध्ये सर्वाधिक योगदान दिले आहे. मात्र, २०१५ मध्ये चीन आणि इतर आशियायी अर्थव्यवस्थांमध्ये आलेल्या मंदीमुळे जागतिक आयातीवर त्याचा प्रादेशिक परिणाम अतिशय साधारण राहिला.

वस्त्रांचे आणि वस्त्रप्रावरणांच्या सर्वात मोठ्या दहा पुरवठादारांनी जानेवारी ते डिसेंबर २०१५ या काळात ५२५.३८ अब्ज डॉलर मूल्याच्या मालाची सुमारे ७०.५३ टक्क्यांची निर्यात केली.

२०१५ मध्ये भारताने वस्त्र आणि तयार कपड्यांच्या निर्यातीमध्ये ३७.२२ अब्ज डॉलरची पातळी गाठली. हे प्रमाण जागतिक व्यापाराच्या ५ टक्के असण्याचा अंदाज आहे.

***जानेवारी ते डिसेंबर २०१५ या काळात २०.०५ अब्ज डॉलरची वस्त्रोत्पादनांची निर्यात करून जागतिक व्यापारात ६.२८ टक्के वाट्यासह जगामध्ये चीननंतर भारत सर्वात मोठा दुसऱ्या क्रमांकाचा निर्यातदार राहिला आहे. २०१५ मध्ये २.८८ अब्ज मूल्याच्या मालाची निर्यात करून युरोपीय संघामध्ये(२८) ९.०५ टक्यांसह भारताने तिस-या क्रमांकाचे योगदान दिले आहे.***

वस्त्र उद्योगातील सर्वात मोठ्या दहा पुरवठादारांनी जानेवारी ते डिसेंबर २०१५ या काळात ३१९.३५ अब्ज डॉलर मूल्याच्या मालाची निर्यात केली. हे प्रमाण ७१.२१ टक्के होते आणि यामध्ये २९.०१ अब्ज डॉलर निर्यातीसह सर्वात मोठा निर्यातदार अमेरिका होता.

जानेवारी ते डिसेंबर २०१५ या काळात २०.०५ अब्ज डॉलरची वस्त्रोत्पादनांची निर्यात करून जागतिक व्यापारात ६.२८ टक्के वाट्यासह जगामध्ये चीननंतर भारत सर्वात मोठा दुसऱ्या क्रमांकाचा निर्यातदार राहिला आहे. २०१५ मध्ये २.८८ अब्ज मूल्याच्या मालाची निर्यात करून युरोपीय संघामध्ये(२८) ९.०५ टक्यांसह भारताने तिसऱ्या क्रमांकाचे योगदान दिले आहे.

ज्यावेळी बरेच देश वस्त्रोद्योगाच्या आयातीमध्ये ऋण क्षेत्रातील वाढ नोंदवत होते त्या वेळी व्हिएतनामने १९.१६ अब्ज डॉलर मूल्याच्या वस्त्रोत्पादनांची आयात करत सर्वाधिक ५.४७ टक्के वाढीची नोंद केली. त्यापाठोपाठ बांगलादेश ८.९४ अब्ज डॉलर मूल्याच्या मालाची आयात करत ५.४५ टक्के वाढीसह दुसऱ्या क्रमांकावर राहिला.

या काळात भारताने १८.६४ डॉलर मूल्याच्या वस्त्रोत्पादनांची (सर्व तंतू) आणि ११.१३ अब्ज मूल्याच्या सुती वस्त्रोत्पादनांची निर्यात केली. भारतीय सुती वस्त्रोद्योगामध्ये सुती तयार कपड्यांचे ४६.०९ टक्के वाट्यासह वर्चस्व राहिले. त्या खालोखाल कापसाचे सूत (३४.०५ टक्के) आणि सुती कापड (१९.८६ टक्के) यांचा वाटा राहिला.

गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय सुती कापड उद्योगाची वाढ आश्वासक विकास दरासह खूपच चांगली राखण्यात यश आले आहे. औद्योगिक उत्पादनात त्याचा वाटा १४ टक्के तर भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात ४ टक्के आहे. निर्यातीच्या प्राप्तीमध्ये १३ टक्के वाटा या उद्योगाचा

आहे. या उद्योगामुळे साडेचार कोटी लोकांना थेट रोजगार उपलब्ध झाला आहे तर ६ कोटी लोकांना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होत आहेत.

२०१५-१६ या आर्थिक वर्षात या उद्योगाला जागतिक मंदीशी, कापसासारख्या कच्या मालाच्या दरांमधल्या चढ उतारांशी, ऊर्जा व इंधन यांच्यासारख्या संसाधनांचे चढे दर आणि मालाची ने-आण आणि आर्थिक व्यवहारांमधील पायाभूत सुविधांशी संबंधित विविध आव्हानांना तोंड द्यावे लागले.

या टप्प्यात बांगलादेश, व्हिएतनाम आणि कंबोडिया यांसारख्या या क्षेत्रातील स्पर्धक देशांमधील वस्त्रनिर्मिती व्यवहारांचे ''वस्त्रनिर्मिती केंद्र'' म्हणून एकीकरण झाले आणि युरोपीय संघ, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया यांसारख्या विकसित देशांनी त्यांना प्राधान्याचे दर प्रदान केल्यामुळे त्यांच्या निरंतर विकासाची प्रक्रिया पाहायला मिळाली. त्यांना मिळालेल्या या सवलतीमुळे अनेक वस्त्रप्रावरणे/ कापड यांतील जिन्नसांच्या बाजारपेठेतील वाटा भारताला गमवावा लागला.

**भारतीय वस्त्रोद्योग क्षेत्राविषयीची विशेष ज्ञात नसलेली वस्तुस्थिती**

भारतीय वस्त्रोद्योगाचे वैशिष्ट्य म्हणजे या उद्योगात अतिशय कमी खर्च आहे. इतर देशांमधील याच आकाराच्या कंपन्याच्या खर्चाचा एक लहानसा अंश इतका खर्च आहे. पाच दशकांपासून उत्पादन आणि उत्पादनखर्च यांचे मापदंड निर्धारित केल्यामुळे वस्त्रोद्योग क्षेत्रात स्पर्धात्मकता टिकून राहिली आहे. बहुतेक भारतीय गिरण्या सूतकताई आणि वीणकामामध्ये यंत्रांचा वेग ३० टक्के जास्त ठेवून अगदी चीनपेक्षाही जास्त प्रमाणात लीन मॅन्युफॅक्चरिंग म्हणजे उत्पादनात कमीत कमी नासाडीच्या तंत्राचा अवलंब करतात. भारताची सूतकताई, वीणकाम आणि प्रक्रिया यांच्या उत्पादन खर्चातील स्पर्धात्मकता इतर वस्त्रनिर्मिती करणाऱ्या देशांच्या तुलनेत खूपच सुधारली आहे आणि ती कायम टिकवणे अतिशय आवश्यक आहे.

---

***बहुतेक भारतीय गिरण्या सूतकताई आणि वीणकामामध्ये यंत्रांचा वेग ३० टक्के जास्त ठेवून अगदी चीनपेक्षाही जास्त प्रमाणात लीन मॅन्युफॅक्चरिंग म्हणजे उत्पादनात कमीत कमी नासाडीच्या तंत्राचा अवलंब करतात. भारताची सूतकताई, वीणकाम आणि प्रक्रिया यांच्या उत्पादन खर्चातील स्पर्धात्मकता इतर वस्त्रनिर्मिती करणाऱ्या देशांच्या तुलनेत खूपच सुधारली आहे आणि ती कायम टिकवणे अतिशय आवश्यक आहे.***

---

**वस्त्रोद्योग क्षेत्रातील रोजगार**

वस्त्रोद्योग क्षेत्रातील ५००० हून अधिक कंपन्यांच्या निर्यातीची उलाढाल ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे आणि या उद्योगांमध्ये कार्यरत असलेल्या मनुष्यबळामध्ये महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक असून रोजगार निर्मितीसाठी येणारा खर्च अतिशय कमी आहे.

दुसऱ्या वस्तूंच्या उत्पादनांच्या तुलनेत वस्त्रोत्पादनांच्या निर्मिती प्रक्रियेत मालाच्या प्रति एक रुपया निर्यातमूल्यामध्ये अधिक रोजगार आहेत आणि सर्वाधिक परकीय चलनाची प्राप्ती आहे. प्रति एक अब्ज डॉलरच्या प्राप्तीअंतर्गत अंदाजे २५००० थेट रोजगार निर्माण होत असल्याने, रोजगार निर्मितीमध्ये हा उद्योग लक्षणीय योगदान देत आहे. कौशल्य विकास आणि उद्यमशीलता मंत्रालयाच्या अहवालानुसार वस्त्रोद्योग आणि वस्त्रप्रावरण उद्योग सरकारच्या 'मेक इन इंडिया' अभियानामध्ये रोजगार निर्मितीच्या माध्यमातून महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या क्षेत्रामध्ये २००८ या वर्षात ३३-३५ दशलक्ष रोजगार होते. ही संख्या २०२२मध्ये ६०-६२ दशलक्षांपर्यत वाढेल असा अंदाज या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे.

**क्षमता आणि संधी- एक विश्लेषण**

इतर बाजारपेठांमधील उद्योगांशी तुलना केल्यास भारतीय वस्त्रोद्योग क्षेत्राची अनेक बलस्थाने आहेत. भारत कच्च्या मालाच्या बाबतीत विशेषत: नैसर्गिक धाग्यांच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे आणि सध्या जगातला आघाडीचा कापूस उत्पादक आहे. उद्योगाच्या विकासात योगदान देणारे अल्प दर आणि कौशल्यप्राप्त मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणावर उपलब्धता आहे.

कापसाच्या सुताच्या जागतिक व्यापारात भारताचा सुमारे २९ टक्के इतका वाटा आहे आणि उत्पादक कारखान्यांच्या आकारमानातील विविधतेमुळे लहान आणि निश्चित आकारमानाच्या मोठ्या मागणीची हाताळणी करण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर लवचिकता प्राप्त होते.

ट्रान्स पॅसिफिक भागीदारी, ट्रान्स अटलांटिक व्यापार आणि ट्रान्स पॅसिफिक इन्वेस्टमेंट पार्टनरशिप, नॉर्थ अमेरिका

मुक्त व्यापार करार, सेंट्रल अमेरिका मुक्त व्यापार करार यांसारख्या व्यापारी व्यासपीठांमुळे जागतिक व्यापाराच्या परिदृश्यात बदल झाला असून, त्याचा भारतीय निर्यातीवर परिणाम दिसून येणार आहे. एकंदरच जर योग्य पावले उचलली नाहीत तर पर्यावरणविषयक आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांची कठोर अंमलबजावणी यांसारख्या बिगर वित्तीय घटकांचा परिणाम उद्योगांवर दिसून येणार आहे.

भारतीय वस्त्रोद्योग क्षेत्रात ही सर्व आव्हाने असली तरी या उद्योगाच्या विकासाच्या संधी देखील तितक्याच आहेत. यापैकी काही संधी म्हणजे मूल्यवर्धित उत्पादनांच्या माध्यमातून मूल्य साखळीच्या दिशेने वाटचाल करत अतिशय उच्च दर्जाच्या उत्पादनांची निर्मिती करणे. टेक्निकल टेक्स्टाईल या प्रकारालाही चांगला वाव आहे. यामध्ये नावीन्यपूर्ण आणि तांत्रिकदृष्ट्या आधुनिक उत्पादनांची निर्मिती केली जाते. जागतिक मागणी असलेले हातमाग आणि हस्तकला उद्योग क्षेत्रासारख्या क्षेत्रांना किरकोळ विक्री केंद्रांमुळे संधी निर्माण झाल्या आहेत.

**निष्कर्ष**

कापूस पिकवणाऱ्या दोन कोटी शेतकऱ्यांना आणि कच्चा माल म्हणून कापसाचा वापर करणारे वस्त्र आणि वस्त्रप्रावरणे उद्योगांना देशातच पिकवलेल्या कापसाचा फायदा मिळवून देण्यासाठी आणि आपल्या माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निर्धारित केलेल्या दृष्टिकोनाला प्रत्यक्षात आणण्यासाठी वस्त्रोद्योग क्षेत्राचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे.

या लक्ष्याच्या दिशेने जाण्यासाठी खालीलपैकी काही उपाय नक्कीच करता येतील

१ संशोधन, रचना, विकास आणि पणनक्षमता निर्मिती यांवर भर

२ स्थानिक बाजारपेठेबरोबरच जागतिक बाजारपेठेसाठी देखील भारताचे घरगुती वस्त्रोद्योग व तयार कपड्यांचे ब्रँड निर्माण करणे

३ पहिल्यापासूनच स्पर्धात्मक असलेल्या आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये तुलनेने जास्त असलेल्या निर्यातदरांमध्ये कपात करून आंतरराष्ट्रीय निर्यातीचे मार्ग खुले करणे

***या उद्योगाच्या विकासाच्या संधी देखील तितक्याच आहेत. यापैकी काही संधी म्हणजे मूल्यवर्धित उत्पादनांच्या माध्यमातून मूल्य साखळीच्या दिशेने वाटचाल करत अतिशय उच्च दर्जाच्या उत्पादनांची निर्मिती करणे. टेक्निकल टेक्स्टाईल या प्रकारालाही चांगला वाव आहे. यामध्ये नावीन्यपूर्ण आणि तांत्रिकदृष्ट्या आधुनिक उत्पादनांची निर्मिती केली जाते.***

४ भारतीय उद्योगांच्या युरोपीय संघ, कॅनडा व ऑस्ट्रेलिया यांच्याशी वाटाघाटी वाढवणे.

५ जर भारताला अमेरिका, युरोपीय संघ यांना निर्यात होणाऱ्या मालात लक्षणीय वाढ करायची असेल तर आपल्या उत्पादनांमध्ये विशेषत: तयार कपड्यांमध्ये वैविध्य आणले पाहिजे. या ठिकाणी प्राधान्याच्या दरांच्या सवलतीमुळे व्हिएतनामसारख्या देशांना फायदा मिळणार आहे.

६ थेट परकीय गुंतवणूक

७ उत्पादनाच्या सर्व पातळ्यावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे मानक टिकवून ठेवले पाहिजेत

८ प्रशिक्षण, कौशल्य उभारणी आणि व्यवस्थापकीय क्षमता आणि कार्यबळाची शक्ती टिकवून ठेवण्याच्या माध्यमातून या क्षेत्राची उत्पादकता वाढवणे.

■■■

*लेखक सुती कापड निर्यात प्रोत्साहन परिषदेचे अध्यक्ष असून या क्षेत्रातील आघाडीचे उद्योजक आहेत.*

email: ed@texprocil.org, info@texprocil.org

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

१. व्हाय पिपल प्रोटेस्ट (इंग्रजी) ₹ २००/-

**अन्य काही पुस्तके**

१. इंडिया-मेडिव्हल हिस्ट्री (इंग्रजी) ₹ ६५/-

२. भारत के नारी रत्न (हिंदी) ₹ १०५/-

# कपड्यांच्या निर्यातीसाठी उपलब्ध असलेले उदयोन्मुख बाजार

अदिती दास रावत



**प्राचीन काळात चीन, इंडोनेशिया तसेच रोमन देशांमधे भारतीय वस्त्रांचा व्यापार चालत असे. यापैकी रोमन देशांशी चालणारा व्यापार अरब व्यापाऱ्यांनी काबीज केला आणि १५व्या शतकाच्या अखेरीस जेव्हा वास्को-दी-गामा भारतात येऊन पोचला, त्यानंतर पोर्तुगीजांशी होणारा व्यापार लक्षणीय प्रमाणावर वाढला. काळाच्या, ओघात, सोळाव्या शतकात युरोपियन कंपन्यांनी उपखंडात पाय रोवायला सुरुवात केली आणि कापड उद्योगासारख्या फायदेशीर व्यवसायाचा भाग बनले.**

उद्योगधंद्यांचा कालखंड सुरु होण्याच्या कितीतरी आधीपासून विविध प्रकारच्या कापडाच्या व्यापारासाठी भारताचे नाव जगविख्यात होते. सुलतान म्हणजेच मुस्लिम राज्यकर्त्यांच्या काळात बाजारात विकल्या जाणाऱ्या उत्तम प्रतीच्या वस्त्रांचे विस्तृत वर्णन, इबन बतुता सारख्या अनेक परदेशी पर्यटकांनी लिहून ठेवले आहे. प्राचीन काळात चीन, इंडोनेशिया तसेच रोमन देशांमधे भारतीय वस्त्रांचा व्यापार चालत असे. यापैकी रोमन देशांशी चालणारा व्यापार अरब व्यापाऱ्यांनी काबीज केली आणि १५व्या शेतकाच्या अखेरीस जेव्हा वास्को-दी-गामा भारतात येऊन पोचला, त्यानंतर पोर्तुगीजांशी होणारा व्यापार लक्षणीय प्रमाणावर वाढला. काळाच्या, ओघात, सोळाव्या शतकात युरोपियन कंपन्यांनी उपखंडात पाय रोवायला सुरुवात केली आणि कापड उद्योगासारख्या फायदेशीर व्यवसायाचा भाग बनले. अठराव्या आणि एकोणीसाव्या शतकात भारतीय वस्त्रांच्या निर्यातीने नवी उंची गाठली आणि जगातला सर्वात मोठा कापड निर्यातदार म्हणून भारताने प्रसिद्धी मिळवली.

मोघल कालखंडात देशात मुख्यत्वेकरुन सोन्या-चांदीच्या लगडी, कच्चे रेशीम, घोडे, हस्तिदंत आणि मौल्यवान खडे, मखमल आणि जर या वस्तुंची आयात होत असे. तर विविध प्रकारचे कापड, नीळ, मसाले आणि इतर छोट्या मोठ्या वस्तुंची निर्यात मोठ्या प्रमाणावर होई. त्या काळात जमिनीच्या मार्गाने म्हणजेच छोट्या मोठ्या रस्त्यांवरुन होणारी मालवाहतूक नियंत्रित आणि असुरक्षित समजली जायची. त्यामुळे व्यावसायिक वापरासाठी नद्या आणि समुद्रमार्गे होणारी वाहतूक जास्त फायदेशीर होती. हिंदी महासागरातून आग्नेय आशियात केल्या जाणाऱ्या व्यापारात कित्येक शतके भारतीय वस्त्रोद्योगाचा मोठा वाटा होता.

परदेशी, बाजारांमधे खरेदी होणारे भारतीय कापड केवळ स्वस्तच होते असे नाही तर ते दर्जेदार आणि सुंदरही असायचे. त्याकाळातले भारतीय डिझाइनर्स परदेशी बाजारांमधे मागणी असलेले विशिष्ट कापडांचे प्रकार मुद्दाम तयार करायचे तसेच मागणी वाढविण्यासाठी वेगळ्या प्रकारचे नमुने तसेच विणण्याच्या पद्धती याबाबत नवनवीन प्रयोग करत रहायचे, असे त्याकाळी व्यापारानिमित्त प्रवास करणाऱ्यांनी नमूद करुन ठेवले आहे. भारतीय विणकर आणि रंगारी मोठ्या प्रमाणावर वेगवेगळ्या प्रकारची तंत्रे

आत्मसात करण्यात हुशार होते आणि मागणीनुसार त्यामधे चटकन बदल करण्याची तत्परता ते दाखवत असत. इंग्रजी शब्दकोशात समावेश करण्यात आलेल्या कॅलिको, पजामा, मस्लिन, गिंगहॅम, शॉल, डुंगरी, चिट आणि खाकी यासारख्या शब्दांमुळे भारतीय कापड उद्योगाची लोकप्रियता आपल्याला मोजता येऊ शकते.

**जागतिक व्यापार : विविध प्रवृत्ती**

भारतीय वस्त्रोद्योगाला इतिहासाच्या विविध टप्प्यांवर वेगवेगळ्या चढउताराला तोंड द्यावे लागले. वसाहतवादाच्या काळात यंत्रांनी बनवलेली आणि स्वस्त कापडे आणि इतर वस्तु यांच्या मोठ्या प्रमाणावरच्या आयातीला देशाला तोंड द्यावे लागले. त्यामुळे घरगुती हातमाग कमी झाले आणि विणकर बेकार झाले. अगदी आता आताच्या काळाचा विचार केला तरी, जागतिकीकरणाला दिलेले उत्तेजन आणि त्यामुळे झालेल्या बदलांनी सामायिक विश्व पुरवठा साखळी आणि एकापेक्षा जास्त गोष्टी एकाच वेळी उत्पादीत करणारे हब यांचे युग आणले. तरीही देशातले वेगवेगळे हातमाग आणि त्यांचे विणकर अजूनही पारितोषिक प्राप्त उत्पादने तयार करीत आहेत आणि जगाच्या कानाकोपऱ्यातल्या बाजारांवर राज्य करत आहेत.



गेल्या काही वर्षांमधे जागतिक व्यापार मंदावलेला आहे, विकसित देशांकडून येणे बाकी आहे, तर विकसनशील देशांमधे व्यापारात मध्यम वाढ दिसते आहे. २०१५ प्रमाणेच यावर्षीदेखील जागतिक व्यापाराच्या वाढीचा दर मंद म्हणून २.८ टक्के राहील अशी अपेक्षा आहे. विकसित देशांमधे आयात मध्यम तर यावर्षी विकसनशील आशियाई देशांकडून भारतीय वस्तुंची आयात वाढेल, असा अंदाज जागतिक व्यापार संघटनेने व्यक्त केला आहे. संघटनेच्या अर्थतज्ज्ञांनी म्हटले आहे की, जागतिक व्यापारातली वाढ २०१७ साली ३.६ टक्के होईल.

***ब्राझील, भारत, इंडोनेशिया, मेक्सिको, रशियन राष्ट्रसंघ, दक्षिण आफ्रिका आणि टर्कीसारख्या सर्व वाढत्या अर्थव्यवस्थांचा २०१६ मधे मध्यम स्वरुपाचा विकास होईल, असा अंदाज असला तरी चीनच्या अर्थव्यवस्थेचा विकास खूप काळापर्यंत मंदावलेलाच राहील असा अंदाज आहे.***

आजच्या घडीला जागतिक व्यापाराचे वातावरण अधिकाधिक आव्हानात्मक झाले आहे. काही वर्षांमधे भारताच्या व्यापाराचा रोख नवनव्या उद्योन्मुख बाजारांकडे वळत आहे. मात्र कापड आणि तयार कपड्यांच्या निर्यातीसाठी अमेरिका आणि युरोपीय संघाच्या परंपरागत बाजारांवर आपली मजबूत पकड आहे. अनेक मोठ्या उद्योन्मुख अर्थव्यवस्थांना आव्हानात्मक दीर्घ अर्थशास्त्रविषयक वातावरणाला तोंड द्यावे लागत आहे. ब्राझील, भारत, इंडोनेशिया, मेक्सिको, रशियन राष्ट्रसंघ, दक्षिण आफ्रिका आणि टर्कीसारख्या सर्व वाढत्या अर्थव्यवस्थांचा २०१६ मधे मध्यम स्वरुपाचा विकास होईल, असा अंदाज असला तरी चीनच्या अर्थव्यवस्थेचा विकास खूप काळापर्यंत मंदावलेलाच राहील असा अंदाज आहे.

वरच्या चर्चेचा संदर्भ घेता, चीनच्या अर्थव्यवस्थेचे मंदावणे खूप महत्त्वाचे ठरते कारण त्याचा परिणाम इतर उदयोन्मुख अर्थव्यवस्था, छोटे विकसनशील देश आणि बदलत असलेल्या अर्थव्यवस्थांवर होऊ शकतो. चीनच्या मंदावलेल्या अर्थव्यवस्थेमुळे विकसित देशांमधल्या निर्यातीच्या प्रमाणात जी हळुहळु सुधारणा होतेय तिच्यावरही विपरीत परिणाम होऊ शकतो. विशेषत: युरो झोनमधे जाणवण्याइतका परिणाम होऊ शकेल. ऐतिहासिक दृष्ट्या, कापड उद्योगाचा विकास हे औद्योगिकीकरणाच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल होते. ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर महिला आणि अर्धकुशल कामगारांना रोजगार उपलब्ध झाला. जर

चीनची अर्थव्यवस्था वस्त्रोद्योगावरचे लक्ष इतर उत्पादन क्षेत्र आणि वेगाने वाढणाऱ्या सेवा क्षेत्रातल्या उच्च कौशल्य लागणाऱ्या नोकऱ्यांकडे वळवणार असेल, तर ह्यामुळे जागतिक वस्त्रोद्योग क्षेत्र एका नव्या टप्प्यावर असेल. ह्या परिस्थितीत नव्याने सामोऱ्या येणाऱ्या संधींचा फायदा भारताने घ्यायला हवा. असे असले तरीही अजूनही चीन ह्याच कापड उद्योगातला प्रथम क्रमांकाचा निर्यातदार म्हणून स्थान टिकवेल हे नक्की. निर्यातीसाठी नव्या बाजारांची निवड करताना आर. टी.ए. अर्थात प्रादेशिक व्यापारविषयक करारांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. काही करारांमुळे आपल्याला फायदा नसलेल्या क्षेत्रात किंवा अटींवर व्यापार करावा लागण्याची संभावना असते.

**'जागतिक वस्त्र निर्यात'**

सध्याच्या जागतिक वस्त्र बाजाराची उलाढाल ११०० बिलीयन अमेरिकन डॉलर्स इतकी आहे. त्यात व्यापार ७५० बिलीयन अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त आहे. युरोपीय संघ ही सगळ्यात मोठी ग्राहक बाजारपेठ असून, तिचा व्यवहार वर्षाला ३५० बिलीयन अमेरिकन डॉलर्स इतका आहे. येत्या २०२५ सालापर्यंत जागतिक वस्त्र आणि कपड्यांचे क्षेत्र ५ टक्क्याच्या वार्षिक विकास दराने वाढून २१०० बिलीयन अमेरिकन डॉलर्स होईल. असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. चीन हा जगातला सर्वात मोठा कापड निर्यातदार आहे आणि एकूण जागतिक कापड निर्यातीमधे चीनचा वाटा ३५ ते ३९ टक्के इतका आहे. चीनच्या खालोखाल कापड निर्यातीत अव्वल असणारे देश म्हणजे युरोपियन संघ, बांग्लादेश, हाँगकाँग, व्हिएतनाम, भारत, टर्की, इंडोनेशिया, अमेरिका आणि कंबोडिया. जगातला सर्वात मोठा वस्त्र आयातदार युरोपीय संघ आहे आणि जागतिक कपडे आयातीतला त्याचा वाटा ३५-३८ टक्के आहे. त्या पाठोपाठ अमेरिकेचा क्रमांक लागतो, त्याचा आयातीतला वाटा १८ टक्के आहे, तर ६ टक्के आयात करणारा जपान तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्यापुढचा क्रमांक हॉंगकाँग, मग कॅनडा, रशिया, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया, स्वित्झर्लंड आणि चीन यांचा क्रमांक येतो. पण या सात आयातदारांचा जागतिक वस्त्र आयातीत फार छोटा सहभाग आहे.

***कमी खर्चात कामगार उपलब्ध होत असल्यामुळे भारताला इतर देशांच्या स्पर्धेत तुलनेने जो फायदा होत होता, तो आता बांग्लादेश तसेच व्हिएतनामसारख्या देशांमुळे कमी होऊ लागला आहे. कारण हे देश कुशल कामगार कमी खर्चात पुरवत आहेत. बांग्लादेशचे निर्यातीला सर्वात जास्त महत्त्व देणारे औद्योगिक क्षेत्र आत्ताच स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचा चौथा भाग व्यापून आहे***

आगामी पाच किंवा त्याहून जास्त वर्षे, वस्त्र आणि तयार कपड्यांचा पुरवठादार देश म्हणून चीनच आघाडीवर असेल. चीनने कापड गिरण्या आणि संबंधित इतर सोयीसुविधांचे बांधकाम आणि आधुनिकीकरणासाठी गुंतवणुकदारांना यशस्वीपणे आकर्षित केले आहे. तसेच वस्त्रोद्योगाशी संबंधित यंत्रांच्या आयातीत चीन नेहमीच अग्रेसर राहीला आहे. त्यामुळे चीनला वाढत्या जागतिक बाजारांची गरज आहे. पण स्थानिक पातळीवर मागणी वाढण्याच्या शक्यतेने जागतिक बाजारांमधल्या कामगिरीवर वाईट परिणाम होण्याची शक्यता आहे.

**'भारतातून होणारी कापड आणि तयार कपड्यांची निर्यात'**

जागतिक व्यापार संघटनेच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधीच्या २०१५ साली जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारत हा जगातला तिसऱ्या क्रमांकाचा कापड निर्यातदार देश आहे. २०१४ या वर्षात जगातल्या एकूण कापड निर्यातीपैकी ५.८ टक्के निर्यात भारतातून झाली. त्या वर्षात अमेरिकेची एकूण निर्यात ४१ बिलीयन अमेरिकन डॉलर्सची होती. त्यापैकी १८.३ बिलीयन निर्यात फक्त कापडाची होती. त्यावेळी जगात ३१४ बिलीयन अमेरिकन डॉलर्सचा व्यापार झाला होता. तयार वस्त्रांचा निर्यातीत जगभरातला ३.७ टक्के वाटा घेत भारत सहाव्या क्रमांकावर आहे. जगभरात तयार कपड्यांची निर्यात २०१४ मधे ४८३ बिलीयन डॉलर्स इतकी होती. अमेरिकेच्या ४१ बिलीयन डॉलर्सच्या वस्त्र निर्यातीत १८ बिलीयन डॉलर्सचा वाटा तयार कपड्यांचा होता.

निर्यातीतल्या भक्कम कमाईमुळे भारतीय वस्त्रोद्योगाला विशेष महत्त्व आणि मजबूती मिळाली आहे. मंदीमुळे जागतिक बाजारातली वाईट स्थिती आणि वाढती विजेची बिले, वाहतुकीचा सतत वाढणारा खर्च आणि किचकट कामगार कायदे यासारखी आव्हाने देशांतर्गत पातळीवर असली, तरीही इतर उत्पादन क्षेत्रांपेक्षा वस्त्रोद्योगाने उत्तम कामगिरी केली आहे. सन २०१५-१६ मध्ये भारताच्या एकूण निर्यातीच्या १४ टक्के वाटा एकट्या वस्त्रोद्योगांचा होता.

**''नवीन कारखानदारी हब''**

कमी खर्चात कामगार उपलब्ध होत

असल्यामुळे भारताला इतर देशांच्या स्पर्धेत तुलनेने जो फायदा होत होता, तो आता बांग्लादेश तसेच व्हिएतनामसारख्या देशांमुळे कमी होऊ लागला आहे. कारण हे देश कुशल कामगार कमी खर्चात पुरवत आहेत. बांग्लादेशचे निर्यातीला सर्वात जास्त महत्त्व देणारे औद्योगिक क्षेत्र आत्ताच स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचा चौथा भाग व्यापून आहे आणि वैश्विक उत्पादन क्षेत्राचे हब होण्याच्या दृष्टीने स्वत:चा विकास घडवून आणत आहे. बांग्लादेश आणि व्हिएतनामशिवाय कंबोडीया, इथिओपिया आणि म्यानमार हे देश सुद्धा तयार कपड्यांच्या व्यापारात नव्याने संभाव्य स्पर्धक म्हणून उदयाला येत आहेत. येत्या काही वर्षात म्यानमारचा कापड उद्योग लक्षणीयरित्या वाढेल असा अंदाज जाणकारांनी व्यक्त केला आहे. सन २०२० पर्यंत तिथल्या वस्त्रोद्योगात १५ दशलक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असे भविष्य वर्तवण्यात आले आहे. २०१५ सालच्या मध्यापर्यंत फक्त २ लाख ३० हजार व्यक्तिंना या उद्योगात रोजगार उपलब्ध झाला होता. कापड निर्यात उद्योगाला मोठ्या प्रमाणावर चालना देण्यासाठी म्यानमारने कापड आणि तयार कपड्यांच्या उद्योगांच्या बाबतीत एक धोरण प्रसिद्ध केले आहे. राष्ट्रीय निर्यात धोरण २०१५-२०१९ असे या धोरणाचे नाव आहे. कापड कापणे, कपडे तयार करणे आणि त्यांना वेष्टनात बांधून विक्रीसाठी पाठविणे या नेहमीच्या कार्यपद्धतीऐवजी नव्या धोरणात मोठ्या प्रमाणावर कपडे निर्मिती व्हावी, यासाठी अधिक सोपे नियम आणि कार्यपद्धती राबवायचा निर्णय झाला आहे.

इथिओपिया या देशात स्पर्धात्मक कपडे उद्योगाला आवश्यक असलेले सर्व घटक उपलब्ध आहेत. उदा. कच्चा माल, कमी खर्चात मुबलक रोजगार आणि स्वस्त विजेची उपलब्धता. स्थानिक पातळीवर उत्पादन झालेल्या कापसावर अवलंबून असलेल्या कापड गिरण्यांच्या एकात्मिक साखळ्या हाच देशाच्या वस्त्रोद्योग क्षेत्राच्या वाढीसाठीचा भक्कम पाया आहे. परदेशी गुंतवणुकदारांना आकर्षित करण्याच्या उद्देशाने इथिओपियाचे सरकार वस्त्रोद्योगाच्या आधुनिकीकरणाला अधिकाधिक प्रोत्साहन देत आहे. आफ्रिकन ग्रोथ अँड ऑपॉरच्युनिटी अॅक्ट (AGOA), कॉमन मार्केट ऑफ ईस्टर्न अँड सदर्न आफ्रिका (COMESA) आणि इतर द्विपक्षीय व्यापारविषयक करारांच्या माध्यमातून निर्यातीच्या नवीन संधी उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. कमी विकसित देशांना लाभ करुन देण्यासाठी युरोपियन संघाने तयार केलेल्या ''इव्हरीथिंग बट आर्मस्'' म्हणून शस्त्रांशिवाय इतर सर्व गोष्टींच्या व्यापाराला प्रोत्साहन देण्याच्या कार्यक्रमाचा इथिओपिया हा सुद्धा एक सदस्य देश आहे.

***जागतिक बँकेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार २०१५ साली बांग्लादेश, कंबोडिया, इथिओपिया, म्यानमार आणि व्हिएतनाम या देशांचा वार्षित स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचा दर अनुक्रमे ६.६ टक्के, ७ टक्के, ९.६ टक्के, ७ टक्के आणि ६.७ टक्के इतका आहे. हे देश अधिकाधिक उत्पादन वाढवून निर्यातीवर भर देणारे हब ठरत आहेत.***

जागतिक बँकेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार २०१५ साली बांग्लादेश, कंबोडिया, इथिओपिया, म्यानमार आणि व्हिएतनाम या देशांचा वार्षित स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचा दर



अनुक्रमे ६.६ टक्के, ७ टक्के, ९.६ टक्के, ७ टक्के आणि ६.७ टक्के इतका आहे. हे देश अधिकाधिक उत्पादन वाढवून निर्यातीवर भर देणारे हब ठरत आहेत. त्यांनी उद्योगांना दिलेल्या प्रोत्साहनामुळे रोजगार निर्मितीच्या शक्यता मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. त्यामुळे चीनकडे केंद्रीत झालेली गुंतवणूक आणि उत्पादनाची मक्तेदारी संपुष्टात येऊ लागली आहे. येत्या काळात आग्नेय आशियामधे मोठ्या प्रमाणावर ग्राहक देश निर्माण होण्याच्या शक्यता वाढत आहेत.

सन २००० मधे AGOA लागू झाल्यापासून आफ्रिकेची कापड आयात उल्लेखनीयरित्या वाढली आहे, असा अहवाल आफ्रिकन इंटेलिजन्स लिमिटेड २०१६ या संस्थेने दिला आहे. या देशांमधल्या कापड उत्पादनाला प्रोत्साहन देऊन सहारा उपखंडातल्या आफ्रिकी देशांना निर्यातदार म्हणून उभे करण्यासाठी आणि अमेरिकी बाजारांमधे करमुक्त आणि आरक्षणमुक्त निर्यात करता यावी, या हेतुने AGOA या कायद्याची योजना केली आहे. हा कायदा लागू केल्यापासून सहारा उपखंडातल्या बऱ्याच आफ्रिकी देशांची तयार कपड्यांची निर्यात वाढली आहे, म्हणजेच त्या भागात मोठ्या प्रमाणावर कपडे निर्मिती वाढली आहे. त्यामुळे तिथे आयात कापडाची अधिकाधिक गरज वा मागणी वाढली आहे. पण एक लक्षात घ्यायला हवे की AGOA हा कायदा सहारा उपखंडात संपूर्ण पुरवठा साखळी उभारण्याला प्राधान्य देतो, ज्यामध्ये सूत तयार करणे, कापड विणणे, रंगविणे आणि त्यावर इतर प्रक्रिया करणे या प्रक्रियांचा समावेश आहे. तसेच अमेरिकेत कपडे निर्यात करण्यासाठी पात्र ठरता यावे म्हणून निर्यात होणाऱ्या तयार कपड्यांचे कापड स्थानिक पातळीवर किंवा अमेरिकेत तयार झालेले असावे, असा खास आग्रह या कायद्यामधे आहे.

नायजेरिया आणि इथिओपिया हे देश ज्याप्रमाणे शेती आणि इतर नैसर्गिक संसाधनांच्या पलिकडचा विचार करुन वाटचाल करत आहेत. त्याप्रमाणे जर आफ्रिकेने वेगळे धोरण आखले तर अनेक क्षेत्रांमधे विकासाच्या मोठ्या संधी आहेत. आफ्रिकेच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचा ५० टक्के वाटा ज्या देशांमधून येतो त्या सुमारे ११ देशांमधे मध्यमवर्गीय समाजाची सुमारे १५ दशलक्ष घरे आहेत. हा आकडा २०२० सालापर्यंत ४२ दशलक्षापर्यंत जाईल असा अंदाज आहे. तरीही आफ्रिकेला आरोग्यविषयक धोके आणि पाणी तसेच विजेची टंचाई यासारख्या मूलभूत गरजांच्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. आफ्रिकेपुढे संरक्षणविषयक प्रश्न आणि राजकीय अस्थिरता यांची मोठी आव्हाने आहेत.

***आफ्रिका खंडातला इजिप्त हा सर्वात मोठा कापूस आणि कापड उद्योग असलेला देश आहे. तिथल्या अर्थव्यवस्थेमधे कापड उद्योग सगळ्यात मोठा उद्योग असून, हा उद्योग देखिल धागे, कापड आणि इतर संबंधित वस्तुंच्या आयातीवर अवलंबून आहे. इजिप्तच्या कापड आयात उद्योगाने २०१५ या वर्षात १७ टक्के इतकी भरीव वार्षिक दरवाढ नोंदवली आणि त्यात भारताचा वाटा फक्त १ टक्के इतका होता.***


''भारतीय कापड आणि तयार कपड्यांसाठी नवे उदयोन्मुख बाजार कोणते आहेत?''


रंजक गोष्ट अशी आहे की भारत ज्या देशांमधे सर्वाधिक कापड निर्यात करतो अशा पहिल्या दहा देशांसोबत भारताने परदेश व्यापार करार किंवा प्राधान्य व्यापार करार केलेले नाहीत. याला बांग्लादेश अपवाद आहे कारण तो दक्षिण आशियाई व्यापार करारांतर्गत भारताशी संलग्न आहे.

निर्यातवाढीत सातत्य राखण्यासाठी जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीच्या विविध पैलुंवर आधारलेली बाजारांमधली विविधता आवश्यक आहे. आपल्या वस्त्रांच्या निर्यातीच्या दृष्टीने जे देश किंवा भाग आपल्याला सर्वात आशादायक किंवा सकारात्मक वाटतात त्यांच्याशी करार करण्यासारखे प्रयत्न होणे गरजेचे आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कापूस किंवा लोकरीसारख्या नैसर्गिक धाग्यांपेक्षा मानवनिर्मित कृत्रिम धाग्यांना पहिली पसंती आहे. कृत्रिम धाग्यांची निर्मिती करणे छोट्या उद्योगांना कठीण आहे कारण त्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची किंमत सतत कमी जास्त होत असते आणि या कामासाठी लागणारे कामगार जास्त मजुरी घेतात. त्याशिवाय, परदेशी बाजारांमधल्या स्पर्धांमधे टिकून रहायचे असले, तर सतत बदलणारी फॅशन आणि वेगवेगळ्या वयोगटातल्या ग्राहकांची आवड लक्षात घेऊन वस्त्रोद्योग क्षेत्रात त्याप्रमाणे बदल घडवून आणावे लागतील.

उत्तर अमेरिका आणि युरोपसारख्या भारताच्या पारंपरिक निर्यातदार देशांकडून मागणी कमी होत जाईल. या अंदाजामुळे व्यापाराचा विचार करता भारतीय निर्यातदारांसाठी मोठे आव्हान उभे राहील, असे चित्र दिसत आहे.

आपल्या स्पर्धक देशांनी 'ट्रान्स पॅसिफिक पार्टनशिप' ही भागीदारी स्वीकारण्याचा निर्णय घेतला, तर ते अधिकच चिंताजनक आहे. तुलनेने विकसनशील आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांमधे भविष्यात निर्यातवाढीला चांगला वाव आहे. त्यामुळे तिथे निर्यातदर जास्त मिळण्याची अपेक्षा ठेवायला वाव आहे. या उदयोन्मुख बाजारांमधल्या मध्यमवर्गाच्या मजबूत मागणीमुळे या देशांमधून आपल्या मालाला बराच काळ सातत्याने चांगली मागणी येऊ शकते. म्हणूनच लॅटीन अमेरिका, असियान, युरेशिया आणि वाना मधले बाजार आणि तुर्कस्तान, कॅनडा तसेच ऑस्ट्रेलियाच्या बाजारांवर लक्ष केंद्रीत करायला हवे. खाली दिलेला आलेख यावर प्रकाश टाकतो.




The above graphs represent a trend analysis


वाना म्हणजे पश्चिम आशिया आणि उत्तर आफ्रिकेच्या भागातले देश वेगाने विकसित होत आहेत. या प्रदेशातल्या इस्त्रायल या देशाशी परकीय व्यापार करार करण्यासाठी सध्या भारताच्या वाटाघाटी सुरु आहेत. इस्त्रायलचा कपड्यांचा उद्योग मुख्यत्वेकरुन धाग्यांची आणि विणलेल्या कापडाच्या ताग्यांची आयात करण्यावर अवलंबून आहे. सन २०१५ मध्ये इस्त्रायलने कपड्यांच्या आयातीत ५ टक्के इतकी वार्षिक वाढ केली होती आणि त्यातला भारताचा वाटा फक्त १ टक्के इतका होता. त्याचवेळी भारताने इस्त्रायलचे कपडे आयात करण्याचा दर मात्र ६ टक्के होता.

आफ्रिका खंडातला इजिप्त हा सर्वात मोठा कापूस आणि कापड उद्योग असलेला देश आहे. तिथल्या अर्थव्यवस्थेमधे कापड उद्योग सगळ्यात मोठा उद्योग असून, हा उद्योग देखिल धागे, कापड आणि इतर संबंधित वस्तुंच्या आयातीवर अवलंबून आहे. इजिप्तच्या कापड आयात उद्योगाने २०१५ या वर्षात १७ टक्के इतकी भरीव वार्षिक दरवाढ नोंदवली आणि त्यात भारताचा वाटा फक्त १ टक्के इतका होता. हा उद्योग एकत्रितपणे उभा वाढणारा उद्योग आहे. त्यात धाग्यांपासून सुरुवात होऊन तयार कपड्यांपर्यंत टप्पे आहेत आणि या उत्पादनात विविध प्रकार तयार करणे, कापड पसरवणे, कापणे, शिवणे आणि पॅकबंद करणे या हरेक बाबीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरले जाते. कापड उद्योग प्रामुख्याने कापसावर अवलंबून आहे, पण गेल्या काही वर्षात मानवनिर्मित कृत्रिम धाग्यांपासून बनवलेल्या कापडाला देशात चांगली मागणी येऊ लागली आहे. त्यामुळे मानवनिर्मित कपड्यांची आयात सातत्याने वाढत आहे. या धाग्यांचा इजिप्तमधल्या आयातीचा दर गेल्या काही वर्षांमधे वार्षिक ३ टक्के या वेगाने वाढत आहे. भारत हा त्यांचा प्रमुख पुरवठादार देश आहे. इजिप्तच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर २०१५ साली ४.२ टक्के इतका होता आणि इजिप्तच्या मोठ्या उत्पादन निर्यातीचा जम बसवण्यात मोठ्या गुंतवणुकीचा ओघ अपेक्षित आहे.

तुर्कस्थान हा सुद्धा भारताच्या मानवनिर्मित धाग्यांपासून बनवलेल्या कपड्यांसाठी महत्त्वाची बाजारपेठ आहे. तुर्कस्थानमध्ये स्थानिक पातळीवर बनणारा कच्चा माल आणि कपडे बनवण्याच्या प्रक्रियेमधली धागे, तागे यासारखी उत्पादने अत्यंत अपुरी आहेत. त्यामुळे त्यांना यातली अनेक उत्पादने आयात करावी लागतात. तुर्कस्थानमध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ५८ टक्के भाग व्यापारातून येतो. सन २०१५ मधे तुर्कस्थानने २.९ बिलीयन अमेरिकी डॉलर्स इतकी कापड आणि तयार कपड्यांची आयात केली होती पण नंतर त्यात घसरण होऊ लागली. म्हणून तुर्कस्थानवर लक्ष केंद्रीत करणे भारतासाठी उपयुक्त ठरणारे आहे. तिथल्या बाजारपेठेत सध्या भारतातून आयात केलेल्या वस्तूंचा वाटा अवघा २-३ टक्क्याच्या आसपास आहे हे लक्षात घ्यायला हवे.

गेल्या काही वर्षांमधे भारताचे लॅटिन अमेरिकेसोबतचे संबंध व्यापार आणि गुंतवणुकीच्या पलिकडे गेले आहेत. या दोन देशांमधे ऊर्जा, माहितीची देवाणघेवाण तसेच जी-२०, ब्रिक्स आणि इब्सा यासारख्या आंतरराष्ट्रीय

व्यासपीठांवर देखिल या दोन देशांनी एकदिलाने व्यवहार केले आहेत. मर्कोसुर आणि चित्ती या देशांसोबत भारताने व्यापारासाठी प्राधान्यक्रमाचे करार केले आहेत. त्यामुळे भारत आणि लॅटिन अमेरिकेसाठी व्यवसायासंबंधी अगणित संधी उपलब्ध झाल्या आहेत. मेक्सिको, पेरु आणि चिली हे तिन्ही देश कपड्यांच्या व्यापाराबाबत आपल्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत. तसेच मेक्सिको हा भारतातून विविध प्रकारच्या कापडांच्या



तर चिली तयार कपड्यांच्या आयातीत सर्वात वरच्या क्रमांकावर आहे. संयुक्त राष्ट्रांच्या कॉमट्रेडच्या आकडेवारीनुसार २०१५ मध्ये मेक्सिको, पेरु आणि चिली यांची कापड आणि तयार कपड्यांच्या आयातीची आकडेवारी ४.१ बिलीयन, ३.१ बिलीयन आणि ०.७ बिलीयन अमेरिकी डॉलर्स इतकी आहे. असे दिसतेय की लॅटिन अमेरिकन देशांमधले उद्योग दिवसेंदिवस स्पर्धेबाबत उदासीन होत चालले आहेत आणि ते चीनवरचे त्यांचे अवलंबित्व कमी करायचा प्रयत्न करत आहेत. तरीही या बाजारपेठांमधला भारतीय वस्त्रे आणि कापडाचा वाटा चिलीमधे १ टक्के आणि ४ टक्के, मेक्सिकोमधे प्रत्येकी ३ टक्के आणि पेरुमधे प्रत्येकी २ टक्के फक्त इतकाच आहे. या आकडेवारीवरुन भारताला या बाजारपेठांमधे मजल मारायला भरपूर वाव आहे हे दिसून येते.

**इतर विकसित बाजारपेठा : ओशनिया आणि कॅनडा**

विकसित राष्ट्रांच्या पारंपरिक बाजारपेठांमधे मुख्यत्वेकरुन तयार कपड्यांच्या निर्यातीवर भर देणे भारताने सुरुच ठेवले तरी कॅनडामधला कपड्यांचा व्यापार कमी झाला आहे. त्याचवेळी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कापड उद्योग मात्र अत्यंत वेगाने वाढतो आहे. सध्या मिळालेल्या आकडेवारीनुसार कृत्रिम धाग्यांच्या कापडाची निर्यात २०१५मध्ये ८.६ बिलीयन डॉलर्स होती, ती २०१७ मध्ये ९.३ बिलीयन डॉलर्स होईल, असा अंदाज आहे. कृत्रिम कापड निर्मिती उद्योगामधे नवनवे तंत्रज्ञान आणि त्याचा वापर सतत बदलत राहिल्याने निर्यातीचे प्रमाणही बदलत रहाते. उत्तर अमेरिकेमधे खूपसे कपडे तयार करणारे उद्योग असल्याने तो प्रदेश आधुनिक तंत्रज्ञानाने तयार झालेल्या कपड्यांसाठीचा मोठा ग्राहक प्रदेश ठरत आहे. कॅनडात भारतीय कृत्रिम कापड वा कपडे निर्यात करण्यासाठीच्या नवनव्या संधी आपण शोधायला पाहिजेत. कॅनडाशी सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार करण्यासाठी भारताने वाटाघाटी करायला हव्या.

तंत्रज्ञानावर आधारीत कापड निर्मिती हा भारतीय वस्त्रोद्योगाचा वेगाने वाढणारा विभाग आहे. सध्या जगभरात वापरल्या जात असलेल्या कृत्रिम कपड्यांमधला ९ टक्के भाग हा भारतात निर्मित असतो. भारतीय वस्त्रोद्योग संघटनेने कृत्रिम कापड निर्मितीवरच्या अहवालात म्हटले आहे की, २०१३ मध्ये ११.६ बिलीयन डॉलर्सची कृत्रिम कापड निर्मिती देशात झाली होती, ती २०१७ सालापर्यंत २६ बिलीयन डॉलर्सपर्यंत वाढेल.

ऑस्ट्रेलियामध्ये कापड, तयार कपडे आणि पादत्राणे उत्पादन कंपन्या वेगवेगळ्या आहेत आणि त्या तयार कपडे, कापड, कार्पेट, पादत्राणे आणि गाड्यांमधे वापरले जाणारे कापड अशा वेगवेगळ्या उत्पादनांची निर्मिती करतात. ऑस्ट्रेलियातली कपड्याची बाजारपेठ ५ टक्के वार्षिक दराने वाढेल, सध्याच्या २५ बिलीयन अमेरिकन डॉलर्सवरुन २०२५ पर्यंत ४५ बिलीयन अमेरिकन डॉलर्स होईल असा अंदाज आहे. ऑस्ट्रेलियाशी सर्वसमावेशक आर्थिक सहयोग कराराविषयी बोलणी सुरु असतानाच भारत वस्त्रोद्योगाची बाजारपेठ म्हणून ऑस्ट्रेलियात नव्या संधी शोधू शकतो.

■■■

*लेखिका वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या व्यापार सल्लागार आहेत.*

email: adrout@nic.in

# भारतीय ताग उद्योगाला चालना देण्याचे प्रयत्न

सुब्रत गुप्ता



**ताग हे नैसर्गिकरित्या विघटीत होणारे (बायोडिग्रेडेबल) आहे त्यामुळे अनेक बाबींमध्ये ते प्लॅस्टीकच्या ऐवजी वापरता येते. त्यामुळे प्रदुषण कमी होते. कृषीचा विचार केला तर, यापासून शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळते. अतिपर्जन्याच्या प्रदेशात ज्याठिकाणी इतर पिकांची लागवड करणे शक्य नाही, त्याठिकाणी तागाची लागवड करता येते. देशात ४० लाख शेतकरी तागाचे उत्पादन घेतात. यामुळे इतर साडेतीन लाख व्यक्तींना रोजगार मिळतो.**

भारतीय ज्यूट अर्थात ताग उद्योगाला ज्यूट पॅकेजिंग मटेरिअल्स, १९८७ या कायद्याचे कवच लाभले आहे. कायद्याच्या माध्यमातून ताग उत्पादक शेतकऱ्यांना संरक्षण आणि मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करुन देणे हा या कायद्याचा उद्देश आहे. पण, यामुळे ताग उत्पादकांना एकाच विक्रेत्यावर अवलंबून राहावे लागत आहे.

आपल्या देशात ताग हे कापसानंतर घेतले जाणारे दुसऱ्या क्रमाकांचे नैसर्गिक धाग्याचे पीक आहे. ताग उत्पादनासाठी सामाजिक-आर्थिक आणि पर्यावरणाशी निगडीत मुद्दे अनुकूल आहेत. ताग हे नैसर्गिकरित्या विघटीत होणारे (बायोडिग्रेडेबल) आहे त्यामुळे अनेक बाबींमध्ये ते प्लॅस्टीकच्या ऐवजी वापरता येते. त्यामुळे प्रदुषण कमी होते. कृषीचा विचार केला तर, यापासून शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळते. अतिपर्जन्याच्या प्रदेशात ज्याठिकाणी इतर पिकांची लागवड करणे शक्य नाही, त्याठिकाणी ज्यूटची लागवड करता येते. देशात ४० लाख शेतकरी ज्यूटचे उत्पादन घेतात. यामुळे इतर साडेतीन लाख व्यक्तींना रोजगार मिळतो. पूर्व आणि ईशान्येकडील राज्यांसाठी ज्यूट हे शेतीच्या दृष्टीनेही आणि औद्योगिकदृष्ट्याही किफायतशीर आहे.

गेल्या २०० वर्षांपासून ज्यूट हे दोरखंड बनवण्यासाठी आणि पॅकिंग करण्यासाठी वापरले जाते. वस्त्रोद्योगात कापसाला प्राधान्य दिले जाते, ज्यूटचा धागा वापरला जात नाही. त्यामुळे ज्यूटचा प्रमुख वापर पॅकेजिंगसाठी केला जातो.



मात्र, सध्या स्वस्त दराने मिळणारी प्लास्टीक पॅकेजिंगची साधने ज्यूटला मारक ठरत आहेत. सिमेंट आणि खत उत्पादक कारखान्यांमध्ये आता पॅकेजिंगसाठी ज्यूटचा वापर केला जात नाही.

**ज्यूट पॅकेजिंग मटेरिअल्स कायदा-शाप की वरदान?**

ज्यूट पॅकेजिंग मटेरिअल्स (पॅकिंगसाठी सक्ती) कायदा, १९८७ हा ११ मे १९८७ पासून अस्तित्वात आला. या कायद्याच्या माध्यमातून सरकार दरवर्षी कोणती उत्पादने ज्यूटचा वापर करुन पॅकींग करायची, हे

निर्धारीत करते. गेल्या तीन दशकांमध्ये या कायद्यामुळे ज्यूट उद्योगाला चांगला दिलासा मिळाला आहे.


ज्यूटचे सर्वाधिक उत्पादन घेणाऱ्या बांग्लादेशातही आतापर्यंत अशाप्रकारचा कायदा अस्तित्वात नाही. बांग्लादेशने २०१० मध्ये कायदा तयार केला, ज्याची अंमलबजावणी सप्टेंबर २०१२ पासून करण्यात येत आहे. मात्र, २०१४ पर्यंत या कायद्याची अंमलबजावणी प्रत्यक्षरित्या झाली नसल्याचे समजते. भारताप्रमाणे बांग्लादेश पॅकेजिंगसाठी थेट ज्यूटची खरेदी करत नाही. बांग्लादेश सरकारच्या ज्यूट उत्पादकांना अप्रत्यक्ष पाठिंबा आहे. खासगी वाणिज्यिक सेवा पुरवणाऱ्यांना सरकार ज्यूट पॅकेजिंगसाठी प्रोत्साहन देते.

भारतात, सध्या अन्नधान्य आणि साखर यासाठी ज्यूटचे पोते (सॅक) वापरली जाते. यासाठी सरकार ज्यूट मिलकडून थेट खरेदी करते. जेपीएम कायद्याचा किती परिणाम झाला हे आपल्याला खालील तक्त्यावरुन लक्षात येईल. २००६-०७ ते २०१५-१६ कालावधीतील ही आकडेवारी आहे.


** सूचना:याठिकाणी बी-ट्वील म्हणजे सरकारने केलेली थेट खरेदी*

अन्नधान्य आणि साखरेच्या पॅकिंगसाठी १०० टक्के सक्तीची ज्यूट पॅकेजिंग करावी, अशी मागणी सातत्याने होते आहे. तथापी गेल्या काही वर्षांमध्ये या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीचा सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. पुढील तक्त्याच्या माध्यमातून आपल्याला हे लक्षात येईल.

**एकूण ज्यूट उत्पादनाच्या तुलनेत आरक्षणाचे प्रमाण**




**कच्चा मालाचे एकूण उत्पादन आणि आरक्षणाचे प्रमाण**




| वर्ष | कच्च्या ज्यूट मालाचे एकूण उत्पादन (०००मे.टन) | ज्यूट वस्तूंचे एकूण उत्पादन ('००० मे.टन) | सरकारी खात्यावरील आवश्यकता (बी-ट्वील) ('००० मे.टन) | एकूण ज्यूट आणि बी-ट्वीलचे प्रमाण % | कच्चा माल आणि बी-ट्वीलचे प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|
| २००६-०७ | १८००.० | १३५६.३ | ४००.७ | २९.५% | २२.३% |
| २००७-०८ | १७८२.० | १७७६.० | ५५७.९ | ३१.४% | ३१.३% |
| २००८-०९ | १४७६.० | १६३३.७ | ५७२.२ | ३५.०% | ३८.८% |
| २००९-१० | १६२०.० | १३२३.३ | ५३०.७ | ४०.१% | ३२.८% |
| २०१०-११ | १८००.० | १५६५.७ | ६८८.६ | ४४.०% | ३८.३% |
| २०११-१२ | १८४५.० | १५८२.४ | ८६४.२ | ५४.६% | ४६.८% |
| २०१२-१३ | १६७४.० | १५९१.५ | ८८४.१ | ५५.६% | ५२.८% |
| २०१३-१४ | १७८२.० | १५२७.७ | ७७८.१ | ५०.९% | ४३.७% |
| २०१४-१५ | १२९६.० | १२६७.१ | ७२७.५ | ५७.४% | ५६.१% |
| २०१५-१६ | १४४०.० | १२१७.२ | ८२९.० | ६८.१% | ५७.६% |

या कायद्याचा उद्देश असा होता की, भारतीय ज्यूट उद्योग नवनवीन उत्पादने बाजारपेठेत आणेल, नवनवीन संधी निर्माण करेल. मात्र, झाले उलटे भारतीय ज्यूट उद्योग या कायद्यावरच अवलंबून राहिला. तसेच ज्यूट उद्योगाने खुल्या बाजारात आपली उत्पादने विकण्याची क्षमताही गमावली, निर्यात करणे तर दूरच. सध्या ज्यूट उद्योग पूर्णपणे बी-ट्वील या उत्पादनावर अवलंबून आहे. जेपीएम कायद्याच्या माध्यमातून भारतीय ज्यूट उद्योगाला वैविध्यपूर्ण बाजारपेठेचे अर्थशास्त्र समजले नाही. नवीन उत्पादनाची निर्मिती आणि नवीन बाजारपेठेचा शोध अतिशय मर्यादीत राहिला.

बांग्लादेशात ज्यूट उद्योग बाजारपेठेचा समर्थपणे मुकाबला करतोय. कच्च्या ज्यूटचे उत्पादन आणि निर्यात यात बांग्लादेश आघाडीवर आहे. भारत आणि बांग्लादेशातील उत्पादन २००८-०९ कालावधीतील तुलनात्मक तक्त्याच्या माध्यमातून आपल्याला दर्शवता येईल. कच्च्या ज्यूटचे उत्पादन आणि निर्यात याची तुलना केल्यास आपल्या लक्षात येते की भारतीय ज्यूट बाजारपेठेला कायद्याचे कवच असूनही कच्च्या ज्यूटचे उत्पादन कमी आहे. तसेच निर्यातीतही, बांग्लादेशची कामगिरी भारतापेक्षा सरस आहे.

कच्च्या ज्यूटचे उत्पादन (भारत): ज्यूट सल्लागर मंडळ

कच्च्या ज्यूटचे उत्पादन (बांग्लादेश):एफएओ

निर्यात (भारत): डीजीसीआर्यएस,कोलकाता

निर्यात (बांग्लादेश):निर्यात प्रोत्साहन मंडळ बांग्लादेश (www.epb.gov.bd)

भारतीय बाजारपेठ परदेशी बाजारपेठेत आपली छाप पाडू शकली नाही, दुसरीकडे स्थानिक बाजारपेठाही ज्यूट उद्योगाच्या हातून निसटली आहे. कारण, बांग्लादेशकडून स्वस्तात मिळणारे ज्यूट. बांग्लादेशात भारतापेक्षा वीज ३५ टक्क्यांनी स्वस्त स्वस्त आहे. तसेच मजूरी ३० टक्क्यांहून अधिक आहे. याचा फटका भारतीय ज्यूट मिल उद्योगाला बसतो आहे. आंध्र प्रदेशातील दोन ज्यूट मिल नुकत्याच बंद पडल्या आहेत.

**धागा आणि फॅब्रिक्स यामध्ये सुधारणा**

भारतात उत्पादीत होणाऱ्या ज्यूटच्या धाग्याचा दर्जा (फायबर) ही अगदी सामान्य आहे. (टीडी-५ते टीडी-८) याचे प्रमाण एकूण उत्पादनाच्या २/३ पेक्षाही जास्त आहे. अशाप्रकारच्या ज्यूटचे मोठे धागे बनू शकतात.बी-ट्वील पोती याच धाग्यापासून तयार केली जातात. त्यामुळे अशाप्रकारच्या पोत्यांसाठी सरकारनेच बाजारपेठ मिळवून दिली पाहिजे, अशी मागणी आहे. मागणीच नसल्यामुळे शेतकरी उच्च प्रतीच्या धाग्याच्या ज्यूटचे उत्पादन घेत नाही. शेतकऱ्यांना अशा धाग्याचे उत्पादन घेण्यासाठी अधिक काळजी घ्यावी लागते.

ज्यूटला प्रोत्साहन देण्याचे आणखी एक आव्हान म्हणजे उच्च प्रतीच्या उत्पादनांसाठी ज्यूटचा वापर. यामुळे ज्यूट उत्पादक शेतकऱ्यांना चांगला मोबदलाही मिळेल आणि यावर अवलंबून असलेल्या कामगारांना ब्रयापैकी रोजगार मिळेल.

चांगल्या दर्जाच्या ज्यूटच्या उत्पादनासाठी शेतकऱ्यांना उच्च प्रतीची बियाणे, एकरेषीय पेरणी, निर्धारीत वेळेत तणनाशकांचा वापर याकडे लक्ष द्यावे लागेल. सध्याच्या पद्धतीमुळे भरघोस उत्पादन मिळत नाही. आपल्याकडे ग्रामीण भागात सिंचनाच्या मर्यादीत सोयी आहेत. चिखलात आणि घाण पाण्यात चांगल्या प्रतीचे ज्यूट मिळणार नाही.

ज्यूट-आयसीएआरई (ज्यूट: सुधारीत लागवड आणि प्रगत सडवण्याची पद्धत) याचा २०१५ मध्ये

| भारत आणि बांग्लादेश: ज्यूटचे उत्पादन आणि निर्यात | | | | |
|---|---|---|---|---|
| कच्च्या ज्यूटचे उत्पादन | | | एकूण निर्यात (दशलक्ष भारतीय रुपयांमध्ये) | |
| वर्ष | भारत | बांग्लादेश | भारत | बांग्लादेश |
| २००८-०९ | ८२०० | ५१७२ | १२१६१.६ | ५६०४५.८ |
| २००९-१० | ९००० | ५९४५ | ८५९४.६ | NA |
| २०१०-११ | १०००० | ७८०३ | १८५४१.५ | ९०९४६.० |
| २०११-१२ | १०२५० | ७४०५ | २०९४९.६ | ८१९४१.४ |
| २०१२-१३ | ९३०० | ७५७२ | १९११८.० | ९६५७८.७ |
| २०१३-१४ | ९००० | ८००० | २१२१९.५ | ८९१७२.७ |
| २०१४-१५ | ७२०० | NA | १८१३८.१ | ९७२९५.९ |
| २०१५-१६ | ६५०० | NA | १८८९३.९ | १०९५६५.५ |

शुभारंभ करण्यात आला. या माध्यमातून शेतकऱ्यांना अनुदानित दराने बियाणांची विक्री, एकरेषीय पेरणीसाठी मार्गदर्शन, निर्धारीत वेळेत तणनाशकांचा वापर करुन तणांची विल्हेवाट, सडवण्यासाठी नवीन मशीनचा वापर, मर्यादीत पाण्यावर लागवड या बाबींचा यात समावेश आहे.



ज्यूट सडण्यास पूर्वी १८-२२ दिवस लागत होते, नवीन पद्धतीमुळे हे काम एका आठवड्यात होते.

ज्यूट-आयकेअरच्या माध्यमातून दुसरे तंत्रज्ञान म्हणजे नैसर्गिक जीवाणूंची वाढ होऊ देणे. ज्या शेतकऱ्यांना पाण्याची उपलब्धता आहे त्यांच्यासाठी अवघ्या १०-१२ दिवसात ही प्रक्रिया पूर्ण होते.

एकंदरीतच उत्कृष्ट कृषी अर्थशास्त्र आणि पीक पद्धतीमुळे उत्पादकता १५ टक्क्यांनी वाढते. त्यामुळे शेतकऱ्याच्या एकूण उत्पन्नात २५ टक्क्यांनी वाढ होते



कमी प्रतीच्या ज्यूट उत्पादनाकडून उत्तम प्रतीच्या ज्यूट उत्पादनाकडे वळायचे असेल तर मशिनरीमध्ये बदल करणे क्रमप्राप्त आहे. सध्या वापरात असलेले तंत्रज्ञान आणि मशिनरी ब्रिटीशकालीन आहे. त्यानंतर १९८० च्या दशकात तंत्रज्ञानामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. त्याचा वापर ज्यूट उत्पादकांनी केला पाहिजे.

अगदी अलिकडील काळात विकसित झालेले ज्यूट मागाचे तंत्रज्ञान अद्याप भारतात आले नाही. उत्तम प्रतीच्या ज्यूट धाग्यासाठी अशाप्रकारच्या तंत्राची आवश्यकता आहे. काळाची पावले ओळखली पाहिजेत.

**अमर्यादीत उत्पादन आणि विविधप्रकारच्या संधी**

अपारंपरिक ज्यूट उत्पादनांमध्ये भर पडत आहे. विविध प्रकारच्या पिशव्या (हँडबॅग्ज), बाजारखरेदीसाठी लागणाऱ्या पिशव्या, हलके सामान वाहून नेण्यासाठी लागणाऱ्या पिशव्या, सजावटीचे साहित्य, ज्यूट दागिने, भिंतीवरील पडदे अशी उत्पादने तयार केली जात आहेत. पश्चिमी आणि मध्य पूर्वेतील देशांमध्ये ज्यूट रग आणि कारपेटसना चांगली मागणी आहे. काही प्रमाणात टीव्ही कवर, कार्यालयीन स्टेशनरी, अभ्र, चटई, कॅलेंडर्स यांची मागणी वाढत आहे. पर्यावरणाचा विचार करुन खरेदी करणारे ज्यूटच्या वस्तू वापरण्यास प्राधान्य देतात.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत नावाजलेली उत्पादने जसे हॅरोडस, साल्वातोर, फेराग्मो, मार्कस अँड स्पेन्सर, तसेच वॉलमार्ट, केरफोर, टेस्को, एएसडीए, वेटरोज आणि सेन्सबरी यांनीही आता ज्यूटची उत्पादने विक्रीस सुरुवात केली आहे.

काळाची गरज आहे की, आता ज्यूट उत्पादन क्षेत्राने नवनवीन डिझाईन्स आणि ग्राहकांच्या आवडी-निवडी यानूसार उत्पादने बाजारपेठेत आणली पाहिजेत. भारतीय ब्रॅण्डस ग्लोस्टर लाईफस्टाईल, अँजेस, आरबर, बॉलफॅब्स यांनीही बाजारपेठेत आपली ओळख निर्माण केली आहे.

विणलेल्या उत्पादनाबरोबरच बांधकाम आणि फर्निचर उद्योगासाठी लागणारी पूरक सामग्री ज्यूट उद्योगाने पुरवण्याकडे लक्ष द्यावयास हवे.

**जेपीएम कायद्याच्या पलीकडे पाहण्याची आवश्यकता**

ज्यूट उद्योगासाठी अमर्याद संधी आहेत. तंत्रज्ञान आणि उत्पादने यांची सांगड घातली पाहिजे. बांग्लादेशचे उदाहरण आपल्यासमोर आहे. बांग्लादेशने ज्यूट उद्योगाला आपला विकास करण्याची पूर्ण संधी दिली. त्यांचे 'हँडस ऑफ' धोरण यामुळे ज्यूट उत्पादन आणि निर्यातीमध्ये वाढ झाली आहे.

भारतात नेमकी याविपरीत स्थिती आहे. जेपीएम कायदा उद्योगाचा पाठीराखा ठरला आहे. जेपीएम कायद्याला नवा आकार देत या क्षेत्रामध्ये स्पर्धात्मक वाढ कशी होईल ते पाहिले पाहिजे. भारतीय ज्यूट उद्योगाने जागतिक बाजारपेठेत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची आवश्यकता आहे.


■■■

*लेखक केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयात ज्यूट आयुक्तपदी कार्यरत आहेत.*

email: subratagupta65@gmail.com


## प्रकाशन विभागाची राष्ट्रपती भवन विषयक नवी पुस्तके

१) **A Work of Bueaty : The Architecture and Landscape of the Rashtrapati Bhavan:**





राष्ट्रपती भवनाची वास्तु आणि सभोतालच्या परिसराची माहिती या पुस्तकात संग्रहित करण्यात आली असून अशा प्रकारचा हा एकमेव दस्तावेज आहे. १९११ साली ब्रिटिशकालीन भारताची राजधानी कलकत्त्याहुन दिल्ली येथे हलवण्यात आली. त्यावेळी सरकारी वास्तुच्या रुपात राष्ट्रपती भवनची उभारणी कशा प्रकारे झाली आणि त्यासंबधिच्या घटनांची माहिती या पुस्तकात वाचायला मिळेल.

२) **First Garden of the Republic: Nature in The President's Estate:**





या पुस्तकात राष्ट्रपती भवन परिसरात निर्माण कारण्यात आलेल्या भव्यबगीच्यामध्ये बहरलेल्या जैवविविधतेची माहिती शब्दबद्ध करण्यात आली आहे। या विस्तीर्ण हरित परिसराची आणि तेथील सजीवांची कशी निगा राखली जाते याचा उलगडा ह पुस्तक वाचल्यानंतर होतो. कित्येक झाडे, वनस्पती आणि पशु-पक्ष्यानी यापरिसराला आपले वसतीस्थान बनवले आहे, त्यासाठी स्वत:चे समायोजन केले आहे, हे करताना त्यांना कोणत्या आव्हानांचा सामना करावा लागला किंवा आता करावा लागत आहे, याची रंजक माहितीया पुस्तकातून आपल्याला मिळते.

३) **Around India's First Table: Dining and Entertaining at the Rashtrapati Bhavan:**




राष्ट्रपती भवनाती लखान-पान आणि आदरा तिथ्यया बाबतचा `ब्रिटिशकाली नते आजचा भारत या कालखंडाची इंत्यभूत माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे. सुरुवातीला ब्रिटिश व्हॉइसरॉयराष्ट्रपती भवनामध्य`वास्तव्यास असताना फ्रेंच खाद्य पदार्थांची तिथे रेलचेल असे. कालांतराने तेथील व्यंजनाचा प्रवास पाश्यात्य ते भारतीय असा कशा पद्धती ने होत गेला याची रोचक माहिती या पुस्तकात दिलेली आहे. ही माहिती वाचत असताना आपल्याला भारताच्या यशस्वी खाद्य किंवा भोजन 'डिप्लोमेसी'ची अनुभूती घेता येते.

## ४) Arts and Interiors of the Rashtrapati Bhavan:



अतिशय विशाल वास्तू असलेल्या राष्ट्रपती भवनाच्या अंतर्गत सजावटीचा भाग असलेली कलाकुसर आणि मौल्यवान, दुर्मिळ वस्तुंची माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे. तिथ असलेल्या अनेक उच्च दर्जाच्या पेंटिंग्स, उंची फर्निचर आदींचा त्यात समावेश आहे. राष्ट्रपती भवनाच्या विविधदालनामध्ये असलेली वस्त्रे, गालिचे आणि नक्षीकाम- कोरीव काम केलेल्या वस्तू तसेच जतन केलेले अनेक दुर्मिळ दस्तावेज आणि कागदपत्रे यांचाही त्यात समावेश आहे. हे पुस्तक वाचल्यानं बतरराष्ट्रपती भवनाच्या अंतर्गतसजावटीची कल्पनातर वाचकांना येतेच शिवाय एका अदभुत जगात प्रवेश केल्याची ही अनुभूती येते.

## ५) Discover the Magnificent World of the Rashtrapati Bhavan:




हे छोटे खाणी पुस्तक ख़ास लहान मुलांसाठी प्रकाशित करण्यात आले आहे. राष्ट्रपती भवनाची कहानी यात रेखाटण्यात आली आहे. या भव्यवास्तुची उभारणी कशी झाली, या वास्तुने कोणकोणत्या ऐतिहासिक घटना अनुभवल्या, राष्ट्राच्या जडणघडणीत यावास्तुचा कसा हात भार लागला तसेच इथे कोणी कोणी आणि कसे वास्तव्य केले याबद्दलची सुरस माहिती कथा आणि वर्णणाच्या स्वरुपात या पुस्तकात रंजकपणे देण्यात आली आहे.



विशेष लेख

# वस्त्रोद्योगाची व्यापकता

बहुविध

प्रकाश वासूदेवन



**वस्त्रांचा उपयोग फक्त कपड्यापुरता मर्यादित नाही तर अन्य कापडविरहित वस्तुंमध्ये म्हणजे पाळण्यापासून ते शवपेटिकेपर्यंत त्यांचा व्यापक वापर केला जातो. अशा विशिष्ट शेवटच्या पायरीवरील उपयोगाकरता वापरण्यात येणाऱ्या वस्त्रांना तांत्रिक वस्त्रे म्हटले जाते. तांत्रिक वस्त्रे ही त्यांच्या सौंदर्यविषयक किंवा सजावटीच्या ऐवजी तांत्रिक व कामगिरीच्या वैशिष्ट्यांकरता उत्पादित केली जातात.**

मानवी आयुष्यात वस्त्रे अत्यंत महत्वाची भूमिका बजावतात. वस्त्रांचा उपयोग फक्त कपड्यापुरता मर्यादित नाही तर अन्य कापडविरहित वस्तुंमध्ये म्हणजे पाळण्यापासून ते शवपेटिकेपर्यंत त्यांचा व्यापक वापर केला जातो. अशा विशिष्ट शेवटच्या पायरीवरील उपयोगाकरता वापरण्यात येणाऱ्या वस्त्रांना तांत्रिक वस्त्रे म्हटले जाते. तांत्रिक वस्त्रे ही त्यांच्या सौंदर्यविषयक किंवा सजावटीच्या ऐवजी तांत्रिक व कामगिरीच्या वैशिष्ट्यांकरता उत्पादित केली जातात.

वस्त्रांचा कच्चा माल, रचना, त्यावर केले जाणारे शेवटचे संस्कार आणि तयार कपडे/रुपांतराचे तंत्र यांचा वापर साध्या स्वच्छतेच्या फडक्यापासून ते अत्यंत मजबूत अशा रचनेपर्यंत आणि विणलेल्या कपड्यांपर्यंत विविध प्रकारची तांत्रिक वस्त्रे तयार करण्यासाठी केला जाऊ शकतो. तांत्रिक कारणांसाठी वस्त्रांचा वापर हा मानवी जातीसाठी नवा नाही. पूर्वी अशा प्रकारच्या वस्त्रांची रचना ही आज वापरल्या जाणाऱ्या वस्त्रांच्या तुलनेत खूपच साधी होती.आज तांत्रिक वस्त्रे ही कामगिरी आणि कार्यक्षमतेच्या बाबतीत त्यांच्या उत्पादनासाठी वापरला गेलेला नवा कच्चा माल, रचना, रसायने अथवा त्यांचा संयोग यामुळे अत्यंत प्रगत आहेत.

तांत्रिक वस्त्रांची आगळीवेगळी वैशिष्ट्ये, सच्छिद्र रचना, हलके वजन, जाडीच्या तुलनेत लांबीचे उच्च गुणोत्तर, टांगली जाण्याची क्षमता आणि अशा कित्येक कारणांमुळे प्लॅस्टिक, धातू, फिल्म यापेक्षा तांत्रिक वस्त्रांचा वापर अंतिम उपयोगाकरता जास्त पसंत केला जातो. आधुनिक तांत्रिक वस्त्रे ही जास्त कार्यक्षम आहेत कारण अशा वस्त्रांची रचना ही विशिष्ट अंतिम उपयोग साध्य करण्यासाठी कच्चा माल/पॉलिमर फायबरची (तंतू) रचना व गुणधर्म, धाग्याची रचना व गुणधर्म, तयार कपडे व उत्पादनाची रचना व गुणधर्म यांच्या निवडीपासून सुरू होते.

अनेक तांत्रिक वस्त्रे ही तंतुमय रचना म्हणून उत्पादित केली जातात. (उदा. शस्त्रक्रियेसाठी वापरली जाणारी कापसापासून तयार केलेली वस्त्रे जसे की कापूस लोकरीची गुंडाळी, रक्तस्त्राव थांबवण्यासाठी वापरला जाणारा तंतुमय पॅड, साऊंड प्रुफ, हीट प्रुफ कुशन, उशा, रबरी नळी, इमारतीच्या छताची रचना यासाठी वापरले जाणारे कृत्रिम वस्त्रे आदी.) जखम बंद करण्यासाठी वापरले जाणारे टाके, दोऱ्या तयार करण्यासाठी धागा, तंतुंचा वापर केला जातो. तांत्रिक वस्त्रे ही विविध प्रकारच्या कापडाच्या रचनेचा वापर करुन बनवली

जातात उदा. विणलेले (बेडशीट्स, शस्त्रक्रियेसाठी वापरली जाणारे गाऊन्स, मिश्र उत्पादनांसाठी कार्बन/काचेने विणलेले कपडे, गालिचे, आसनांसाठी वापरले जाणारे कापड, बँडेजेस), एकत्र पक्के विणलेले (हार्निया मेश, खेळाडू वापरत असलेले वेश, कॉंप्रेशन तंत्र वापरून बनवलेले तयार कपडे, स्पेसर फॅब्रिक आदी.) रक्तवाहिन्यांसंबंधी वापरले जाणारे ग्राफ्ट, नळीच्या रचनेतील बँडेजेस, मासे पकडण्याचे जाळे, उपग्रहाचा अँटेना आदी.) न विणलेले (तंतु अभियांत्रिकीसाठी वापरले जाणारी परात, आतील त्वचेसाठी फिल्टर, पुसण्यासाठी फडके, विल्हेवाट लावता येण्याजोगे, पिकावरील आच्छादन, बियाणांवरील आच्छादने, तणनियंत्रक कपडा, विद्युतप्रवाहापासून अलग ठेवण्यासाठी वापरली जाणारी टेप्स), गुंफलेले (जखम बंद करण्यासाठी वापरला जाणारा टाका, दोऱ्या, स्टेंट्स, अस्थिबंध, स्नायूबंध, रेशमाच्या किड्याच्या कोशावरील रेशमी धागे) कशिदा केलेले (मनगटावरील पट्टी, कशिदा केलेले सर्किट्स) आणि या सर्वांचे संयोग झालेल्या रचना (बेबी डायपर्स, सॅनिटेशन नॅपकीन्स).

अनेक तांत्रिक वस्त्रे (TT) विशेष/कार्यक्षम अशी फिनिशिंग, कोटिंग, लॅमिनेशन्ससह बनवली जातात. (उदा. अग्नीविरोधी, अँटी मायक्रोबायल, ब्रेथेबल फिनिशेस, द्रवापासून वाचवण्यासाठी बनवलेली गेलेली क्रीम आदी.)

**भारतातील तांत्रिक वस्त्रे उद्योगासाठी संधी आणि घटक**

- भारतीय ग्राहकांचे वाढलेले उत्पन्न आणि म्हणून वाढलेली क्रयशक्ती : भारतीय ग्राहक आता अधिक आराम, सुधारलेले राहणीमान, चैन, हायजीन, स्वच्छता, संरक्षण यावर अधिक खर्च करू लागला आहे. उदा. फडकी, सॅनिटरी नॅपकीन, बेबी डायपर्सचा वापर वाढला असून जे काही वर्षांपूर्वी घडत नव्हते.

-तांत्रिक वस्त्रांची मागणी ही विशिष्ट क्षेत्राच्या वाढीवर अवलंबून असते. उदा. वाहन क्षेत्राच्या झपाट्याने झालेल्या वाढीमुळे वाहन क्षेत्रातील वस्त्रांची मागणी वाढली आहे. शहरी भारतात नवीन आधुनिक रुग्णालयांची संख्या वाढल्याने वैद्यकीय क्षेत्रातील पर्यटन वाढल्याने वैद्यकीय वस्त्रांची मागणी वाढली आहे.

-इंटरनेट, टीव्ही यांच्या वाढत्या प्रभावामुळे बहुसंख्य भारतीय ग्राहक आता तांत्रिक वस्त्रे व परवडण्याजोग्या किमतीबद्दल जागरूक झाले आहेत. उदा. कृषी तांत्रिक वस्त्रांचा उपयोग समजल्यामुळे अनेक शेतकरी आता कृषी वस्त्रांचा वापर करू लागले आहेत.

-तांत्रिक वस्त्रोद्योग हा मोठ्या प्रमाणावर तंत्र-ज्ञानाभिमुख, अंतर्गत शिस्तीचा व भारतीय वस्त्रोद्योजकांसाठी तुलनेत नवा असल्याने नवीन व्यावसायिकांसाठी फारशी स्पर्धा नाही.

-लोकसंख्यावाढ आणि वाढलेले आयुष्यमान : उच्च जन्मदरामुळे भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा लोकसंख्या असलेला देश असून आयुष्यमानही वाढलेले आहे, ज्याच्या परिणामी हायजीन वैद्यकीय वस्त्रांसारख्या तांत्रिक वस्त्रांची मागणी तयार होऊन टिकून राहते.

-अधिक सुसंघटित रिटेल आणि ऑनलाईन व्यवसायांमुळे वितरण व ग्राहकांपर्यंत पोहचण्याची प्रणालीत अधिक सुधारणा झाली असून त्यामुळे तांत्रिक वस्त्रोद्योगाच्या वाढीला सहाय्य झाले आहे.

-पारंपरिक वस्त्रांच्या तुलनेत तांत्रिक वस्त्रांमधून मिळणारे उत्पन्न जास्त असल्याने व्यावसायिक आकर्षिले जातात.

-तांत्रिक वस्त्रांचा अत्यंत कमी वापर : जागतिक स्तरावरील तांत्रिक वस्त्रांच्या वापराच्या तुलनेत भारतात घरगुती तांत्रिक वस्त्रांचा वापर अत्यंत कमी आहे, म्हणून उच्च वाढीची शक्यता जास्त आहे. भारतीय ग्राहकांचा जागतिकीकरण/पाश्चात्यीकरणाकडे वळलेला सांस्कृतिक कल तसेच चांगल्या उत्पादनांच्या वापराबाबत माहितीत झालेली वाढ यामुळे घरात वापरली जाणारी वस्त्रे, मोबाईल तंत्र, स्पोर्टटेक अशा विविध तांत्रिक वस्त्रांचा वापर अगोदरच वाढला आहे.

-विशिष्ट तांत्रिक वस्त्र उत्पादनांबाबत उद्योगातून वाढलेली मागणी

-भारत हा वस्त्रोद्योगावर आधारित जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. त्यामुळे अत्यंत मजबूत अशी संपूर्ण पुरवठा साखळी, मजबूत आयात-निर्यात संबंध, पायाभूत सुविधा असल्याने तांत्रिक वस्त्रोद्योग क्षेत्राला त्याचा फायदा होत आहे.

-वाढते आणि जागतिकीकरणाकडे ओढली जाणारी बाजारपेठ

-पारंपरिक वस्त्रोद्योगाची संपूर्ण माहिती असलेला स्वस्तातील कामगारवर्ग तांत्रिक वस्त्रोद्योगाच्या वाढीसाठी उपयुक्त ठरू शकतो.

**तांत्रिक वस्त्रांची मागणी**

निव्वळ आकारावर आधारित तांत्रिक कपड्यांची बाजारपेठ २०२० पर्यंत ४ कोटी २२ लाख मेट्रिक टनांपर्यंत वाढण्याची अपेक्षा असून २०१५ ते २०२० पर्यंत ४.६८ टक्के सीएजीआर असेल. दुसऱ्या एका अहवालात तांत्रिक कापडाची बाजारपेठ २०१४-२०१९ या कालावधीत ३.७१ टक्के दराने वाढेल, असे भाकीत वर्तवण्यात आले आहे. (३) मात्र किमतीच्या संदर्भात तांत्रिक कापडाचे विविध विभाग

भारतात ८ ते १९ टक्के वार्षिक दराने वाढत असून एकूण तांत्रिक कापडाच्या उत्पादनाच्या सरासरी सीएजीआर ११ टक्के आहे. भारताच्या जीडीपीत तांत्रिक कापडाचे योगदान ०.७५ टक्के असून एकूण भारतीय कापड उत्पादनाच्या हे प्रमाण १२ टक्के आहे तर चीनमध्ये हेच प्रमाण २० टक्के आहे. २०१७-१८ पर्यंत भारतातील तांत्रिक कापडाचा उद्योग १,१६,२१७ कोटी रुपयांपर्यंत वाढेल, अशी अपेक्षा आहे. जागतिक तांत्रिक कापड उत्पादनात भारताचा वाटा अवघा ३ टक्के आहे तर चीन व युरोप जगातील ७५ टक्के तांत्रिक कापडाचे उत्पादन करतात. तांत्रिक कापड उत्पादने ही खाली दिलेल्या १२ गटांत विभागली जातात.

-ऍग्रोटेक (कृषी, फलोत्पादन आणि वनीकरण)

-बिल्डटेक (इमारत बांधकाम)

-क्लोथटेक (बूट आणि वस्त्रांचे तांत्रिक घटक)

-जिओटेक (भूवस्त्रोद्योग, बांधकाम अभियांत्रिकी)

-होमटेक (फर्निचर, घरगुती घरगुती वस्त्रे , आणि जमिनीवरील आच्छादनांचे घटक)

-इंडुटेक (फिल्टरेशन, स्वच्छता आणि अन्य औद्योगिक वापर)

-मेडिटेक (आरोग्यशास्त्र आणि वैद्यकीय)

- मोबिलटेक (वाहने, जहाजे, रेल्वे आणि विमाने)

-ओकोटेक (पर्यावरणीय संरक्षण)

-पॅकटेक (पॅकेजिंग)

-प्रोटेक (वैयक्तिक तसेच मालमत्ता संरक्षण)

-स्पोर्टटेक (क्रीडा व फावला वेळ घालवण्याची साधने)

**आव्हाने**

- विशेष कच्च्या मालाचा अभाव

अत्यंत उत्कृष्टरित्या प्रस्थापित झालेल्या पुरवठा साखळीमुळे भारताला पारंपरिक वस्त्रोद्योगासाठी कच्च्या मालाच्या उपलब्धतेसंदर्भात मोठाच फायदा मिळतो. मात्र तांत्रिक कापडासाठी तंतु, धागे, कापड आदी विशेष आणि उच्च कामगिरी करणाऱ्या कच्च्या मालाच्या अनुपलब्धतेचा तोटा तांत्रिक वस्त्रोद्योगाला आहे. भारताला अशा प्रकारचे जवळपास सर्वच साहित्य आयात करावे लागत आहे ज्यामुळे किमत व वेळ वाढून स्पर्धात्मकतेवर परिणाम होतो.

**तंत्रज्ञानाचा अभाव**

पारंपरिक वस्त्रे तयार करण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञानावर भारताची जोरदार हुकूमत आहे परंतु प्रगत तांत्रिक कापड उत्पादित करण्यासाठी लागणाऱ्या प्रगत तंत्रज्ञानाचा अभाव आहे. कच्च्या मालाप्रमाणेच तांत्रिक कापड उत्पादनासाठी लागणारी बहुतेक सर्व यंत्रे अजूनही आयात केली जात आहेत आणि त्यामुळे प्रकल्प खर्चात महत्वपूर्ण वाढ होते.

**आंतरशाखीय दृष्टीकोन, नव्या उत्पादनांचे प्रमाणित व परिणामकारक मार्केटिंग**

तांत्रिक कापड उद्योगात नव्या उत्पादन विकासासाठी बहुस्तरीय शिस्तीचा दृष्टीकोन आवश्यक असतो. एकदा उत्पादन विकसित केले की, किफायतशीर औद्योगिक प्रमाणभूत उत्पादन तंत्रज्ञान तसेच मार्केटिंग हे दुसरे आव्हान असते.

**कुशल मनुष्यबळाचा अभाव**

तांत्रिक कापड उत्पादने ही जास्त करुन कार्यक्षमतेवर आधारित गुंतागुंतीची रचना असल्याने तंत्राच्या विविध शाखांच्या उच्च प्रतीच्या ज्ञानाची आवश्यकता असून कामगारांपासून ते व्यवस्थापकांपर्यंत कुशल मनुष्यबळ विकसित करण्याची गरज आहे. उदाहरणार्थ वैद्यकीय तांत्रिक कापड निर्मितीसाठी वैद्यकीय शास्त्र व वस्त्रोद्योगाची माहिती असणे आवश्यक असून भू वस्त्रोद्योगासाठी बांधकाम अभियांत्रिकी व कापडनिर्मितीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**योग्य निकष/प्रमाणांचा अभाव**

तांत्रिक कापड उद्योग हा बाल्यावस्थेत असल्याने अनेक तांत्रिक कापड उत्पादनांसाठी निकष/प्रमाण उपलब्ध नाहीत किंवा अस्तित्वात असलेले अनेक निकष कालबाह्य झालेले आहेत. या निकषांत सुधारणा करण्याची अथवा नवीन निकष तयार करण्याची तातडीची गरज आहे. त्यामुळे ग्राहकांसाठी अत्यंत योग्य असलेल्या उत्पादनांची निर्मिती करण्यास उद्योगाला मदत होणार आहे.

**जागृतीचा अभाव**

भारतात नागरीकरण आणि शिक्षणाच्या प्रमाणात वाढ होत असली तरीही भारतीय लोकसंख्येचा बहुतांशी भाग हा ग्रामीण भागांत/गरीबीच्या अवस्थेतच राहत आहे. त्यापैकी अनेकांना तांत्रिक कापडाची जाणीवच नाही अथवा त्यांना तांत्रिक कापड उत्पादने परवडत नाहीत.

**जागतिक संशोधन व विकास सुविधांचा अभाव**

भारतीय विद्यापीठे/महाविद्यालये/ संशोधन आणि विकास केंद्रांनी उत्पादनाभिमुख संशोधन व विकासावर स्पष्ट भर देणारी जागतिक दर्जाची संशोधन व विकास केंद्रे उभारण्यासाठी अधिक गुंतवणूक करण्याची गरज आहे.

**समान संहिता पद्धतीचा अभाव**

निर्यातीसाठी तांत्रिक कापड उत्पादने ओळखून वेगळी करण्यासाठी तांत्रिक कापडांसाठी एकसमान संहिता पद्धतीची (coding system) (एचएसएन कोड)

आवश्यकता आहे.

**उत्तम संघटित तांत्रिक वस्त्रोद्योग क्षेत्राचा अभाव**

भारतातील तांत्रिक वस्त्रोद्योग क्षेत्र हे प्रामुख्याने लघु व मध्यम व्यवसाय (एसएमई) क्षेत्रात आहे आणि पारंपरिक वस्त्रोद्योग उत्पादन क्षेत्रापेक्षा अधिक विकेंद्रित आहे.

**व्यवसायविशिष्ट पायाभूत सुविधांचा अभाव**

तांत्रिक कापड उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी सहज उपलब्ध होणारी पुरवठा साखळी, पाणी, कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था, चाचणीसाठी प्रयोगशाळा, टेलिकम्युनिकेशन्स, उच्च वेगाचे इंटरनेट या संदर्भात नवीन पायाभूत सुविधा विकसित करण्याची गरज आहे.

**कचरा व्यवस्थापन पद्धती आणि नियमनांचा अभाव**

विशिष्ट तांत्रिक कापड उत्पादनांसाठी योग्य कचरा व्यवस्थापन उपाययोजना करण्याची तातडीची गरज आहे, विशेषत: सॅनिटरी नॅपकीन्स, बेबी डायपर्स, रुग्णालयातील दूषित कचरा अशा मोठ्या प्रमाणात होणाऱ्या उत्पादनांमधून निर्माण होणाऱ्या कचऱ्याची पर्यावरण स्नेही पद्धतीने विल्हेवाट लावण्याची गरज आहे.

**वैद्यकीय वस्त्रोद्योग क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारचा पुढाकार**

तांत्रिक वस्त्रोद्योग क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने जाहीर केलेल्या योजनांची यादी खाली दिली आहे.

-तांत्रिक वस्त्रोद्योग वृद्धी आणि विकास योजनेचा (एसजीडीटीटी) हेतू तांत्रिक वस्त्रोद्योगाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याचा (सीओई) असून तांत्रिक वस्त्रोंद्योगाशी संबंधित अचूक माहिती गोळा करण्यासाठी मुळापासून सर्वेक्षण करण्याचा हेतू आहे.

-तांत्रिक वस्त्रोद्योगावर तंत्र-ज्ञानाविषयक मोहीम (टीएमटीटी) : वस्त्रोद्योग मंत्रालयाने टेक्नॉलॉजी मिशन ऑन टेक्निकल टेक्सटाईल्स दोन लहान मोहिमांसह सुरू केली आहे. मिनी मिशन १ आणि मिनी मिशन २ या दोन योजनांचा हेतू चाचणी सुविधा, कुशल मनुष्यबळ, संशोधन व विकास, सुधारित नियामक उपाय, वैशिष्ट्ये आणि प्रमाण तयार करणे, व्यावसायिकतेला प्रोत्साहन, बाजारपेठीय विकास समर्थन, एचएस कोड निश्चित करणे, फोकस इनक्युबेशन केंद्रे उभारणे या संदर्भात प्राथमिक पायाभूत सुविधांत सुधारणा घडवणे हा आहे.

१. फोकस इनक्युबेशन केंद्रांचा हेतू (एफआयसी) सल्लागार व मदतनीस या स्वरुपाचे मॉडेल तयार करण्याचा आहे. व्यापारी पद्धतीने उत्पादन घेण्यासाठी पूर्ण प्रमाणात उत्पादन सुविधा पुरवल्या जातील.
२. नवीन व्यावसायिक व्यवसायात स्थिरस्थावर होत नाहीत तोपर्यंत एफआयसीची सुविधा त्यांना पुरवण्यात येईल आणि नंतर ते स्वत:च्या व्यवसायांकडे वळतील.
३. भारतात कृषी वस्त्रांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी योजना (ईशान्य प्रदेश वगळून)
४. ईशान्य भारतात कृषी वस्त्राच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी योजना
५. ईशान्य भारतात भू तांत्रिक वस्त्राच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी योजना
६. याव्यतिरिक्त भारतातील अनेक राज्य सरकारे गुंतवणूकदारांसाठी विविध प्रोत्साहक उपाय व सहाय्य पुरवते जसे की नव्या आणि अद्ययावत यंत्रांसाठी कर्ज सुविधा (टेक्नॉलॉजी अपग्रेडेशन फंड स्कीम) आणि अमेंडेड टेक्नॉलॉजी अपग्रेडेड फंड स्कीम)
७. एसआयटीपी (स्कीम फॉर इंटग्रेटेड टेक्सटाईल पार्क)
८. प्रमुख तांत्रिक वस्त्र उत्पादन यंत्रांसाठी सीमा शुल्कात सवलत
९. फोकस प्रॉडक्ट स्कीम फॉर टेक्निकल टेक्सटाईल : एमईआयएस - तांत्रिक कापड निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी निर्यात शुल्कात सवलत
१०. तांत्रिक कापड उत्पादनांसाठी वस्त्रोद्योग मंत्रालय नियमनाचे निकष निश्चित करण्यासाठी काम करत असून त्यामुळे भारतात तांत्रिक कापड उत्पादनांची मागणी व वापर वाढण्यास मदत होणार आहे.
११. तांत्रिक कापडांसाठी उत्कृष्टता केंद्रे (सेंटर ऑफ एक्सलन्स) : तांत्रिक कापडासाठी सेंटर ऑफ एक्सलन्स चाचणी, प्रशिक्षण, उत्पादन विकास, माहिती स्त्रोत या संदर्भात उद्योगाला सहाय्य करण्यासाठी स्थापन करण्यात आली आहेत.

या उत्कृष्टता केंद्रांमध्ये (सीओईज) निर्माण करण्यात आलेल्या अत्यावश्यक सुविधा खालीलप्रमाणे आहेत.

-राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय प्रमाणांनुसार उत्पादनांची चाचणी व मूल्यांकनासाठी अधिस्वीकृत सुविधा

-पुस्तके, आदर्श प्रमाण, नमुना यासह स्त्रोत केंद्रे

-जागतिक दर्जाचे संशोधन व विकासाकरता सुविधा तसेच परदेशी संस्था/प्रयोगशाळांशी सहकार्य करुन मूळ नमुन्याचा (prototype) विकास करण्यासाठी सुविधा

-तांत्रिक कापड उद्योगातील लोकांसाठी प्रशिक्षण सुविधा

-भागधारकांना माहिती देणे तसेच सल्लामसलत

-नवीन व्यावसायिकांसाठी एका विशिष्ट विभागावर लक्ष केंद्रित करून प्लग अँड प्ले पद्धतीची फोकस इनक्युबेशन केंद्रे

-उद्योजक आणि व्यावसायिकांसाठी सेंटर ऑफ एक्सलन्समधून सल्ल्याची सुविधा


कोड निश्चित करणे

- तांत्रिक वस्त्रोद्योगात थेट परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन देऊन तांत्रिक कापड उद्योगात गुंतवणुकीला चालना
- तांत्रिक कापडाच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी नियमन करणारी यंत्रणा
- तांत्रिक वस्त्रोद्योगासाठी प्रमाण/ निकषांचे सुसूत्रीकरण

हे नवे उभरते क्षेत्र आहे. फिल्टरेशन, संरक्षण, प्रतिबंध, पृथक्करण, कम्फर्ट, आरोग्यशास्त्र, ताकद, दीर्घायुष्य अशा विशेष कार्यासह वैद्यकीय, बांधकाम अभियांत्रिकी, वाहने आदी क्षेत्रात तांत्रिक कापडाचा वापर केला जातो. जागतिक सरासरीच्या तुलनेत भारतात तांत्रिक कापडाचा दरडोई वापर अत्यंत कमी आहे. स्वस्त मनुष्यबळ, कच्च्या मालाची उपलब्धता, विशाल देशांतर्गत बाजारपेठ

**Table १ List of centres of excellence for technical textiles in India**

| क्रमांक | संस्थेचे नाव | तांत्रिक कापड विभाग |
|---|---|---|
| १ | द.सिंथेटिक अँड आर्ट सिल्क मिल्स रिसर्च असोसिएशन | कृषीतंत्र |
| २ | अहमदाबाद टेक्सटाईल्स इंडस्ट्रिज रिसर्च असोसिएशन, अहमदाबाद | संयुक्त |
| ३ | बॉम्बे टेक्सटाईल्स रिसर्च असोसिएशन | भू-तंत्र वस्त्रोद्योग |
| ४ | पीएसजी कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी, कोइमतूर | इंडटेक |
| ५ | द साऊथ इंडिया टेक्सटाईल रिसर्च असोसिएशन कोईमतूर | मेडिटेक |
| ६ | डीकेटीई सोसायटीज टेक्सटाईल रिसर्च अँड इंजिनिअरिंग इन्स्टिटयूट, इचलकरंजी | गैरविणकाम |
| ७ | नॉदर्न इंडिया टेक्सटाईल रिसर्च असोसिएशन, गाझियाबाद | प्रोटेक |
| ८ | वर्ल्ड रिसर्च असोसिएशन, मुंबई | स्पोर्टटेक |




अशा आगळ्यावेगळ्या फायद्यांमुळे अनेक तांत्रिक कापड उत्पादन करणाऱ्या देशांच्या तुलनेत भारत आज लाभदायक स्थितीत आहे.आज सरकारी धोरणे ही सहाय्यकारी असल्याने या उदयाला येणाऱ्या उद्योगात भरपूर संधी असून त्यामुळे उतरणीला लागलेल्या पारंपरिक वस्त्रोद्योकाला पुन्हा उर्जित अवस्थेत येऊन तसेच तांत्रिक कापड क्षेत्रात प्रवेश करून वैविध्य जपण्याची संधीही पुरवली जाते.

सरकार यासाठीही काम करत आहे.

-सध्या अस्तित्वात असलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्सच्या माध्यमातून संशोधन आणि विकासात पीपीपी मॉडेलला प्रोत्साहन

- कुशल मनुष्यबळाचा विकास
- निर्यात प्रोत्साहन
- तांत्रिक कापडासाठी एचएसएन

-संस्थात्मक वापरकर्त्यांमध्ये तांत्रिक कापडाच्या वापराला प्रोत्साहन

-तांत्रिक वस्त्रोद्योग यंत्रांच्या उत्पादनाला प्रोत्साहन

-या नवोदित उद्योगावर सातत्याने देखरेख

**सारांश**

वस्त्रोद्योग क्षेत्रात तांत्रिक वस्त्रे उत्पादन


■■■

*लेखक साऊथ इंडिया टेक्सटाईल रिसर्च असोसिएशन, कोईम्बतूर चे संचालक आहेत.*

email: director@sitra.org.in

# भारतीय कापड उद्योगाला चालना

डॉ. कविता गुप्ता



**भारतीय वस्त्रोद्योग हा उत्पादनात पुढे आहे आणि याचाच आधार घेऊन तो आपली निर्यातीमधील कामगिरी सुधारत आहे. लोकांना रोजगार पुरवण्याच्या बाबतीत शेतीनंतर भारतात कापड उद्योग दुसऱ्या क्रमांकावर आहे. ४५ दशलक्ष लोकांना तो प्रत्यक्ष काम देतो आणि ६० दशलक्ष लोकांना अप्रत्यक्ष काम देतो. भारताच्या स्थूल घरगुती उत्पादनाच्या ४टक्के वाटा हा वस्त्रोद्योगाचा आहे. त्यामुळे भारतीय विकास मार्गाला तो चांगल्या रीतीने आकार देत आहे.**

जेथे कच्चा माल ते तयार कापड, धागे ते किरकोळ बाजार थोडक्यात शेतापासून वेगवेगळया वेशभुषा रीतींबाबत सर्व एकत्रित स्वरुपात आढळते. असा भारतीय वस्त्रोद्योग हा जगातील अत्यंत कमी व्यवसायांपैकी एक आहे. भारतीय वस्त्रोद्योग हा उत्पादनात पुढे आहे आणि याचाच आधार घेऊन तो आपली निर्यातीमधील कामगिरी सुधारत आहे. लोकांना रोजगार पुरवण्याच्या बाबतीत शेतीनंतर भारतात कापड उद्योग दुसऱ्या क्रमांकावर आहे. ४५ दशलक्ष लोकांना तो प्रत्यक्ष काम देतो आणि ६० दशलक्ष लोकांना अप्रत्यक्ष काम देतो. भारताच्या स्थूल घरगुती उत्पादनाच्या ४टक्के वाटा हा वस्त्रोद्योगाचा आहे. त्यामुळे भारतीय विकास मार्गाला तो चांगल्या रीतीने आकार देत आहे. वस्त्र उत्पादनाचा वैभवशाली वारसा, अनेक प्रकारच्या धाग्यांचा मजबूत पाया, मोठी आणि वाढती उत्पादनक्षमता, अत्यंत कमी आयात, कुशल कर्मचाऱ्यांची आणि तांत्रिक व व्यवस्थापन कुशल व्यक्तींची मोठी संख्या, लवचिक उत्पादन पद्धती, मोठी आणि वाढती बाजारपेठ, उत्साही जोशपूर्ण उद्योजकता इ. वैशिष्टये या उद्योगाची अंगभूत बलस्थाने आहेत. मात्र काही उणिवांमुळे ही बलस्थाने थोडी कमजोर झाली आहेत आणि त्याचा उत्पादन, दर्जा आणि किंमतीच्या बाबतीतील स्पर्धात्मकता याबाबतीत प्रतिकूल परिणाम जाणवत आहे. या उणिवा म्हणजे कालबाहय तंत्रज्ञान, संरचनेतील विसंगती, कामगारांची कमी उत्पादनक्षमता, आर्थिक धोरणात सातत्य न राखणे, कर आणि पट्टी यांचा गुणाकार, भांडवलाची जास्त किंमत, तुलनेने कामगार आणि औद्योगिक कायद्यांची जाचक बंधने, आक्रमक प्रचार वा जाहिरात न करणे, वाहतुकीच्या बाबतीत अत्यंत निम्न सोयी, वीज दर जास्त असणे इ.

कालबाहय तंत्रज्ञानावर मात करण्यासाठी आधुनिकतेची कास धरावी लागेल आणि सतत या बाबतीत प्रयत्न चालू ठेवावे लागतील. आधुनिकीकरणाने उत्पादन वाढते, दर्जा सुधारतो, उत्पादनाचा खर्च कमी होतो. कामगारांची कार्यक्षमता वाढते. उत्पादनाच्या प्रत्येक एककामागे येणारा ऊर्जा आणि देखभाल खर्च कमी होतो. सर्वसाधारणरित्या असा अनुभव आहे की जेथे आधुनिकता पद्धतशीर आणि सतत राबवली जाते. त्याच उद्योगांचा वाढीचा दर दीर्घकाळ टिकतो. आधुनिकतेचा तुरळक वा अधूनमधून


अंगीकर करण्याने चांगले परिणाम टिकून राहात नाहीत. त्यामुळे दूरगामी धोरण म्हणून या उद्योगाने तंत्रज्ञानात सातत्याने अद्ययावत करण्यासाठी पुरेशी साधनसंपत्ती वळवली पाहिजे.

याचा विचार करून भारत सरकारने तंत्रज्ञान अद्ययावतीकरण निधी योजना(TUFS)१९९९ मध्ये सुरु केली.TUF योजनेमुळे कापड उद्योगाची आधुनिकता आणि प्रचार याला चांगली चालना मिळाली हे अनेक अभ्यासातून सिद्ध झाले आहे.

माग क्षेत्र आणि इतर संबंधित क्षेत्रांना याचा लाभ झाला. कापड विणणे त्यावरील प्रक्रिया आणि कपडे तयार करणे ही क्षेत्रे याचा लाभ घेण्यात थोडी मागे आहेत. त्यामुळे कापडाच्या किंमत साखळीत थोडे कमकुवत दुवे राहिले आहेत. शिवाय कापडाच्या किंमत साखळीचा विकासही थोडा असंतुलित राहिला आहे.

तंत्रज्ञान अद्ययावतीकरण निधी योजना(TUFS)या योजनेने २७१५ हजार दशलक्षाच्या गुंतवणुकीद्वारे मागील १६ वर्षांत या क्षेत्राला चालना दिली हे तुम्हाला या आलेखातून समजेल.

वस्त्रोद्योग क्षेत्र आणि TUFS (तंत्रज्ञान अद्ययावतीकरण निधी




एकंदर गुंतवणूकTUFSखालील गुंतवणूक

| | सूची |
|---|---|
| स्रोत-RTUFS & RRTUF २०१४-२०१५ यांचा परिणाम वझीर अभ्यास अहवाल | TUFS (1/4/1999 to 31/03/2007)<br>MTUFS (1/4/2007 to 28/6/2010)<br>RTUFS & RRTUFS (28/4/2011 to 12/1/2016) |


विकासाच्या मार्गाच्या एका स्तरावरून दुसऱ्या स्तराकडे झेपावता यावे यासाठी जे आधुनिकीकरण करावे लागते त्यासाठी सुधारित तंत्रज्ञान अद्ययावतीकरणनिधी योजना (ATUFS)१३ जानेवारी २०१६ पासून अस्तित्वात आली याशिवाय सरकारच्या संशोधन आणि विकास योजनाही यासाठी लाभदायक ठरतात. सरकार मूलभूत संशोधनाला पूर्ण प्रोत्साहन देते. उपयोजित संशोधनाला ७० टक्के मदत करते आणि ६० टक्के मदत उद्योगांनी केलेल्या संशोधनाला देते. जी विद्यापीठे आणि वस्त्र संशोधन संस्था वा इतर संषोधन संस्था यांचा उद्योगांशी याबाबतीत करार झालेला असतो, त्यांना ही मदत मिळते.

TUFS वर नुकताच अभ्यास झाला. त्यानुसार तंत्रज्ञान अद्ययावतीकरण निधी योजनेचा प्रारंभापासून ३१-३-२०१५ पर्यंत भारतीय वस्त्रोद्योगातील गुंतवणुकीत ७९ टक्के वाटा आहे.

आधुनिकीकरण आणि वस्त्रोद्योगातील रोजगार यांना चालना मिळावी यासाठी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रीमंडळाने वस्त्र आणि तयार कपडे या क्षेत्रासाठी ६००० कोटी रुपयांची विशेष अर्थसाहाय्य योजना जाहीर केली. यामध्ये कामगारांना मदत करणारे अनेक उपाय आहेत यामुळे रोजगार निर्मितीत वाढ होईल. निर्यातीला प्रोत्साहन मिळेल अर्थव्यवस्थेत सुधार होईल. या सर्व

*तंत्रज्ञान अद्ययावतीकरण या अंतर्गत गुंतवणूक*

*रुपये कोटीत*




*स्रोत- वस्त्रोद्योग आयुक्त यांचे कार्यालय*

निर्णयांमुळे एकंदर ३० हजार दशलक्ष अमेरिकी डॉलर्सची एकत्रित वाढ निर्यातीत होईल आणि रू.७४,०००/- कोटी गुंतवणुकीची पुढील तीन वर्षांत वाढ होईल. या योजनेमुळे कच्च्या मालाकडून पक्क्या मालापर्यंत सवलत मिळेल कारण सुधारितTUFS मुळे अर्थसाहाय्य आता १५ टक्के वरून २५ टक्के होईल. यामुळे तयार कपडे क्षेत्रात उत्पादन व रोजगार निर्मितीत वाढ होईल.

तांत्रिक वस्त्रोद्योग हे भारतीय कापड व्यवसायातील उदयोन्मुख क्षेत्र आहे. लागतात. त्याचप्रमाणे कृष्णवस्त्रामूळे जमिनीचे प्रतिएकक उत्पादन वाढते शिवाय सिंचनासाठी लागणारे पाणी कमी लागते आणि पिकाचा दर्जा सुधारतो. वैद्यकीय वस्त्रोद्योग या क्षेत्रालाही भारतात खूप वाव आहे कारण वैद्यकीय सेवा ही फार झपाट्याने सुधारत आहे. त्याचप्रमाणे संरक्षण बांधकाम आणि औद्योगिक क्षेत्राला संरक्षक वस्त्रांची फार गरज आहे. आज भारताला लागणारे तांत्रिक वस्त्र हे मुख्यत: आयात होते. भारतातील मोठया बाजारपेठेला पुरेल असे तांत्रिक वस्त्र निर्माण करणाऱ्या उद्योगांना निधी देणे,

*नवे वस्त्रोद्योग युनिट*



त्याचा प्रसार करण्यासाठी आता उत्तम संधी आहे. आता तांत्रिक वस्त्रोद्योग हा अगदीच छोटया प्रमाणावर आहे या क्षेत्रात याची फक्त २२०० एकक आहेत. भारत हा तांत्रिक वस्त्रोद्योगासाठी उत्तम बाजारपेठ आहे. कारण ईशान्य भारत व इतर पर्वतीय भागातील रस्ते मजबुती आणि उतार स्थिरीकरणासाठी भूवस्त्रांची खूप आवश्यकता आहे. जलाशयात अस्तरासमान वापर करणे, भूसंधारण तंत्रज्ञान आणि खड्डयांचे पर्यावरणीय संरक्षण इ. पायाभूत प्रकल्पांसाठी भूवस्त्रे संयुक्त प्रकल्पांसाठी गुंतवणूक आकर्षित करणे यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

ज्या तयार कपडे क्षेत्रात उत्पादन आणि रोजगार निर्मितीत वाढ होईल अशांना तांत्रिक वस्त्रांना चालना मिळावी यासाठी वस्त्रोद्योग मंत्रालयाने (TMTT) तांत्रिकी वस्त्रोद्योग ही योजना जाहीर केली आहे. (तांत्रिकी वस्त्रांबाबत तंत्रज्ञान मोहीमTMTTलघु मोहीम १ व २ यात ८ गुणवत्ता केंद्रे उघडली आहेत वा अद्यावत केली. अद्ययावत करण्याची खालील क्षेत्रे आहेत १)Agrotech कृषीतंत्र (SASMIRA)२) वैद्यकीय तंत्रज्ञान (Meditech) (SITRA)) Protech (NITRA) Geotech (ATIRA आणि BTRA) Indutech (PSG College of Technology) Sportech (WRA) याशिवाय बिनविणीचे Nonwovens (DKTE) आणि एकत्र(ATIRA) या केंद्रांमध्ये त्यासंबंधित विषयातील गुंतवणूकदारांचा सर्व सोयी उपलब्ध असतील उदा. परीक्षण, प्रषिक्षण, माहिती केंद्र पोषण केंद्र प्रारुप विकास इ.

नव्या उद्योजकांना त्यांच्या उत्पादनांची चाचणी घेता यावी ती व्यावसायिक कसोट्या लावून सिद्ध करता यावी यासाठी या गुणवत्ता केंद्रात लक्ष बीज केंद्रे सर्व सामग्रीनिशी सज्ज आहेत. याशिवाय या तांत्रिक वस्त्रांना भारतात आणि परदेशात बाजारपेठ मिळावी यासाठी सरकार बाजार विकास साहाय्य देते. यामुळे आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सहभागी होता येते आणि भारतातील विक्रेता गाहक बैठकी आयोजित करता येतात.

याशिवाय भूवस्त्रांचा प्रचार आणि अस्तित्वात असलेल्या वा नवे रस्ते प्रकल्प, उतार स्थिर करणे जलाशयांचे अस्तर यासाठी वापर करण्यासाठीTMTTअंतर्गत सरकारने पाच वर्षांसाठी४२७ कोटी राखून ठेवले आहेत. भूवस्त्र वापरण्यासाठी वाढीव खर्चनिधीची आवश्यकता असलेले अनेक प्रकल्प मणीपूर, मिझोराम, त्रिपुरा, सिक्कीम आणि आसाम येथे उभे राहात आहेत. मूलभूत आराखडे सुधारण्यासाठी,

भूस्खलन रोखण्यासाठी इतर संकटांना थोपवण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत आता भरवसा वाढत आहे. ५३ प्रात्यक्षिक केंद्रे आणि ईशान्येकडील व इतर राज्यात शेतकऱ्यांना कृष्णवस्त्र

८९ कोटीची मदत केली आहे. ४४ गट कार्यशाळांसाठी ५६.५० कोटी निधी पुरवला आहे प्रत्येक समूहासाठी दोन कोटीची तरतूद केलेली आहे. प्रत्येक यंत्रमागसमूहासाठी समान सुविधा केंद्राद्वारे

तांत्रिक वस्त्र युनिट



संच पुरवण्यात आला आहे यातील कृष्णवस्त्रावर एकंदर ६० कोटीची रक्कम खर्च झाली आहे आणि ती अत्यंत उपकारक ठरली आहेत.

शिवाय भारत सरकारने वस्त्रोद्योग समूहात काही समान सुविधा मिळाव्या यासाठी काही योजना आखल्या आहेत आणि महा समूह विकास योजनेतून त्यांची जोडणी केली आहे. यामुळे प्रक्रिया उद्योग आणि वेशभुषा रीती/फॅशन उद्योग व तयार कपडे रचनाकार उद्योग हे सर्व यंत्रमाग समूहाच्या जवळ येतात यातून छोटया अवकर्षीत एकात्मिक वस्त्रोद्योग संबंधी सर्व काही उपलब्ध होते.

याशिवाय वस्त्रोद्योग मंत्रालयाने वस्त्रोद्योग क्षेत्राचे आधुनिकीकरण आणि अद्ययावतीकरणासाठी काही इतर प्रयत्नही सुरु केले आहेत. ७४५०० साध्या यंत्रमागांच्या अद्ययावतीकरणासाठी

सुविधा पुरवण्याची यातून सोय केली आहे. २९ सूत बँका स्थापन करण्यासाठी विशेष हेतू कार्यक्रमासाठी १०.३७ कोटीची तरतूद केली आहे. एकात्मिक वस्त्रोद्योग पार्क योजनांतर्गत(SITP) ७२ वस्त्रोद्योग पार्कसाठी निधीची तरतूद केली आहे. सामाजिक कल्याण कार्यक्रमातूनही या क्षेत्राला मदत केली जाते. उदा. वस्त्रोद्योग कामगार पुनर्वसन निधी कार्यक्रम(TWRFS) गट विमा योजना(GIS) प्रधान मंत्री रोजगार प्रोत्साहन योजना(PMPRPY) इ.

अंदाजे ५००० विणकरांना इतर प्रगत वस्त्रोद्योग समूहांची पाहाणी करण्यासाठी आर्थिक मदत करण्यात आली. अद्ययावत तंत्रज्ञानाची त्यांना ओळख व्हावी, नवीन प्रसार तंत्रे अवगत व्हावी आणि विविध उत्पादनांशी त्यांचा परिचय व्हावा आणि त्यातून त्यांचे उत्पादन आणि उत्पन्न वाढावे हा त्यातील उद्देश आहे.

यंत्रमागांचे आधुनिकीकरण करण्यासाठी सरकारने पद्धतशीर प्रयत्न केले आहेत. यापैकी एक म्हणजे २००४ सालापासून सुरु असलेली कर्ज निगडित २० टक्के भांडवल अर्थसाहाय्य योजना यातूनच धोटाविरहित नूतन सूतगिरण्यांसाठी २० टक्के ऐवजी ३० टक्के पर्यंत अल्पवित्त साहाय्य २०१३ सालापासून वाढवण्यात आले. एकंदर ४७०० केंद्रांना यातून रू.५६३ कोटींची मदत झाली आणि विकेंद्रीत क्षेत्रात ५०००० नवीन धोटाविरहित मागांची उभारणी झाली.

*आधुनिक यंत्रमाग युनिट*





मात्र पर्यावरणीय प्रश्न हे वस्त्रोद्योग क्षेत्रासमोर आव्हान आहे. न्यायालयाच्या आदेशांचे पालन करण्यासाठी आणि या आव्हानाचा सामना करण्यासाठी तात्काळ समान सांडपाणी शुद्धीकरण यंत्रणा उभारली गेली पाहिजे. यामुळे उत्पादकांना इतर देशांनी व्यापार करताना तांत्रिक अडचण येणार नाही. शिवाय भारताला मानवनिर्मित आणि सूत अशा दोन्ही धाग्यांचा आधार भक्कम करण्याचे आव्हान पेलायचे आहे. याशिवाय ज्या देशात भारतीय वस्त्रोद्योगाला चांगली बाजारपेठ आहे अशा देशांशी विदेश व्यापाराच्या बाबतीत करार करून भारत सरकार आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश करायला उत्सुक आहे.

सध्या भारतीय कापडाला जगभरच्या बाजारपेठात शिरकाव करण्याची उत्तम संधी आहे कारण इतकी वर्षे चीनने त्यावर राज्य केले असले तरी त्याचे बाजारपेठेवरचे वर्चस्व आता कमी होत आहे. स्वस्त मजूर, कमी उर्जा खर्च आणि प्रमुख पाश्चात्य राष्ट्रीय असलेले व्यापार करार यामुळे जरी वस्त्र उत्पादन क्षेत्र हे आफ्रिकेतील देशांकडे सरकण्याचा कल असला तरी बाजारपेठांवर वर्चस्व मिळवण्याच्या या संधीचा भारताने फायदा करून घेतला पाहिजे. हीच वेळ आहे भारतीय वस्त्रोद्योगाचा विकास करण्याच्या उद्देशाने धोरणात्मक पावले तात्काळ उचलण्याची असे जर केले नाही तर उद्योन्मुख अर्थव्यवस्थ असलेल्या बांगला देश, व्हिएतनाम, कंबोडिया, श्रीलंका, इंडोनेशिया, मलेशिया इ. देशांच्या कापड उदयोगाचे राज्य मोठा ग्राहक वर्ग असलेल्या भारतीय बाजारपेठेवर चालेल.

मात्र कितीही आव्हाने असली तरी उत्साही उद्योजकता आणि पुढाकार घेणाऱ्या सरकारचे साहाय्य यामुळे औद्योगिक क्षेत्राची (वस्त्रोद्योगाची) संपूर्ण वाढ व्हावी यासाठी भारत सज्ज आहे.

■■■

*लेखिका भारत सरकारच्या वस्त्रोद्योग विभागात आयुक्तपदी कार्यरत आहेत.*

email: kavita.guptaa@ias.nic.in



# खादी : आधुनिक भारताच्या उभारणीसाठी मूलभूत ताकद

व्ही. के. सक्सेना



**ब्रिटिश साम्राज्यवादाच्या मध्याला म्हणजे १९२० मध्ये स्वदेशी चळवळीतील राष्ट्रवादाचे राजकीय हत्यार म्हणून गांधीजींनी खादीची सुरुवात केली. खादीला स्वातंत्र्याचा वेश म्हणून संबोधित करुन त्यांनी भारतात स्वयंपूर्णतेचा कायमस्वरुपी प्रतीकवाद आणला. भारत स्वत:च्या बळावर टिकू शकतो, हे ब्रिटिशांना त्यांनी दाखवून दिले.**

आधुनिक राष्ट्र उभारण्यासाठी आम्ही सध्या भरपूर चर्चा करत आहोत. आधारभूत सुविधा, शास्त्रीय प्रवृत्ती, तांत्रिक सामर्थ्य, लष्करी ताकद, कलात्मक उत्कृष्टता आणि आधुनिकतेची वैशिष्ट्ये असणाऱ्या सर्व विविध सोयीसुविधा विकसित करणे महत्वाचे असले तरीही आमच्या मूलभूत क्षमतांना पुढे नेणे हे जास्त महत्वाचे आहे. राष्ट्र ज्या कणांपासून बनलेले असते त्यांचे राष्ट्र मोठ्या प्रमाणावर कर्जदार असते. स्वप्नांची उभारणी ही आमच्यासोबत दीर्घकाल राहणाऱ्या या आधारांवरच मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते.

अनेक शतकांच्या ब्रिटिश राजवटीनंतरही देश म्हणून आमची जीवनशैली सांस्कृतिक व पारंपरिक मार्गांच्याच खाचेत राहिली आहे. आमचं भविष्य हे तळागाळातील गाभ्याच्या ताकदीवरच अवलंबून आहे आणि आयात केलेल्या मूल्यांच्या पायावर ते उभारले जाऊ शकत नाही, हे महात्मा गांधी यांनी त्वरित ओळखले. ब्रिटिश साम्राज्यवादाच्या मध्याला म्हणजे १९२० मध्ये स्वदेशी चळवळीतील राष्ट्रवादाचे राजकीय हत्यार म्हणून गांधीजींनी खादीची सुरुवात केली. खादीला स्वातंत्र्याचा वेश म्हणून संबोधित करुन त्यांनी भारतात स्वयंपूर्णतेचा कायमस्वरुपी प्रतीकवाद आणला. भारत स्वत:च्या बळावर टिकू शकतो, हे ब्रिटिशांना त्यांनी दाखवून दिले. त्याचबरोबर आपल्या रोजच्या जीवनाच्या चौकटीत राहून भारतीय स्वत:चे भविष्य घडवू शकतात, असा अभिमानही त्यानी भारतीयांना दिला.

खादी व ग्राम उत्पादकता हे राष्ट्रवादाचे महान बनले आणि आमचा समाज हा फक्त ग्रामीण लोकांचे प्रयत्न व योगदानावरच स्थापन झालेला आहे, हे भारताने जगाला दाखवून दिले. अशा तऱ्हेने खादी केवळ कपडा म्हणून ओळखली जाऊ लागली नाही तर शांततेचा अग्रदूत व आमचे स्वातंत्र्य व राष्ट्रीय अस्तित्वाचे चिन्ह बनली.

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने खादी व ग्रामोद्योग आयोग ही वैधानिक संस्था केव्हीआयसी कायदा १९५६ च्या अंतर्गत स्थापन केली. ज्या स्वयंपूर्णतेने राष्ट्राची उभारणी केली तिच्या सामर्थ्याला देण्यात आलेला हा पुरस्कार होता. प्रचंड मनुष्यबळ असलेल्या देशात ज्याची काम करण्याची इच्छा तीव्र होती परंतु आर्थिक पाठबळाचा अभाव होता, त्या देशाला आपल्याकडील सामूहिक मनुष्यबळ


व बौद्धिक संपदेला उपयुक्त राष्ट्रीय उत्पादन निर्माण करण्याचा मार्ग दाखवणे आवश्यक होते, त्याचबरोबर व्यक्तींच्या उपजीविका व भरभराटीसाठी समर्थन देणेही गरजेचे होते. आणि भारताला खादी व ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देण्याच्या आकांक्षेपेक्षा अधिक काहीही महत्वपूर्ण व सुयोग्य अशा गोष्टीचा पाठपुरावा करणे शक्य नव्हते.

खादीचे उत्पादन हा जगातील आतापर्यंतचा सर्वात मोठा ग्रामीण उत्पादकता कार्यक्रम आहे. ज्यात हजारो कुटुंबे कोणत्याही मध्यस्थाच्या अरिष्टाशिवाय अथवा गुंतागुंतीच्या बाजारपेठीय साधनांशिवाय आपले उत्पादन थेट ग्राहकांपर्यंत पोहचवतात. खादी ग्रामीण समुदायांना त्यांच्या प्रयत्नांचे उच्च मूल्य पुरवते तर ग्राहकांना त्यांच्या पैशाचा उच्च मोबदला पुरवते. राष्ट्रासाठी ही वारसाहक्काने मिळालेली अमूल्य अशी मालमत्ता आहे, यात काही शंकाच नाही.

केव्हीआयसीची उद्दिष्टे व कार्यक्रमांची अंमलबजावणी करणारे भारतात आज ५,००० संस्था आणि ३ लाख २० हजार छोटे व्यावसायिकांचे मिळून हे विशाल जाळे बनलेले आहे. केव्हीआयसीच्या विविध योजनांतर्गत उत्पादक कार्यक्रमांत १कोटीहून अधिक लोक गुंतले आहेत. खादी ही प्रामुख्याने महिला आधारित असून ८० टक्के कारागीर महिला आहेत. ग्रामोद्योग कार्यक्रमात महिलांचा वाटा ३० टक्के आहे. खादी व ग्रामोद्योग क्षेत्र खादी व ग्रामोद्योग उत्पादनांची ४०,००० कोटी रुपयांची उलाढाल करत असून त्यापैकी ४० टक्के ओघ खादी उपक्रमांतर्गत पुन्हा उपजीविका समर्थन म्हणून ग्रामीण समुदायांकडे वळवला जातो.

***खादी हा कपडा हाताने कातायचा व हातानेच विणला जाणारा असल्याने उत्पादनाच्या प्रक्रियेत वीज वापरली जात नाही. तो संपूर्ण सेंद्रीय असून शून्य कार्बन उत्सर्जन करणारा आहे. एकापेक्षा अधिक मार्गांनी खादीने कपडा उद्योगात भविष्याचा धागा म्हणून प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त केले पाहिजे. हाच मूलभूत पाया आहे. ज्याच्या आधारे आम्हाला खादी जागतिक व्यासपीठावर नेली पाहिजे.***

सध्या जगात हवामानातील बदल व औद्योगिकीकरणाच्या कार्बन दुष्परिणामांबाबत गांभीर्याने चर्चा केली जात असतानाच कृत्रिम वस्त्रांमुळे होत असलेली पर्यावरण हानी, ज्याचा पुरेसा अभ्यास आतापर्यंत करण्यात आलेला नाही, त्याविरोधात भारताने खादी उद्योगाने कार्बनचे शून्य दुष्परिणाम होत असल्याचे जगासमोर आणले पाहिजे. वार्षिक जागतिक उत्पादनाच्या अंदाजित आकडेवारीवर आधारित ६० अब्जाहून अधिक किलो कपडा उत्पादनासाठी अंदाजित वीज व पाण्याची गरज आहे : १.०७४ अब्ज किलोवॉट वीज (किंवा १३ कोटी २० लाख मेट्रिक



टन कोळसा) आणि ६ ते ९ पद्म लिटर पाणी लागते. कृत्रिम धागे हा हरित गृह वायु उत्सर्जन करणारा सर्वाधिक मोठा उद्योग असून एकूण कार्बन निर्माणाच्या १ वीसांश इतका कार्बन उत्सर्जन केला जातो.



मात्र खादी हा कपडा हाताने कातायचा व हातानेच विणला जाणारा असल्याने उत्पादनाच्या प्रक्रियेत वीज वापरली जात नाही. तो संपूर्ण सेंद्रीय असून शून्य कार्बन उत्सर्जन करणारा आहे. एकापेक्षा अधिक मार्गांनी खादीने कपडा उद्योगात भविष्याचा धागा म्हणून प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त केले पाहिजे. हाच मूलभूत पाया आहे ज्याच्या आधारे आम्हाला खादी जागतिक व्यासपीठावर नेली पाहिजे आणि तिचे आधुनिक काळातील महत्व तसेच स्वच्छ व शाश्वत जगासाठी भविष्यातील भूमिका यांचे जगाला दर्शन घडवले पाहिजे.

पंतप्रधानांनी आपल्या मन की बात मध्ये अगदी योग्यच सांगितले आहे की आम्हाला खादी ग्रामोद्योग जाळे गावांमध्ये स्थापित करायचे आहे.लाखो लोकांसाठी रोजगार उपलब्ध करुन देण्याची क्षमता खादीमध्ये आहे.

खादीला विशेषत: त्यातील कारागीरांसाठी पंतप्रधान देत असलेल्या महत्वाचा राष्ट्र उभारणीत खादी बजावू शकणाऱ्या भूमिकेचा आरसा आहे. आदरणीय पंतप्रधानांनी म्हणूनच नारा दिला आहे की, 'आझादी के पहले खादी फॉर द नेशन अँड आझादी के बाद खादी फॉर फॅशन'. ते पुढे म्हणाले की, खादीच्या वापराला आपण प्रोत्साहन दिलेच पाहिजे. किमान एक तरी खादीचा कपडा खरेदी करा. तुम्ही खादी विकत

***धागा विणून अहिंसक स्वातंत्र्यचळवळीचा पायदळातील सैनिक झालेल्या प्रत्येक माणसाला आपण लक्षात ठेवू शकत नाही किंवा त्याची कागदोपत्री नोंदही ठेवू शकलेलो नाही, परंतु जेव्हा आपण चरखा साजरा करतो तेव्हा त्या प्रत्येकाला लाक्षणिक अर्थाने आदरांजली अर्पण करत असतो.***

घेतलीत तर एका गरीबाच्या घरात तुम्ही भरभराटीचा दिवा उजळवू शकता. या आवाहनानंतर खादीचे कापड व तयार कपड्यांच्या विक्रीत २९ टक्क्यांची वाढ पहायला मिळाली असून सातत्याने ती सुरूच आहे.

आधुनिक समाजाच्या बदलत्या गरजांनुरूप खादीने कापड म्हणून स्वत:मध्ये बदल स्वीकारले असून आज देशातील हजारो उत्पादन केंद्रांमध्ये फ्युजन फॅब्रिकची निर्मिती केली जात आहे, ज्यात वापरकर्त्यांच्या गरजांनुसार कॉटन, पॉलिस्टर, सिल्क आणि इतर प्रकारांच्या मजबुतीचा संयोग घडवून आणला गेला आहे.

एक धागा, एक राष्ट्र ही नवीन टॅगलाईन आहे. खादी ऐवजी खादी इंडिया असे नवे ब्रँडिंग केले जात आहे. एक धागा, एक राष्ट्र या टॅगलाईन खाली केव्हीआयसीने ५ मे ते ४ जून २०१६ या दरम्यान स्वातंत्र्यानंतर एक महिन्याचे राष्ट्रीय खादी प्रदर्शन आयोजित केले होते. दहशतवादाच्या सावटाखाली असलेल्या श्रीनगर येथे भरवण्यात आलेले हे पहिलेच प्रदर्शन होते. देशातील १९८ खादी संस्थांमध्ये तयार करण्यात आलेल्या उत्पादने येथे ठेवली होती व त्यापैकी ५६ जम्मू व काश्मीरातील होती. त्याच्या यशामध्ये १ लाखांहून अधिक लोकांनी भेट दिली आणि २ कोटी रुपयांची विक्री झाली. मे २०१६ मध्ये केव्हीआयसीने काश्मीरातील पाम्पोर येथे २५ चरखा व ५ मागांचे युनिट सुरू केले तसेच जम्मू जिह्यातील नागरोटा येथे दहशतवादाने त्रस्त असलेल्या कुटुंबीयांसाठी नॅपकीन शिवणकामाचा प्रकल्प सुरू केला असून त्यात २९६ महिलांना रोजगार मिळाला आहे.

जागतिक फॅशन व्यासपीठावर जोरदार प्रवेश करण्यासाठी केव्हीआयसीने आंतरराष्ट्रीय फॅशन

डिझायनर रितु बेरी यांची आयोगाच्या सल्लागार म्हणून नेमणूक केली असून खादीच्या तयार कपड्यांमध्ये स्टेट ऑफ द आर्ट बहुविध फॅशन डिझाईन व स्टाईल्स सादर करण्यासाठी तसेच देशात व परदेशात खादीला प्रोत्साहन देण्यासाठी सल्ला देतील.



या पार्श्वभूमीसह केव्हीआयसीवर उत्पादक रोजगारामध्ये गरीब आणि ग्रामीण लोकांना सहभागी करून घेण्याची अवघड जबाबदारी आहे. केव्हीआयसीवर या प्रकारे ग्रामीण भागातील अत्यंत वैविध्य असलेले व्यवसाय निर्माण करणे, चालना, प्रोत्साहन देणे व शाश्वतता देऊन भारतातील ग्रामीण विकासातील महत्वाचे साधन म्हणून सेवा करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे, ज्यात खादी हे प्राथमिक उत्पादन असेल.

मला नेहमीच असा विश्वास वाटत आला आहे की, चरखा हा आमच्या अज्ञात सैनिकांच्या स्मारकाप्रमाणेच अज्ञात ग्रामीण समूहांचे स्मारक आहे, ज्यांनी राष्ट्रपित्याची हाक ऐकून त्यांनी दाखवलेल्या स्वावलंबन व श्रमांच्या प्रतिष्ठेचा रस्त्यावरून वाटचाल सुरू केली. धागा विणून अहिंसक स्वातंत्र्यचळवळीचा पायदळातील सैनिक झालेल्या प्रत्येक माणसाला आपण लक्षात ठेवू शकत नाही किंवा त्याची कागदोपत्री नोंदही ठेवू शकलेलो नाही, परंतु जेव्हा आपण चरखा साजरा करतो तेव्हा त्या प्रत्येकाला लाक्षणिक अर्थाने आदरांजली अर्पण करत असतो. या दृष्टीकोनातून मला असे वाटते की, राजधानीतील अत्यंत महत्वाच्या स्थानी स्वराजच्या या प्रतिकाची प्रतिष्ठापना करणे हा आमचे सातत्याने त्यावर लक्ष ठेवण्याचा अत्यंत योग्य मार्ग आहे ज्याला आपण कधीही विसरता कामा नये.

चारखयाचो महत्व लक्षात घेऊन जगातील सर्वात मोठा चरखा- ३०फूट लांब, १७ फुट उंच, ब्रम्हदेशातील सागवानी लाकडापासून बनवलेला असा चरखा केव्हीआयसीने नवी दिल्लीतील आयजीआय विमानतळावर टी-३ येथे बसवला आहे, ज्यामुळे जगातील लाखो लोकांना काही क्षण थांबून भारताच्या ऐतिहासिक प्रतीकवादाचा आनंद लुटता येईल. त्याहीपुढे, नवी दिल्लीतील आंतरराष्ट्रीय विमानतळ हा आमच्या राष्ट्रीय अंतराळाचा गेटवे असून जो महात्मा गांधी यांनी १९२४ मध्ये स्वराज्यासाठी फुंकलेल्या रणशिंगाची आठवण करून देते, ज्यामुळे आमच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षेला पंख लाभले होते.

केव्हीआयसीच्या मुख्य कार्यक्रमांपैकी एक म्हणजे ग्रामीण भागांत रोजगार उपलब्ध करुन देणे हा आहे. देशात पीएमईजीपीची सुरुवात झाल्यापासून २० लाख रोजगार संधींची निर्मिती झाली आहे. केव्हीआयसीच्या रोजगार योजनांचे एक महत्वाचे योगदान म्हणजे ग्रामीण भागातील तरुणांचे शहरांकडे होणारे स्थलांतर रोखले असून एतद्देश्यीय बुद्धीमत्तेला ग्रामीण भागातच भरभराटीला येण्यास प्रोत्साहन देण्यात आले आहे.

केव्हीआयसीकडून पाठपुरावा केल्या जात असलेल्या अनेक कार्यक्रम व पुढाकारांशिवाय, अध्यक्ष म्हणून माझी सध्याची आकांक्षा ही आजारी ग्रामोद्योगांचे पुनरुज्जीवन, विक्री दुप्पट करणे आणि कारागीरांना उच्च मोबदला मिळेल या दृष्टीने यंत्रणा विकसित करणे ही आहे. आमची केव्हीआयसीमध्ये विणण्याचे युनिट चालवण्यासाठी सौर ऊर्जा वापरण्याची इच्छा असून त्याद्वारे शारिरीक श्रमांवरील अवलंबितता कमी करण्याचा हेतू आहे. सध्या केव्हीआयसीमध्ये आम्ही ज्या सर्वात प्रतिष्ठित उद्दिष्टांचा पाठपुरावा करत आहोत त्यांमध्ये विणकरांसाठी विश्वासार्ह आरोग्यसेवेचे जाळे पुरवणे, त्यांची शैक्षणिक क्षमता वृद्धींगत करणे, जागतिक मुख्यप्रवाहात त्यांना तसेच त्यांच्या प्रयत्नांना ओळख मिळवून देण्यासह विणकरांसाठी विमा कवच उभारणे यांचा समावेश आहे.


एकंदरीत खादी व ग्रामोद्योग आधुनिक भारत व आधुनिक जगात मानवी इतिहासातील विकसित झालेले सर्वाधिक शाश्वत सामाजिक-आर्थिक मॉडेल म्हणून आपले उच्च महत्व अधिकाधिक सिद्ध करत आहेत.

■■■

*लेखक खादी व ग्रामोद्योग आयोगाचे अध्यक्ष आहेत.*
email - chairmankvic2015@gmail.com

# खादी: भारतीय स्वातंत्र्याचा मानबिंदू

ए. अन्नामलाई



**सर्व मानवांमध्ये एकतेची आणि खादीची भावना निर्माण व्हावी अशी गांधीजींची इच्छा होती. खादी हा केवळ अंग झाकणारा कापडाचा तुकडा नसून अंगिकारण्याजोगे आणि त्याचे अनुकरण करण्याजोगे तत्वज्ञान आहे.**

खादीची भावना म्हणजे पृथ्वीवर राहणाऱ्या प्रत्येक सजीवाबाबत सहानुभूतीची भावना आहे. आपल्या सभोवताली असलेल्या जीवांसाठी जे काही धोकादायक आहे अशा कोणत्याही गोष्टीचे आमूलाग्र परिवर्तन असा याचा अर्थ आहे आणि जर आपण ही भावना आपल्या लक्षावधी देशबांधवांमध्ये निर्माण करू शकलो तर आपल्या भारताची ही भूमी अतिशय सुंदर बनेल. (महात्मा गांधी संकलित. खंड ३४, पान ५२०) सर्व मानवांमध्ये एकतेची आणि खादीची भावना निर्माण व्हावी अशी गांधीजींची इच्छा होती. खादी हा केवळ अंग झाकणारा कापडाचा तुकडा नसून अंगिकारण्याजोगे आणि त्याचे अनुकरण करण्याजोगे तत्वज्ञान आहे.

१९१७ मध्ये चंपारण्याच्या सत्याग्रहाच्या दरम्यान गांधीजींना बिहारमधील शेतकऱ्यांच्या हलाखीच्या स्थितीची जाणीव झाली. भिलवाडा गावातील एका महिलेशी त्यांची भेट झाली आणि तिच्याशी बोलल्यावर त्यांच्या असे लक्षात आले की त्या महिलेकडे नेसण्यासाठी दुसरी साडी नसल्यामुळे ती सदोदित एकच साडी नेसत असे आणि ती साडी ती बदलू शकत नव्हती. त्या काळात कपडे रंगवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नीळ देणा-या पिकाच्या लागवडीची सक्ती हा चंपारण्य सत्याग्रहामागील मूळ मुद्दा होता आणि हेच कापड शेतकऱ्यांसाठी एक महागडी वस्तू ठरली होती. एक काळ असा होता ज्या काळात आपण कापसाच्या सर्वाधिक मोठ्या उत्पादकांपैकी एक होतो. पण आपल्या लागवडकर्त्या शेतकऱ्यांना याच कापसाच्या उत्पादनांपासून वंचित ठेवले जात होते. हा कापूस इंग्लंडला तिथल्या कारखान्यांसाठी कच्चा माल म्हणून नेला जात होता आणि मँचेस्टर, लँकेशायर या ठिकाणांहून तो तयार माल या स्वरूपात परत येत होता.

आपला वैभवशाली इतिहास कुठे गेला? गांधीजी देखील एका अशा ठिकाणाहून आले होते जिथे सूत कताई आणि वीणकामाची संस्कृती होती. ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय उपखंडातील बाजारावर नियंत्रण मिळवल्यावर अचानक वेगवान घडामोडी घडल्या. इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांच्या स्वतःच्या गरजा भागवण्यासाठी ग्रामीण भारतीय जनतेमध्ये असलेली वस्त्रोद्योग संस्कृती नष्ट केली.

**इतिहासातील वैभवशाली वस्त्रोद्योगाचे ज्ञान :**

भारतीय बनावटीच्या नीळीचा वापर करून रंगवलेले कापड फॅरोच्या

कबरीमध्ये सापडले. मोहेनजोदारो संस्कृतीचे अवशेष ज्या ठिकाणी सापडले त्या ठिकाणी गुलाबी छटेचे कापड सूतकताईच्या चातींसह सापडले आणि ग्रीक आणि रोमन व्यापाऱ्यांच्या कागदपत्रांमध्ये भारतीय उपखंडातून आलेल्या तलम कापडाचे वर्णन आढळते. अजंठा आणि वेरूळ येथील गुंफांमध्ये असलेल्या चित्रांमध्ये कापडाचे विविध प्रकार आणि रचना पाहायला मिळतात. भारताच्या प्रत्येक भागाची स्वत:ची अशी कापडाच्या विविध प्रकारच्या रचनांची शैली होती. वीणकामाची रचना, रंगवण्याची, छपाईची इ. त्याच प्रकारे कापडाच्या दर्जातही विविध प्रदेशांनुसार फरक पाहायला मिळत असे. प्रत्यक्षात वस्त्रोद्योग तंत्रज्ञानाचे प्रणेते आपण होतो.

भारतीय कापड म्हणजे अभिमानाची आणि वैभवाची बाब होती आणि काही देशांनी तर भारतातून आयात होणाऱ्या कापडावर बंदी घातली होती. आपल्या देशातील कापडाचा वापर अनेक देशांच्या राजघराण्यांमधील व्यक्तींच्या पोशाखासाठी होत असे. या कापडांमध्ये हाताने कताई केलेल्या आणि हाताने विणलेल्या कापडाचा इतिहासातील खादीचाही समावेश होता.

औद्योगिक क्रांतीने तिचा विळखा अधिक घट्ट केला आणि इंग्लंडमधील यंत्रमागांनी भारतीय वस्त्रोद्योग चिरडून टाकला. ब्रिटिश वसाहतवादी धोरणाला अनुकूल अशा नव्याने लागू करण्यात आलेल्या कायद्यांमुळे व्यापाराच्या नव्या पद्धती रुढ झाल्या. भारतामध्ये पिकवण्यात आलेला सर्वच्या सर्व कापूस अतिशय कमी दरामध्ये निर्यात करावा लागे तर दुसरीकडे ब्रिटिश गिरण्यांमध्ये तयार झालेल्या कापडाने भारतीय बाजारपेठा भरून गेल्या आणि त्यामुळे हा माल खरेदी करण्याशिवाय स्थानिकांना कोणताही पर्याय उरला नाही.

लक्षावधी भारतीय वीणकर आणि सूतकताई कारागीर बेरोजगार झाले आणि अक्षरश: रस्त्यावर आले. भारताचा गौरव असलेले हाताने विणलेले कापड सक्तीने मृत्यूपंथाला लावण्यात आले आणि वस्त्रोद्योगाच्या मौल्यवान ज्ञानाचे भांडारही अशाच प्रकारे रिते करण्यात आले.

**खादी चळवळ:**

आता गांधीजींचा प्रवेश होतो. १९०८ मध्ये लंडनमध्ये असताना मला या चाकाचा शोध लागला. दक्षिण आफ्रिकेतील एका शिष्टमंडळासोबत मी तेथे गेलो होतो. याच काळात मी अनेक नामवंत भारतीयांच्या- विद्यार्थ्यांच्या आणि इतरांच्या संपर्कात आलो. भारताच्या परिस्थितीबाबत आमच्या अनेकदा प्रदीर्घ चर्चा झाल्या आणि एका झटक्यात मला असे जाणवले की या फिरत्या चाकाच्या मदतीशिवाय स्वराज्य मिळणे शक्य नाही. मला त्याच वेळी हे लक्षात आले की प्रत्येकाला हे चाक फिरवावे लागेल. पण त्यावेळी मला माग आणि चरखा यातील फरक माहित नव्हता आणि हिंद स्वराजमध्ये मी चरखा या अर्थाने माग हा शब्द वापरला'.(महात्मा गांधी संकलित, खंड ३७, पृष्ठ २८८)

गोखले यांनी सुचवल्याप्रमाणे गांधीजींनी भारतीय जनतेची स्थिती जाणून घेण्यासाठी संपूर्ण भारताचा दौरा केला. त्यांनी भारताच्या ग्रामीण भागातील जनतेची हलाखीची स्थिती प्रत्यक्ष पाहिली. वर्षातील सहा महिने शेतकऱ्यांकडे रोजगारच नसे. चंपारण्य घटनेमुळे त्यांच्या भावना आणखी तीव्र झाल्या आणि शेतकऱ्यांना काही तरी पूरक रोजगार मिळवून द्यावा जेणेकरून त्यांच्या वेळेचा आणि उर्जेचा वापर त्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळवून देण्यासाठी करता येईल असे त्यांना वाटत होते. त्यासाठी सूतकताई आणि कापडाचे विणकाम हे पर्याय त्यांना सुचले. त्यांनी त्यांच्या आश्रमात अहमदाबादमधील कापड गिरणी मालकांच्या सहकार्याने कापड विणकामाची सुरुवात केली. लवकरच त्यांच्या असे लक्षात आले की या प्रक्रियेमुळे पुन्हा एकदा भारतीय उद्योगांचा फायदा होत आहे पण शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ मिळत नाही. अशा वेळी गांधीजींची भडोच येथे झालेल्या दुसऱ्या गुजरात शिक्षण परिषदेमध्ये अतिशय धडाडीच्या अशा गंगाबहेन मजुमदार यांच्याशी भेट झाली आणि गांधीजींनी गंगाबहेनकडे सूतकताईच्या पारंपरिक पद्धतींचा आणि साधनांचा शोध घेण्याचे काम सोपवले. भारतामध्ये त्या काळात ही परिस्थिती होती.

'गुजरातमध्ये बरीच भटकंती केल्यावर अखेर गंगाबहेनला बडोदा राज्याच्या विजापूरमध्ये सूतकताईचे चाक म्हणजे चरखा सापडला. त्या भागातील अनेक लोकांच्या घरांमध्ये चरखे होते पण बऱ्याच काळापासून त्यांनी ते एक निरुपयोग वस्तू म्हणून बंद करून ठेवले होते. जर त्यांना कापसाच्या लड्यांचा नियमित पुरवठा करण्याची आणि त्यांनी कातलेले सूत खरेदी करण्याची हमी देत असेल तर पुन्हा सूतकताई करण्याची तयारी त्यांनी गंगाबहेनकडे दर्शवली. गंगाबहेन यांनी ही आनंदाची बातमी मला सांगितली'. (सीडब्लूएमजी(महात्मा गांधी संकलित), खंड.३९, पृष्ठ ३९१)

हाताने सूतकताई आणि विणकाम करण्याच्या प्रक्रियेचे पुनरुज्जीवन गांधीजींनी गंगाबहेन, मगनलाल गांधी आणि आश्रमातील इतर काही मित्र अशा विश्वासू सहकाऱ्यांच्या मदतीने केले. खादीचा चाचणी म्हणून वापर सर्वप्रथम

आश्रमवासीयांकडून करण्यात आला आणि त्यानंतर ही देशव्यापी चळवळ बनवण्याचा निर्णय गांधीजींनी घेतला.

हाताने कातलेल्या, हाताने विणलेल्या कापडाचा नवा प्रकार गांधीजींनी खादी या एका नव्या ब्रँडच्या नावाने सादर केला. त्यांनी खादीला तात्विक बैठक दिली आणि हा काँग्रेसचा नवा कार्यक्रम बनवला.

**स्वदेशीची भावना :**

'खद्दर ही स्वदेशीची भक्कम आणि प्रमुख वस्तुस्थिती आहे. खद्दर शिवाय स्वदेशी म्हणजे जीव नसलेले शरीर, जे केवळ दहन किंवा दफन करण्याच्या योग्यतेचे असते. एकमेव स्वदेशी कापड म्हणजे खद्दर. जर एखाद्याला स्वदेशीचा या देशातील लाखो लोकांच्या भाषेत आणि त्यांच्या अनुषंगाने अर्थ काढायचा असेल तर खद्दर म्हणजे स्वदेशीमधील एक महत्त्वाचा घटक असून म्हणजे आपण जो श्वास घेतो त्या हवेसारखा आहे. स्वदेशीची अनुभूती म्हणजे केवळ एखाद्या वस्तुच्या वापराचा स्वदेशीच्या नावाखाली येणारा सहिष्णु अनुभव नसून अशा प्रकारच्या वस्तुच्या निर्मिती किंवा उत्पादन प्रक्रियेतील आपल्या प्रत्यक्ष सहभागाचा सहिष्णु अनुभव आहे. अशा प्रकारे गिरणीमध्ये तयार झालेले कापडही एका मर्यादित अर्थाने स्वदेशीच असते. कारण त्याच्या उत्पादन प्रक्रियेमध्ये भारतातील लक्षावधी जनतेपैकी अगणित लोक सहभागी होऊ शकतात'. (यंग इंडिया, १७-६-१९२६)

आता स्वदेशी चळवळीच्या पुनरुज्जीवनासाठी त्यांनी वातावरण निर्माण केले आहे आणि परदेशी मालावर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले आहे. स्वदेशी चळवळीच्या माध्यमातून त्यांनी राष्ट्रवादीची ठिणगी पेटवली आणि राष्ट्रवादाचे प्रतीक म्हणून खादी तयार करण्याचे आवाहन केले. खादी चळवळीच्या माध्यमातून वसाहतवादी शोषणाचा पाया उखडून टाकण्यासाठी त्यांचे अहिंसेचे शस्त्र सज्ज केले.

विकेंद्रित संरचना करून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून त्यांनी खादीचा प्रस्ताव ठेवला. खादी चळवळ लोकप्रिय करण्यासाठी त्यांनी देशभर दौरा केला.

खादीचा प्रसार करताना सुरुवातीच्या टप्प्यात सर्वात मोठी समस्या होती ती या कापडाच्या रंगाची. स्त्रियांसाठी त्यांना खादीची रंगीत साडी तयार करता येत नव्हती. रंगीत काठपदर नसलेली पांढरी साडी म्हणजे वैधव्याचे प्रतीक मानले जात असे आणि कोणतीही विवाहित महिला हा पोशाख स्वीकारायला तयार होत नसे. त्यामुळेच गांधीजींनी पांढरा रंग म्हणजे शुद्धतेचे आणि साधेपणाचे प्रतीक असा नवा अर्थ जनमानसात ठसवण्याचा प्रयत्न केला. लोकांना एक आदर्श घालून द्यावा म्हणून गांधीजींनी त्यांची पत्नी कस्तुरबा यांना पांढरी साडी वापरण्याची सूचना केली आणि आश्रमातील इतर महिलांनाही खादीच्या साड्या वापरण्यास सांगितले.

**खादीचे अर्थकारण :**

खादीच्या चळवळीमुळे ग्रामीण जनतेच्या सक्षमीकरणाला विशेषत: महिलांच्या सक्षमीकरणाला वाव मिळाला. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये मोठ्या संख्येने महिलांच्या सहभागामागचे कारण निश्चितच खादीच्या चळवळीमधल्या त्यांच्या सहभागामध्ये होते.

ते म्हणाले, 'जोपर्यंत भारतातील प्रत्येक गावामध्ये १६ वर्षांवरील प्रत्येक कार्यक्षम व्यक्तीला, पुरुष किंवा महिलेला त्याचे शेत, शिवार किंवा अगदी एखाद्या कारखान्यात काम देणारी आणि पुरेसा रोजगार उपलब्ध करणारी चांगली प्रणाली विकसित होत नाही किंवा या गावांचे रूपांतर अशा पुरेशा शहरांमध्ये होत नाही ज्या शहरांमध्ये स्थैर्य आहे, दैनंदिन जीवन जगण्यासाठी आवश्यक आणि आरामदायी सोयीसुविधा आहेत तोपर्यंत खादी हाच लक्षावधी ग्रामीण जनतेच्या आर्थिक उन्नतीचा खरा पर्याय आहे. त्यामुळे आपण विचार करू शकत असलेल्या कोणत्याही कालखंडामध्ये खादी तग धरू शकेल असा प्रस्ताव मी पूर्ण विश्वासाने मांडत आहे'.(खादी- का आणि कशी, पृ.३५)

उत्पादनाच्या विकेंद्रित प्रणालीमुळे निश्चितच उत्पन्नाचे समान वितरण होऊ शकेल. राजाजींने असे निरीक्षण नोंदवले, 'तुम्ही संपत्तीची निर्मिती केल्यानंतर तिचे समान वाटप करू शकत नाही. तुम्ही लोकांना त्यासाठी प्रवृत्त करू शकत नाही. पण तिच्या निर्मितीआधीच तिच्या समान वाटपाचे मार्ग तुम्ही तयार केले तर तुम्ही संपत्ती निर्माण करू शकता. ती म्हणजे खादी'.

'गावांच्या सौरमालेमधील खादी हा सूर्य आहे. या सौरमालेतील इतर ग्रह म्हणजे खादीकडून मिळणाऱ्या ऊर्जेच्या आणि पूरक घटकांच्या बदल्यात तिला पाठबळ देऊ शकणारे विविध उद्योगधंदे म्हणता येतील. त्या उर्जेच्या शिवाय इतर उद्योगांचा विकास होणार नाही. पण माझ्या गेल्या दौऱ्यात मला असे आढळले की इतर उद्योगांचे पुनरुज्जीवन झाल्याशिवाय खादी आणखी प्रगती करू शकणार नाही. गावांना त्यांच्या मोकळ्या वेळेचा फायदेशीर वापर करण्यासाठी ग्रामीण जीवनाच्या सर्व पैलूंना स्पर्श झाला पाहिजे'. (हरिजन,१६-११-१९३४)

काँग्रेसमध्ये वाढलेला दबावदेखील गांधीजींच्या लक्षात आला आणि त्यांनी खादीला काँग्रेसच्या संघटनात्मक पाठबळापासून वेगळे करण्याचा निर्णय

घेतला. त्यांनी १९२५ मध्ये अखिल भारतीय सूतकताईकार संघटना स्थापन केली. अखिल भारतीय सूतकताईकार संघटनेच्या मार्गदर्शनाखाली खादी भारताच्या कानाकोपऱ्यात पोहोचली, खादीचे नवे समर्थक निर्माण झाले आणि संपूर्ण भारतभर खादीला मिळणाऱ्या पाठबळाचा विस्तार झाला.

**स्वातंत्र्यचळवळीचे चिन्ह**

देशाच्या स्वातंत्र्यचळवळीचे चरखा हे चिन्ह बनले आणि खादी ही राष्ट्रवादाची ओळख बनली. वसाहतवादी सामर्थ्याकडून जनसामर्थ्याच्या दिशेने होणारे स्थानांतरण भारताने अनुभवले. एकेकाळी सर्वसामान्य लोक पोलिसांना घाबरत असत. पण गांधीजींनी आणलेल्या अहिंसेच्या अभिनव धोरणामुळे पोलिस 'खादी जनतेला' घाबरू लागले. त्यामुळे एक संपूर्णपणे आर्थिक कृती एक अतिशय ताकदवान राजकीय शस्त्र बनले.

लिसा त्रिवेदी यांनी त्यांच्या 'क्लोथिंग गांधीज नेशन' या पुस्तकात नोंदवलेल्या निरीक्षणानुसार, 'खादीने वसाहतवाद्याच्या ताब्यातील प्रजेला राष्ट्रीय भावना जागृत झालेली प्रजा बनवले. पोशाखाच्या एका नव्या शैलीच्या शोधामुळे उच्चभ्रू लोकांनाही साधी राहणी आवडू लागली आणि ते लोक स्वत:ला एका व्यापक राष्ट्रीय समुदायाचे घटक मानू लागले. या नव्या प्रकारच्या पोशाखाने वसाहतवादी आणि पारंपरिक पोशाखांच्या निकषांना बाजूला सारले'. तथाकथित 'नियमित खादी वापरकर्त्यांनी' राजकीय समुदायाचा आधार म्हणून जागतिक कामगार तत्व आणि स्वयंपूर्णतेचा पुरस्कार केला. साहजिकच वसाहतवादी कालखंडातील भारतीयांमध्ये खादीच्या वापरामुळे एकाच समुदायातील आपण असल्याची भावना निर्माण झाली. जरी खादीला प्रत्येकाचे 'एक भारतीय' या संकल्पनेमध्ये पूर्णपणे रूपांतर करता आले नसले तरी तिने पोशाखाच्या वसाहतवादी आणि पारंपरिक संकल्पनांना बाजूला सारले.

'शहरातील जनतेला खादीचे आधुनिक पोशाख पुरवणे आणि त्यासाठी कारखानदारांबरोबर स्पर्धा करणे आणि परिणामी इतर उद्योगांप्रमाणेच काही मोजक्या कारागिरांना रोजगार पुरवणे एवढेच या खादी चळवळीचे उद्दिष्ट नसून कृषी क्षेत्राला पूरक असणारा उद्योग तयार करायचा आहे. हे उद्दिष्ट अद्याप साध्य झालेले नाही.

हे उद्दिष्ट साध्य व्हावे यासाठी ही चळवळ स्वयं-शाश्वत असली पाहिजे आणि खादीचा वापर गावांमध्ये वाढला पाहिजे. ज्या प्रकारे ग्रामीण जनता त्यांची स्वत:चे अन्न पोळी आणि भात शिजवते, त्याच प्रकारे त्यांनी त्यांच्या स्वत:च्या वापरासाठी खादीची निर्मिती केली पाहिजे. अतिरिक्त उत्पादनाची त्यांना विक्री करता येईल'(हरिजन, ६-७-१९३५)

**आपल्या समोर असलेली आव्हाने**

खादीसमोर असलेले सर्वात मोठे आव्हान म्हणजे हे कापड लोकांना परवडण्याजोगे बनवणे आणि तिच्या निर्मितीमधील कामगाराची प्रतिष्ठा, विकेंद्रीकरण, अहिंसा आणि साधेपणा या मुलभूत मूल्यांशी तडजोड न करता तिला अधिक आकर्षक बनवणे. पूर्वीच्या अतिशय प्रभावी आणि सामर्थ्यशाली स्वातंत्र्यसंग्रामाच्या किंवा स्वदेशी चळवळीच्या अनुपस्थितीत आता खादीला तिच्या स्वत:च्या ताकदीने तिच्या वैचारिक बैठकीच्या आधारे टिकून राहावे लागेल.

कापूस हा पर्यावरणपूरक, आपल्या हवामानाच्या स्थितीला अनुरूप, त्वचा आणि शरीरासाठी चांगला आणि एक नैसर्गिक उत्पादन आहे यात काही संशय नाही. गिरणीमध्ये तयार झालेल्या सुती कापडासह सर्व सुती उत्पादनांसाठी हा नियम लागू आहे. मात्र, यात कस लागणार आहे तो निर्मिती, वितरण आणि उत्पादकाला अनुरूप अशा योग्य त्या तंत्रज्ञानाचा. विकेंद्रित उत्पादनामुळे जनतेमध्ये उत्पन्नाचे वितरण व्हायला मदत होईल आणि त्यामुळे जनतेची क्रयशक्ती (खरेदी करण्याची क्षमता) वाढेल.

आपल्याला जर शाश्वत, पर्यावरणपूरक विकास करायचा असेल तर सर्व विकासकारी कार्यांचा खादी हा पाया असला पाहिजे. खादीची चळवळ लोकचळवळ बनली पाहिजे आणि आपण खादी हा राष्ट्रीय पोशाख बनवला पाहिजे. त्यासाठी आवश्यक असलेली मानसिकता सध्या बऱ्याच लोकांमध्ये तयार होऊ लागली आहे आणि खादीचा वापर आपल्या स्वत:च्या कापडाच्या गरजेसाठी आपण करावा यासाठी अनुकूल वातावरण आपल्याला तयार केले पाहिजे. खादीचा वापर करून आपण मानवजमातीच्या सर्वात प्राचीन कौशल्याचे जतन करणार आहोत.

■■■

लेखक नवी दिल्ली येथील राष्ट्रीय गांधी संग्रहालयाचे संचालक आहेत.
email : nationalgandhimuseum@gmail.com

# वस्त्रोद्योग क्षेत्रातील कामगार कल्याण योजना

अजय तामता



**केंद्र सरकार कामगारांना निरोगी पर्यावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे.त्यासाठी अनेक कल्याणकारी योजना आखण्यात आल्या आहेत. जेणेकरून वस्त्रोद्योग क्षेत्रात गुणात्मक वाढ होईल.वस्त्रोद्योगाचा प्रचंड आवाका आणि त्याच्याशी संबंधित असलेली विविध क्षेत्रे बघता अनेक प्रकारची कौशल्ये अवगत असलेल्या कामगारांची मोठ्या प्रमाणावर गरज भासत असते.**

वस्त्रोद्योग हा देशातील खूप जुना आणि मोठा उद्योग आहे. पुरातत्वशास्त्राच्या अभ्यास आणि सर्वेक्षणावरून असे दिसून आले आहे की, सुमारे चार हजार वर्षांपूर्वीच्या हडप्पा संस्कृतीमधील लोकांना विणण्याची कला अवगत होती. वस्त्रोद्योगाची ही वैभवशाली गाथा गेली चार सहस्त्रके देशात नांदत आहे आणि आज हा उद्योग देशातील कापड क्षेत्रातील लाखो कामगारांच्या उपजीविकेचे साधन बनला आहे. याच क्षेत्रात इतर लाखो कामगारांनाही रोजगार उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरु आहेत. केंद्र सरकार कामगारांना निरोगी पर्यावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्यासाठी अनेक कल्याणकारी योजना आखण्यात आल्या आहेत. जेणेकरून वस्त्रोद्योग क्षेत्रात गुणात्मक वाढ होईल. वस्त्रोद्योगाचा प्रचंड आवाका आणि त्याच्याशी संबंधित असलेली विविध क्षेत्रे बघता अनेक प्रकारची कौशल्ये अवगत असलेल्या कामगारांची मोठ्या प्रमाणावर गरज भासत असते. कामगारांच्या या गरजा लक्षात घेऊन केंद्र सरकारने अनेक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे, त्या पुढीलप्रमाणे:

**१) यंत्रमाग क्षेत्रासाठीच्या कल्याणकारी उपाययोजना :**

**अ) गट विमा योजना**

यंत्रमाग विणकर हे समाजातील अल्प उत्पन्न गटातील असल्यामुळे त्यांना कोणत्याही आयुर्विम्याचे अथवा आरोग्य विम्याचे संरक्षण मिळत नाही.परिणामी ते अत्यंत हलाखीचे जीवन जगत असतात.हे लक्षात घेऊनच जुलै,२००३मध्ये वस्त्रोद्योग क्षेत्रातील विणकरांसाठी गट विमा योजना लागू करण्यात आली आणि १२व्या पंचवार्षिक योजनेतही ती सुरु ठेवण्यात आली. वस्त्रोद्योग मंत्रालयान्तर्गत येणाऱ्या मुंबईस्थित वस्त्रोद्योग आयुक्त कार्यालयामार्फत ही योजना राबविली जाते. विणकरांना त्याचे पुढीलप्रमाणे फायदे मिळतात :

अ) नैसर्गिक मृत्यू झाल्यास ६०,००० रुपये,

ब) अपघाती मृत्यू झाल्यास १,५०,००० रुपये,

क) अपघातामुळे कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास १,५०,००० रुपये,

ड) अपघातामुळे अंशत: अपंगत्व आल्यास ७५,००० रुपये.

विमाधारक व्यक्तीच्या मुलांना शिक्षण सहाय्य योजनेचा

लाभही मिळतो.या योजनेंतर्गत या व्यक्तीच्या दोन मुलांच्या ९वी ते १२वी पर्यंतच्या शिक्षणासाठी दरवर्षी जास्तीत जास्त २४०० रुपयांपर्यंत शैक्षणिक अनुदान दिले जाते.या विम्याचा वार्षिक हप्ता ४७०/- रुपये आहे.त्यापैकी विमाधारकाला केवळ ८० रुपये भरावे लागतात.हप्त्याची उर्वरित रक्कम केंद्र सरकार भरते.

**ब) वस्त्रोद्योग क्षेत्रातील विणकरांसाठी पुनर्वसन निधी योजना**

वस्त्रोद्योग विभाग किंवा त्याचा एखादा भाग पूर्णत: किंवा अंशत: बंद झाला तर या योजनेंतर्गत कामगारांना अंतरिम मदत दिली जाते.

यावर्षी ऑगस्ट,२०१६ अखेरपर्यंत देशातील बंद पडलेल्या ९८ कापड गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या १,१७,७५१ कामगारांना एकूण ३१९.६६ कोटी रुपयांची मदत देण्यात आली.

**२) हातमाग कामगारांसाठी कल्याणकारी योजना**

हातमाग क्षेत्रात काम करणाऱ्या विणकरांची स्थितीही यंत्रमाग क्षेत्रात काम करणाऱ्या विणकरांपेक्षा फार काही वेगळी नाही.हातमाग क्षेत्रात काम करणारे विणकर देशभर विखुरलेले आहेत.ते अगदी दुर्गम आदिवासी भागात आढळतात.तसेच ते त्यांच्या त्यांच्या मूळ गावातही काम करताना दिसतात.त्यामुळेच दिवसेंदिवस त्यांचे सामाजिक सुरक्षा जीवन अधिकाधिक गुंतागुंतीचे होऊ लागले आहे.केंद्र सरकारने त्यांच्यासाठी अनेक कल्याणकारी योजना सुरु केल्या आहेत त्यापैकी काहींची माहिती आता बघूया!

अ) महात्मा गांधी विणकर विमा योजना या योजनेंतर्गत विणकरांना विमा संरक्षण पुरविले जाते. हा विमा उतरवलेल्या विणकरांना पुढीलप्रमाणे फायदे मिळू शकतात :

---

***२९ मार्च ,२०१६ रोजी आरोग्य मंत्रालयाने एक सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करून राष्ट्रीय स्वास्थ्य बिमा योजनेचा लाभ हातमाग विणकरांनाही मिळेल, असे जाहीर केले.या योजनेनुसार रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या रुग्णालाही ३०,०००/- रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण मिळते.***

---

१) नैसर्गिक मृत्यू झाल्यास ६०,०००/- रुपये,
२) अपघाती मृत्यू झाल्यास १,५०,०००/- रुपये,
३) अपघातामुळे कायमचे अपंगत्व आल्यास १,५०,०००/- रुपये
४) अपघातामुळे अंशत: अपंगत्व आल्यास ७५,०००/- रुपये

**ब) आरोग्य विमा योजना**

बाराव्या योजनेत आर्थिक व्यवहार मंत्रिमंडळ समितीने आरोग्य विमा योजनेला मंजूरी दिली.ही योजना कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या राष्ट्रीय स्वास्थ्य बिमा योजनेच्या धर्तीवर आधारित आहे आहे.सध्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत ही योजना राबवली जाते. २९ मार्च ,२०१६ रोजी आरोग्य मंत्रालयाने एक सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करून राष्ट्रीय स्वास्थ्य बिमा योजनेचा लाभ हातमाग विणकरांनाही मिळेल, असे जाहीर केले.या योजनेनुसार रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या रुग्णालाही ३०,०००/- रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण मिळते. सध्या आसाम, बिहार, छत्तीसगड, गुजरात, हरयाणा, हिमाचल प्रदेश, झारखंड, कर्नाटक, केरळ, मणिपूर, मेघालय, मिझोराम, ओडिशा, पंजाब, राजस्थान, त्रिपुरा, उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि पश्चिम बंगाल या १९ राज्यांमध्ये राष्ट्रीय स्वास्थ्य बिमा योजना राबविली जाते.

तामिळनाडूमध्ये राष्ट्रीय स्वास्थ्य बिमा योजना राबविली जात नाही, पण याच योजनेच्या धर्तीवर असलेल्या आरोग्य विमा योजनेला तेथील मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.या योजनेनुसार रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या रुग्णाला केंद्र सरकारकडून ३०,०००/- रुपयांपर्यंतची मदत दिली जाते.तर बाह्य रुग्णांना ७,५००/-रुपयांपर्यंत मदत दिली जाते.एक ऑक्टोबर,२०१५पर्यंत या योजनेंतर्गत १,४४,२९४ विणकरांचे नामनिर्देशन करण्यात आले आहे.

**३) हस्तकला क्षेत्रातील विणकरांसाठी कल्याणकारी**

**योजना :**

देशातील हस्तकला उद्योगाला समृद्ध परंपरा असून ग्रामीण आणि आदिवासी भागापासून ते अगदी दुर्गम अंतर्गत भागात तो सर्वदूर पसरलेला आहे.हस्तकला क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने केंद्र सरकार अनेक योजना राबवित आहे,त्या पुढीलप्रमाणे :

**अ) राजीव गांधी शिल्पी स्वास्थ्य बिमा योजना**

ही योजना प्रायोगिक तत्त्वावर २००६-०७ मध्ये सुरु करण्यात आली आणि ११व्या आणि १२व्या योजनेतही चालू ठेवण्यात आली. कारागीराला या योजनेत नोंदणी करण्यासाठी फक्त ३० रुपये भरावे लागतात आणि याची ७५ टक्के रक्कम केंद्र सरकार भरते तर राहिलेली २५ टक्के रक्कम राज्य सरकारांकडून भरली जाते. जम्मू आणि काश्मीर तसेच ईशान्येकडील राज्यांच्या बाबतीत हप्त्याची ९० टक्के रक्कम केंद्र सरकार भरते.या योजनेंतर्गत कारागीराला त्याच्यासह कुटुंबातील इतर चार सदस्यांना या आरोग्य विमा योजनेचा लाभ मिळतो.विमा उतरवलेल्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याला उपचारासाठी रुग्णालयात भरती करण्याची वेळ आली तर कुटुंबाला ३०,०००/- रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण मिळते.रुग्ण जर बाह्य रुग्ण विभागात उपचार घेत असेल तर त्याला ७,५००/- रुपयांपर्यंतची रक्कम मिळू शकते.आता या योजनेचे राष्ट्रीय स्वास्थ्य बिमा योजनेत विलीनीकरण करण्यात आले आहे आणि एक एप्रिल,२०१७पासून या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे राहणार आहे.या योजनेंतर्गत आतापर्यंत २३,७४,९३८ कारागीरांची नोंदणी करण्यात आली आहे.

**ब) आम आदमी बिमा योजना**

हस्तकला क्षेत्रातील कारागिरांना विम्याचे संरक्षण देण्याच्या उद्देशाने २००४-०५मध्ये भारतीय आयुर्विमा महामंडळाने जनश्री विमा योजनेची अंमलबजावणी सुरु केली. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीने ११व्या योजनेत या योजनेला मंजूरी दिली असली तरी तिचे नाव वित्त खर्च समितीच्या शिफारशीवरून बदलण्यात येऊन ते आम आदमी बिमा योजना करण्यात आले.गेल्या तीन वर्षांत(म्हणजे २०१३-१४ ते २०१५-१६ या काळात) आणि चालू आर्थिक वर्षात म्हणजे २०१६-१७ च्या जून,२०१६पर्यंत २३,३१,२८८ कारागीरांना या योजनेखाली संरक्षण देण्यात आले.सध्या प्रधान मंत्री जीवन ज्योती बिमा योजना आणि प्रधान मंत्री सुरक्षा बिमा योजना, या दोन योजनांमध्ये या आम आदमी बिमा योजनेचे विलीनीकरण करण्याचा प्रस्ताव आहे.

**गरीब कारागिरांना आर्थिक सहाय्य**

या कारागिरांच्या संधीकालात म्हणजेच वृद्धापकाळात त्यांना या योजनेंतर्गत आर्थिक मदत दिली जाते.वयाची ६० वर्षे पूर्ण केलेल्या, गरीब,वृद्ध आणि शिल्प गुरु किंवा राष्ट्रीय पुरस्कार किंवा राष्ट्रीय गुणवत्ता किंवा राज्य हस्तकला पुरस्कार प्राप्त आणि ज्यांचे वार्षिक उत्पन्न ३०,०००रुपयांपेक्षा कमी असलेल्या कारागिरांना दरमहा ३,००० रुपयांची मदत दिली जाते. या योजनेंतर्गत सन २०१४-१५ ते २०१६-१७ या काळात १०३५ कारागीरांना १६४.०६ लाख रुपयांचे अर्थ सहाय्य करण्यात आले.

**४) ताग क्षेत्रातील कामगारांसाठी कल्याणकारी योजना**

**अ)** गिरणी परिसरात स्वच्छता:


या योजनेंतर्गत तागाच्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबियांना स्वच्छता सुविधा पुरविण्याचे उद्दिष्ट आहे.यामध्ये महिला आणि पुरुषांसाठी स्वच्छतागृहे,वॉश

बेसिन आदींचा समावेश आहे. राष्ट्रीय ताग मंडळ यासाठी एकूण रकमेच्या ९०टक्के किंवा कमाल ४० लाख रुपयांपर्यंतची आर्थिक मदत करते.

ब) ताग कामगारांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी शिष्यवृत्ती योजना:

ताग गिरणी कामगारांच्या मुलांमध्ये विशेषत: मुलींमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या प्रत्येक मुलीला उच्च माध्यमिक परीक्षेसाठी ५,००० ते १०,००० रुपयांपर्यंतची शिष्यवृत्ती दिली जाते. वर्ष २०१५-१६ मध्ये या योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली. त्यानुसार शिष्यवृत्तीची रक्कम पदवीधरांसाठी १५,००० तर पदव्युत्तर पदवीधरांसाठी २०,०००रुपये इतकी करण्यात आली. याशिवाय अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, सी.ए., सी.एस., आय.सी.डब्ल्यू.ए. यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी वार्षिक अध्यापन शुल्क (ट्युशन फी) भरण्यासाठीही आर्थिक मदत केली जाते. २०१३-१४ या वर्षापासून आत्तापर्यंत ६,७३३ विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

***राजीव गांधी शिल्पी स्वास्थ्य बिमा योजना ही योजना प्रायोगिक तत्त्वावर २००६-०७ मध्ये सुरु करण्यात आली आणि ११व्या आणि १२व्या योजनेतही चालू ठेवण्यात आली. कारागीराला या योजनेत नोंदणी करण्यासाठी फक्त ३० रुपये भरावे लागतात आणि याची ७५ टक्के रक्कम केंद्र सरकार भरते तर राहिलेली २५ टक्के रक्कम राज्य सरकारांकडून भरली जाते.***



क) ताग गिरणी कामगारांपैकी अनुसूचित जाती आणि जमातीच्या कामगारांसाठी आयुर्विमा योजना :

ताग गिरणी कामगारांपैकी अनुसूचित जाती आणि जमातीच्या कामगारांसाठी प्रारंभी ऑगस्ट, २०१६ ते मार्च, २०१९ या तीन वर्षांसाठी ही आयुर्विमा योजना बंधनकारक असेल. १) प्रधान मंत्री जीवन ज्योती बिमा योजना आणि २) प्रधान मंत्री सुरक्षा बिमा योजना,हे या योजनेचे दोन घटक आहेत.

वस्त्रोद्योग कामगारांच्या लाभासाठी वस्त्रोद्योग मंत्रालय वेळोवेळी या योजनांवर देखरेख ठेवत असते. कामगारांच्या हिताला मंत्रालय सर्वोच्च प्राधान्य देते आणि त्यांच्यासाठी बनवण्यात आलेल्या कल्याणकारी योजनांमध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील असते.

■■■

*लेखक केंद्रीय वस्त्रोद्योग राज्यमंत्री आहेत.*

email: mos-textiles@gov.in

# महाराष्ट्रातील वस्त्रोद्योग : स्वरुप, व्याप्ती आणि आव्हाने

उज्ज्वल उके



**महाराष्ट्र राज्यात हातमाग उद्योग हा शेती खालोखाल पारंपारिक उद्योग होता. या उद्योगामध्ये १,८५,००० हातमाग कार्यरत होते. राज्यात ६६५ हातमाग विणकर सहकारी संस्था, १ केंद्रीय हातमाग विणकर सहकारी संस्था व महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ यांचेद्वारे विपणनाची व्यवस्था करण्यात आली असून www.indrayanihandlooms.com या ई-मार्केटिंग वेब साईटद्वारे राज्य शासनाच्या अर्थसहाय्यातून विपणनाची भरीव व्यवस्था करण्यात आली आहे.**

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक संरचनेमध्ये वस्त्रोद्योग क्षेत्राची अत्यंत महत्वाची भुमिका आहे. वस्त्रोद्योग हा शेती व्यवसायानंतरचा महत्वाचा व्यवसाय आहे. शेती व्यवसायानंतर या उद्योगामध्ये जास्तीत जास्त रोजगार निर्मिती करण्याची क्षमता आहे.

**हातमाग उद्योग :-**

महाराष्ट्र राज्यात हातमागाच्या पारंपारिक व पुरातनकलेस प्रदीर्घ परंपरा आहे. पुरातन कालापासून महाराष्ट्रात हातमागावर उत्तम प्रतिचे कलाकुसरीचे कापड तयार होते. पैठणी या महाराष्ट्रातील हातमागावर तयार होणाऱ्या साडया देशातच नव्हे तर जगात सुप्रसिध्द आहे. महाराष्ट्र राज्यात हातमाग उद्योग हा शेती खालोखाल पारंपापरिक उद्योग होता. या उद्योगामध्ये १,८५,००० हातमाग कार्यरत होते. राज्यात ६६५ हातमाग विणकर सहकारी संस्था, १ केंद्रीय हातमाग विणकर सहकारी संस्था व महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ यांचेद्वारे विपणना ची व्यवस्था करण्यात आली असुन www.indrayanihandlooms.com या ई-मार्केटिंग वेब साईटद्वारे राज्य शासनाच्या अर्थसहाय्यातून विपणनाची भरीव व्यवस्था करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त राज्यात जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर प्रदर्शनाचे आयोजन राज्य शासनाच्या अर्थसहाय्याने करण्यात येत असून यात २० कोटीपेक्षा जास्त कापडाची विक्री करण्यात येते.

**यंत्रमाग उद्योग :-**

महाराष्ट्र राज्यात सुमारे १२.७० लाख यंत्रमाग आहेत. हे यंत्रमाग देशात असलेल्या यंत्रमागाच्या संख्येच्या सुमारे ५० टक्के आहे. राज्यात असलेल्या यंत्रमागापैकी ८५ टक्के यंत्रमाग साध्या स्वरुपाचे जुन्या बनावटीचे किंवा स्थानिक उत्पादकांनी तयार केलेले यंत्रमाग आहेत व या यंत्रमागावर देशात आवश्यक असलेले साधारण कापडाचे उत्पादन केले जाते. साध्या यंत्रमागावर निर्यातभिमुख कापडाचे सर्वसाधारणपणे उत्पादन केले जात नाही. राज्यात १५ टक्के स्वयंचलित यंत्रमांगावर निर्यातभिमुख व दर्जेदार कापडाचे उत्पादन केले जाते. या यंत्रमागांमुळे राज्यात सुमारे ३० लाख लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरुपात रोजगार उपलब्ध होत आहे. राज्यात असलेल्या यंत्रमागापैकी सुमारे ७० टक्के यंत्रमाग जॉबवर्क पद्धतीने कार्यरत

आहेत.

**यंत्रमाग सहकारी संस्था :-**

यंत्रमाग/ गारमेंट/ प्रक्रिया/ निटींग सहकारी संस्थांना १०:४०:५० या प्रमाणात म्हणजेच १०(स्व:भागभांडवल) :४०(भागभांडवल) :५०(राष्ट्रीय सहकारी विकास निगम) या प्रमाणात अर्थसहाय्य करण्यात येते. या योजनेअंतर्गत भागभांडवल राज्य शासनाने सन २०१५-१६ पर्यंत ४३३ यंत्रमाग/गारमेंन्ट/प्रकीया/निटींग/ गारमेंन्ट सहकारी संस्थांना शासकीय भागभांडवल रुपये ११२.४९ कोटी तथा राष्ट्रीय सहकारी विकास निगम कर्ज रुपये २३८.२९ कोटी असे एकूण ३५०.७८ कोटी अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिलेले आहे. या अर्थसहाय्यामध्ये विदर्भात २४ सहकारी संस्थांना भागभांडवल रुपये ४७४.२६ लाख राष्ट्रीय सहकारी विकास निगम कर्ज ११४४.२८ लाख असे एकूण रुपये १६१८.२८ लाख, मराठवाडा विभागात २५ सहकारी संस्थांना भागभांडवल रुपये ८९१.३८ लाख रा. स. वि. नि. कर्ज १०७५.८० लाख असे एकूण रुपये १९६७.१८ लाख, उर्वरीत महाराष्ट्र विभागात ३८४ सहकारी संस्थांना भागभांडवल रुपये ९८८३.७७ लाख रा. स. वि. नि. कर्ज २१६१०.०२ लाख असे एकूण रुपये ३१४९३.७९ लाख अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

केंद्र पुरस्कृत Pilot Scheme of In-situ Upgradation of Plain Power loom for S.S.I. Sector:-

या योजने अंतर्गत ज्या यंत्रमाग धारकास केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य प्राप्त होईल अशा यंत्रमाग धारकांना प्रतीमाग कमाल रुपये १००००/- इतके अर्थसहाय्य देण्याची योजना राज्य शासनाने कार्यान्वित केली आहे. केंद्र शासनाने अनुदानाची रक्कम मंजुर केल्यानंतर राज्य शासनाकडूनही अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. यानुसार सन २०१४-१५ व २०१५-१६ करिता केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त २५१ लाभार्थ्यांना रुपये १२५.०० लाख अनुदान देण्यात आले आहे.

**एकात्मिक वस्त्रोद्योग संकुल (Integrated Textile Park) :-**

राज्यात एकुण १६ ठिकाणी केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत टेक्सटाईल पार्क उभारण्यात येत आहे. या टेक्सटाईल्स पार्कना पायाभूत व सामुहिक सविधांचा विकास करण्याकरीता केंद्र शासनाकडून प्रकल्प किंमतीच्या ४० टक्के किंवा रुपये ४०.०० कोटी जी रक्कम कमी असेल ती तसेच राज्य शासनाकडून प्रकल्प किंमतीच्या ०९ टक्के किंवा रुपये ९.०० कोटी जी रक्कम कमी असेल ती रक्कम भांडवली अनुदान म्हणुन देण्यात येते. या १६ टेक्सटाईल पार्क पैकी ७ टेक्सटाईल पार्क विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या कापुस उत्पादक क्षेत्रात स्थापन होत आहेत. या वस्त्रोद्योग पार्कमध्ये वस्त्रोद्योगासाठी जागतिक दर्जाच्या मुलभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. सदर वस्त्रोद्योग पार्क्सना आत्तापर्यंत केन्द्र शासनाने रुपये ३१८.३० कोटी तथा राज्य शासनाने ६९.३० कोटी अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिलेले आहे. या टेक्सटाईल पार्क मध्ये १३८७ युनिट कार्यान्वित होणार असुन ६५८५६ लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

**एकात्मिक वस्त्रोद्योग प्रक्रीया योजना ( Integrated Textile Processing Scheme) :-**

वस्त्रोद्योगामध्ये वस्त्र प्रक्रिया उद्योग (Textile Processing) हा मूल्यवर्धनासाठी अत्यंत महत्वाचा उद्योग आहे. वस्त्र प्रक्रिया उद्योगांना पाण्याची उपलब्धता, सुरळीत प्रक्रिया, सांडपाणी आणि टाकावू कचऱ्याची विल्हेवाट लावणे इ. समस्यांना प्रामुख्याने सामोरे जावे लागते. वस्त्र प्रक्रिया उद्योग हा लघु व मध्यम उद्योगाच्या स्वरुपात आहे. लघु उद्योगांना त्यांच्या आर्थिक क्षमतेमुळे प्रदुषण नियंत्रण यंत्रणा उभारणे शक्य होत नाही. वस्त्र प्रक्रिया उद्योगापुढील उपरोक्त नमूद केलेल्या समस्या विचारात घेऊन केंद्र शासनाने वस्त्रोद्योग प्रक्रीया क्षेत्राचा एकात्मिक विकास करण्याच्या दृष्टीने एकात्मिक प्रक्रीया विकास योजना (Integrated Processing Developing Scheme) जाहीर केली आहे. सदर योजनेच्या अंतर्गत सर्व प्रकारच्या वस्त्रोद्योग प्रक्रीया घटकांसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर योजनेंतर्गत केंद्र शासन ज्या प्रकल्पांना अनुदान उपलब्ध करुन देईल त्या प्रकल्पांना राज्य शासनाकडूनही अनुदान उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सदर योजनेअंतर्गत प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या ५०% किंवा रु.७५ कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून तीन हप्त्यात देण्यात येते. या प्रकल्पासाठी विशेष हेतू वहन कंपनी (SPV) ही सभासदांकडून समभाग, केंद्र शासन, राज्य शासन आणि वित्तीय संस्थाकडून कर्ज स्वरुपात निधी उभारतील. प्रकल्प किंमत ही केंद्र, राज्य, लाभधारक व वित्तीय संस्था यांच्याकडून ५०:२५:१५:१०

या प्रमाणात भागविण्यात येईल. या योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून प्रकल्प किंमतीच्या २५% किंवा रु. ३७.५० कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अर्थसहाय्य देण्याचा निर्णय राज्य शासनाने घोषित केला आहे.

केंद्र पुरस्कृत एकात्मिक प्रक्रिया विकास (IPDS) या योजनेचा प्राथमिक उद्देश पर्यावरणपूरक वस्त्रोद्योग प्रक्रिया उद्योग उभारुन भारतीय वस्त्रोद्योग हा जागतिक स्वरुपात स्पर्धाक्षम करणे हा आहे. या योजनेमुळे राज्यातील पर्यावरण विषयक नियम /मार्गदर्शक सूचनेनुसार प्रक्रिया प्रकल्प उभारणे शक्य होईल. या योजनेमुळे नवीन वस्त्र प्रक्रिया संकुल उभारले जातील. त्याचप्रमाणे अस्तित्वातील प्रक्रिया संकुलाचे बळकटीकरण, प्रक्रिया संकुल / क्लस्टर यांना पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापनात पर्यावरण पूरक संशोधन व विकास प्रकल्प स्थापन करण्यासाठी मदत होईल.

**सुतगिरण्या :-**

महाराष्ट्राच्या वस्त्रोद्योगात सुतगिरण्यांचा मोठा वाटा आहे.राज्य शासनाकडून सहकारी सुतगिरण्यांना स्वभांडवल,शासकीय भागभांडवल व कर्जाचे प्रमाण अनुक्रमे ५:४५:५० या आकृतीबंधाप्रमाणे अर्थसहाय्य देण्याची योजना चालु आहे. मागासवर्गीय सहकारी सुतगिरण्यांना सामाजिक न्याय विभागाकडून कर्ज सवलत उपलब्ध करुन देण्यात येते.

या योजने अंतर्गत सहकारी सूत गिरण्यांना अर्थसहाय्य करण्याच्या आकृतीबंधानुसार कर्ज व भाग भांडवलाचे प्रमाण १:१ ठेऊन, प्रकल्प किंमतीच्या अनुषंगाने सभासदांनी जमा केलेल्या भाग भांडवलाच्या १:९ पट रक्कम राज्य शासनाकडून शासकीय भाग भांडवल म्हणून उपलब्ध करुन देण्यात येते.

उभारणीखालील सूत गिरण्यांची सुधारित प्रकल्प किंमत रु.६१.७४ कोटी एवढी निश्चित करण्यात आलेली आहे.

**राज्य शासन पुरस्कृत टेक्सटाईल पार्क :-**

जळगांव,यवतमाळ, औरंगाबाद, जालना, परभणी,बुलढाणा, नांदेड, अमरावती व बीड या मोठ्या प्रमाणावर कापुस उत्पादन होणाऱ्या जिल्हयात राज्य शासनाकडून टेक्सटाईल पार्क स्थापन करण्यात येणार आहेत. या टेक्सटाईल पार्कची स्थापना महाराष्ट्र ओद्योगिक


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ______________________ date ______________

Name (in block letters) : ______________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______________________

Phone No. / email : ______________________

PIN : □□□□□□

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे. या टेक्स्टाईल पार्क मध्ये रस्ते,पाणी, विज ईत्यादी आवश्यक त्या पायाभूत सुविधांसह CETP, परीक्षण प्रयोग शाळा (Testing Lab)कौशल्य विकास केंद्र यांचा समावेश असेल.

**वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७:-**

सहकारी क्षेत्रातील हातमाग यंत्रमाग व सहकारी सुतगिरण्या व्यतिरिक्त खाजगी क्षेत्रात हा उद्योग मोठया प्रमाणात कार्यरत असल्याने या उद्योगाला सुध्दा चालना देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने दि. २.१.२०१२ पासून राज्याचे वस्त्रोद्योग धारेण २०११-१७ या कालावधी करीता जाहीर केले आहे. या धोरणाचा उद्देश राज्यातील कापड उद्योगात वाढ, रोजगारामध्ये वाढ आणि कापूस उत्पादक क्षेत्रात दिर्घ मुदतीच्या आश्वासक विकासासाठी कापूस ते तयार वस्त्र निर्मितीच्या विविध स्तरावरील प्रक्रिया घटकांच्या उभारणीवर विशेष भर देऊन पुढील ५ वर्षात राज्यात शिल्लक राहणारया ४५ लाख कापूस गाठीवर विविध स्तरावरील मुल्यवर्धनाच्या प्रक्रिया करणाऱ्या वस्त्रोद्योग घटकांच्या उभारणीसाठी रु. ४०,००० गुंतवणूक आकर्षित करणे आणि त्याद्वारे ११ लाख नवीन रोजगार निर्मिती करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

या वस्त्रोद्योग धोरणा अंतर्गत राज्यात स्थापित होणाऱ्या वस्त्रोद्योग घटकास ५ ते ७ टक्के व्याज अनुदान व विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या कापूस उत्पादक क्षेत्रात स्थापन होणाऱ्या वस्त्रोद्योग घटकास व्याज अनुदानासह १० टक्के भांडवली अनुदान देण्याची तरतुद आहे.

दि. १८.४.२०१६ नंतर ज्या वस्त्रोद्योग घटकास TUFS योजनेंतर्गत दिर्घ मुदती कर्ज वित्तीय संस्थेने मंजूर केले आहे. अशा उद्योगांना २५ ते ३५ टक्के पर्यंत भांडवली अनुदान मंजूर करण्यात येईल. या शिवाय विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील अशा वस्त्रोद्योग घटकांना ३५ ते ४५ टक्के भांडवली अनुदान दीर्घ मुदती कर्जावर देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

राज्यात कापसापासून तयार कापडापर्यंत सर्व व्यवस्था उपलब्ध व्हावी या दृष्टीकोनातून आवश्यक सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे यंत्रमाग उद्योगाला राज्यात सुलभरित्या सुत उपलब्ध व्हावे व यंत्रमागावरील तयार कापडापासून रेडीमेड गारमेंन्ट तयार व्हावे या दृष्टीकोनातुन आवश्यक सर्व प्रयत्न करण्यात येत आहेत.


Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

राज्यातील कापड उद्योगात वाढ व रोजगारामध्ये वाढ आणि कापूस उत्पादक क्षेत्रात प्राथम्याने दिर्घ मुदतीच्या आश्वासक विकासासाठी कापूस ते तयार वस्त्र निर्मितीच्या विविध स्तरावरील प्रक्रिया घटकाच्या उभारणीवर विशेष भर देण्याचे उद्दीष्ट ठेऊन राज्यशासनाने जाहीर केलेल्या वस्त्रोद्योग धोरणाचे दि.३१ ऑगष्ट,२०१६ पर्यंतचे फलीत खालील प्रमाणे आहे.

तसेच या धोरणाअंतर्गत आता पर्यंत खालील प्रमाणे निधी वितरीत करण्यात आला आहे.

| विभाग | उद्योग | गुंतवणूक (रु. लाखात) | रोजगार |
|---|---|---|---|
| मराठवाडा | १४२ | ५६२८८.११ | ४२७२ |
| विदर्भ | २१० | ५३४४३१.०४ | २०९११ |
| उ. महाराष्ट्र | ३१७ | २६६८८३.०० | ९०६१ |
| उर्वरीत महाराष्ट्र | १७९४ | १०,६१,९१२.२३ | ६२२७२ |
| एकूण | २४६३ | १९,१९,५१४.३८ | ९६५१६ |

१. व्याज सवलत

| विभाग | विभाग | प्रकल्प | वितरीत निधी (रु. लाखात) |
|---|---|---|---|
| मराठवाडा | ५१ | ५५९.२ | |
| विदर्भ | ७८ | ५६३२.२ | |
| उ. महाराष्ट्र | ८५ | २१४८.८ | |
| उर्वरीत महाराष्ट्र | ४२२ | ११८०१.३ | |
| एकुण | ६३६ | २०१४१.७८ | |

२. भांडवली सवलत

| विभाग | प्रकल्प | वितरीत निधी (रु. लाखात) |
|---|---|---|
| मराठवाडा | ५० | ६५२.२५ |
| विदर्भ | ४० | ५१४६.४३ |
| उ. महाराष्ट्र | १०८ | ४५८७.६५ |
| उर्वरीत महाराष्ट्र | ०० | ०.०० |
| एकूण | १९८ | १०३८६.३३ |

**वीज दरात सवलत:-**

उद्योग उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय दिनांक २९/०६/२०१६ अन्वये विदर्भ मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगीक ग्राहकांना इंधन समायोजन आकारात विदर्भातील उद्योगांना ४० पैसे प्रति युनिट, मराठवाडयातील उद्योगांना ३० पैसे प्रति युनिट व उत्तर महाराष्ट्रातील उद्योगांना २० पैसे प्रति युनिट इतकी सवलत देण्यात आलेली आहे.त्याचप्रमाणे उद्योगाच्या कार्यक्षमतेवर आधारीत सवलत आणि विदर्भ व मराठवाडा विभागात स्थापीत होणऱ्या नविन उद्योगाकरिता रुपये ०.७५ प्रती युनिट, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील झोन मध्ये स्थापीत होणाऱ्या नविन उद्योगाकरिता रुपये ०.५० प्रती युनिट सवलत देण्यात आलेली आहे. या सवलती महावितरण कंपनीकडुन १०० टक्के वीज घेणऱ्या विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगीक ग्राहकांना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्यातील वस्त्रोद्योगा समोर मुबलक प्रमाणात सुताची उपलब्धता व इतर राज्याच्या तुलनेत वीजेच्या दरातील तफावत त्याचप्रमाणे प्रोसेसिंग/प्रक्रिया उद्योगाची कमतरता ही मुख्य आव्हाने आहेत.

■■■

*लेखक महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागात अतिरिक्त मुख्य सचिवपदी कार्यरत आहेत.*
email: psectex.cmtd@maharashtra.gov.in

# वस्त्रोद्योगातील कल-२०१६-१७

खरंतर हे उपरोधिक आहे, जेव्हा जेव्हा माझे पुढे पुढे मार्गक्रमण चालू असते तेव्हा तेव्हा मी मागे पाहून सिंहावलोकन करण्याची माझ्यावर सक्ती असते. जो पर्यंतचा काळ मला आठवतो, त्याप्रमाणे आपल्या देशातील उच्च परंपरा आणि अतुल्य सांस्कृतिक वारसा या पासून मला स्फूर्ती मिळत आहे. मला या उत्साहवर्धक आणि सौंदर्यपूर्ण गोष्टी माझ्यामध्ये सामावून घेण्यामध्ये रस आहे. गेल्या २५ वर्षांच्या माझ्या खडतर आयुष्यात थोडीशी देखील उसंत न घेता मी आपल्या देशात खोलवर लपलेल्या, अगदी दूरवरच्या खेड्यातील किंवा अतिदुर्गम अशा भागातील जमातीमध्ये माझा प्रवास चालू आहे. मला त्यामुळे आपल्या कडील पारंपारिक विणकामतंत्र, विणकरांकडील नक्ष्यांचे मूलस्त्रोत, रंगकाम, भरतकाम तंत्र आणि इतर अनेकविध कल, नक्ष्या इ. कशिदाकाम मला शिकायला मिळाले आहे.

एक गोष्ट अगदी स्पष्ट आहे. ती म्हणजे नक्षीकामाचा अत्युच्च वारसा आपल्याला अनंतकालापासून लाभला आहे. परंतु आजच्या जगात जेथे डिझाइन्स आणि संस्कृती यांच्यातील सीमा अतिपारदर्शी होत आहेत, त्यामुळे आपल्या पारंपारिक नक्ष्यांचे मूल्यांकन करणे तसेच त्यात नाविन्य आणणे आणि जागतिक बाजारपेठेत त्याला स्थान मिळवून देणे अत्यावश्यक ठरते. मात्र हे ही लक्षात घ्यायला हवे की, आपण कोणत्याही प्रकारची तडजोड स्विकारता कामा नये. या साऱ्याचा अधिकाधिक उपयोग मी माझ्या वस्त्रांच्या पृष्ठभागावर प्रक्रिया करण्यासाठी त्याचप्रमाणे नक्ष्यांमध्ये बदल करण्यासाठी केला आहे. परंतु आधुनिक स्वरुपात त्याची मांडणी करुन कलाकुसरीला सौंदर्याच्या चौकटीत बसवले आहे.

सन २०१६-१७ मध्ये वस्त्रोद्योगाच्या लयदार वाटचालीवर भाष्य करायचे असल्यास ती अतिशय गतीशील तसेच नव्या व जुन्याचे सुरेख मिश्रण, त्याला पारंपारिक कल्पनांचा आणि नक्षीकामाचा बाज असेल . खालील प्रमाणे वस्त्रोद्योगातील महत्वाची अंगे असतील.

रंग - आपला देश आणि रंग यांचं नातं दृढ असं आहे. त्याला वैभव प्राप्त झाले आहे. सन २०१६ मध्ये तोच सिलसिला चालू राहील. भारतीय कलाकुसरीवर निसर्गाचा पारंपारिक प्रभाव आहे. तोच परिणाम २०१६-१७ मध्येही दिसेल. खास करुन हिरव्या पानांचा तजेलपणा, कमळपुष्पांचा विलोभनीय गुलाबी रंग आणि इतर भूतलावरचे रंगघटक उदा. गेरु रंग (पिवळसर मातकट) किंवा गव्हाळी रंग इ. आपल्याला या रंगामंळे प्रसन्नता लाभेल तसेच उत्साहही येईल. या रंगसंगतीच्या पलिकडे जाऊन वस्त्रोद्योगामध्ये एका रंगात रंगवलेले चित्र महत्वाचे स्थान पटकावते.

वस्त्रसामग्री -बाजीराव मस्तानी चित्रपटाच्या निर्मितीच्या काळात पोशाखाच्या नक्ष्यांचे संशोधन करताना माझा मार्ग बराच समस्यांचा होता.सुमारे ५०० प्रकारच्या खादीचे नमुने मला अभ्यासावे लागले आणि मी निग्रहपूर्वक सांगू शकते की, आपल्या देशातील उत्कृष्ट अशा हस्त कौशल्याचे दर्शन मला घडले. पुन्हा एकदा खादी या वस्त्राने आपली लोकप्रियता वाढवली असून ते एक हवेहवेसे वस्त्र बनत आहे. सुती आणि त्या समान वस्त्रांची लोकप्रियता टिकून आहे. त्याला आपल्याकडील प्राचिन हस्तकौशल्याचा वारसा लाभला आहे. त्याला टिकाऊपणाही आहे. त्याचप्रमाणे अशा वस्त्रांवर केलेल्या प्रक्रियांचा परिणाम होत नाही. ते अधिकच सक्षम बनते. त्याचा पोत कायम राहतो. आपला प्रयत्न असा आहे की जुन्या आणि नव्या वस्त्रांचा मिलाफ करुन त्याला आधुनिकतेची जोड द्यायला हवी. हा मिलाफच २०१६-१७ मध्ये अव्वलस्थानी राहिल. या मध्ये, विविध प्रकारच्या तंतूंपासून त्यांचे मिश्रण करुन तयार करतात. ज्यामुळे शीतलता मिळते.

नक्षीकारी - हलक्या फुलक्या नक्ष्यांचे मिश्रण असलेला, समकालीन, भौमितिक चौकड्यांचा किंवा पट्ट्यापट्ट्यांचा असा कल २०१६-१७ मध्ये वस्त्रोद्योगात दिसेल. पुन्हा एकदा बहुतांश डिझाइन्स असतील ती निसर्गाधारित असतील. ती सुध्दा 'शिकार का जाल' अर्थात भारतीय पक्षी उदा. मोर किंवा पोपट इ. पक्ष्यांवर आधारित असतील. त्याच प्रमाणे फुले किंवा निसर्गातील इतर घटक यांची त्यात महत्वपूर्ण भूमिका असेल. परस्पर विरोधी असे भारतीय हे पॅटर्न उदा. संगानेरी, बाग्रु, अजरख यांचाही फार मोठा बोलबाला असेल. किंबहुना हे सर्वत्र दिसतील. फक्त वस्त्रांवरच नाही तर घरगुती सजावटी मध्येही यांचा प्रभाव असेल.

■■■

# महाराष्ट्रातील रेशीम उद्योग

एन.पी.एगलेवाड



**रेशीम उद्योगास अनुकूल वातावरण महाराष्ट्रात असून या उद्योगाच्या वाढीस खूप वाव आहे. ही बाब लक्षात घेऊन केंद्र आणि महाराष्ट्र सरकार विविध योजनांद्वारे रेशीम उद्योगास प्रोत्साहन देत आहे. या उद्योगाची महाराष्ट्रातील सद्यस्थिती, विविध योजना आणि भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न या लेखात करण्यात आला आहे.**

रेशीम उद्योगामध्ये प्रामुख्याने तुती रेशीम आणि टसर रेशीम यांचा समावेश होतो. या दोन्ही प्रकारचे रेशीम महाराष्ट्रात तयार केले जाते. रेशीम उद्योगास अनुकूल वातावरण महाराष्ट्रात असून या उद्योगाच्या वाढीस खूप वाव आहे. ही बाब लक्षात घेऊन केंद्र आणि महाराष्ट्र सरकार विविध योजनांद्वारे रेशीम उद्योगास प्रोत्साहन देत आहे. या उद्योगाची महाराष्ट्रातील सद्यस्थिती, विविध योजना आणि भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न या लेखात करण्यात आला आहे.

**१) तुती रेशीम उद्योग**

रेशीम शेती उद्योग हा कृषीवर आधारीत, रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला व ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी मदत करणारा उद्योग आहे. महाराष्ट्राची भौगोलीक परिस्थिती व हवामान रेशीम शेती उद्योगास पुरक असून सध्याच्या वातावरणाच्या लहरीपणामुळे शेतीमध्ये होणारे नुकसान टाळण्यासाठी या उद्योगाची हमखास मदत होऊ शकते. महाराष्ट्रात रेशीम संचालनालयाची स्थापना १ सप्टेंबर १९९७ रोजी झालेली आहे.

अशा या वैशिष्टपूर्ण उद्योगात महाराष्ट्र राज्य हे अपारंपारिक राज्यामध्ये क्रमांक १ वर आहे. राज्यामध्ये तुती रेशीम व टसर (वन्य) रेशीम असे दोन प्रकारचे रेशीम उद्योग आहेत. तुती रेशीम उद्योग पुणे, औरंगाबाद, व अमरावती व नागपूर विभागात एकुण २४ जिल्हयात सुरु आहे. टसर रेशीमाचे उत्पादन नागपूर विभागातील प्रामुख्याने गडचिरोली, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर या जिल्हयात घेतले जाते. तुती व टसर रेशीम अंतर्गत राज्याची गेल्या पाच वर्षाची प्रगती लेखातील दोन तक्त्यांत दिली आहे.

**राज्यात रेशीम उद्योगाअंतर्गत लाभार्थ्यांना पुढील प्रमाणे योजना देण्यात येत आहेत.**

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - सन २०१५-१६ पासून संपूर्ण राज्यात तुती लावगड मनरेगा अंतर्गत करण्यात येत असून त्यांचे खालील प्रमाणे प्रति वर्षी प्रमाणे अनुदान देण्यात येते.

१) तुती लागवड, किटक संगोपनगृह व किटक संगोपन साहित्य इत्यादीसाठी रुपये १९२६७४/- एकूण ३ वर्षासाठी

२) किटक संगोपनगृह - १००० स्वे. फुट साठी रुपये ८९९४६/- , ६०० स्वे. फुट साठी रुपये

## तुती व टसर रेशीम उदयोगचा माहितीचा अहवाल (सन २००९-१० ते २०१५-१६ पर्यत)

### १. तुती रेशीम -

| अ. क्र | तपशिल | एकक | १९९७-९८ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ ऑगस्ट १६ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तुती लागवड | एकर | १७६५ | ९३५९ | ७३३०.८ | ५८१६ | ४३८६.१ | ३७२०.२५ | ६९३४.५ | ९८६६.५५ | ७२४० |
| २ | लाभार्थी | संख्या | १६१० | ६३०५ | ४८९२ | ४००४ | ३२१८ | ३०५७ | ५३९८ | ७७६२ | ५९२९ |
| ३ | अंडीपुंज उत्पादन (राज्य) | लक्ष | ० | ० | ५.८७ | ८.०८ | ४.५९ | ७.१४ | ११.७४ | १३.७२ | ३.०३ |
| ४ | अंडीपुंज पुरवठा | लक्ष | ५.५३ | ३६.८१ | ३०.५९ | २२.८५ | १२.६८ | १३.५३ | २३.०५ | २७.५६ | ६.३३ |
| ५ | कोष उत्पादन | मे.टन | १६१ | १७४९.७९ | १५९०.१८ | १२२७.८ | ७००.०३ | ७६०.९७ | १३१८.८३ | १६४२.६२ | २९८.५ |
| ६ | सुत उत्पादन | मे.टन | ४.१ | २१८.७२ | १९८.७७ | १५३.४ | ८७.५ | १११.५२४ | २०२.६४८ | २५२.४२१ | ४५.७४ |
| ७ | रोजगार निर्मिती म.दि. | लक्ष | ०.१५ | २४.०६ | २१.८६ | १६.८७ | ९.६३ | १२.२७ | २२.२९ | २७.७७ | ५.०३ |

### ब) टसर रेशीम -

| अ. क्र | तपशिल | एकक | १९९७-९८ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ ऑगस्ट १६ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मातृवृक्ष् ऐन व अर्जुन क्षेत्र वापर | एकर | ४५८९ | ११३८८ | ७४०० | ६०१५ | ८७८८ | ६४९१ | ९७६५ | १०७३७ | २६२९ |
| २ | लाभार्थी | संख्या | ६४४ | १५९८ | १८५० | २७०८ | २२५९ | १४९२ | २८११ | २७४४ | ५७५ |
| ३ | अंडीपुंज उत्पादन (राज्य) | लक्ष | ० | ० | ० | ३.२८ | ४.३९ | ३.१ | ५.३२ | ६.१९ | १.६६ |
| ४ | अंडीपुंज पुरवठा | लक्ष | ०.२२ | ५.५८ | ५.७५ | ८.३७ | ९.४६ | ६.३८ | ११.०३ | ११.०२ | २.५९ |
| ५ | कोष उत्पादन | लक्ष | ८.०१ | २०८.२२ | १६८.६१ | ३०८.६५ | २४३.८३ | १८७.१६ | ३४८.१२ | ३९४.५२२ | १०.८८ |
| ६ | सुत उत्पादन | मे.टन | २ | ८.४६१ | ६.७४४ | १२.३४६ | ९.७५३ | १०.१९९ | १८.९७ | २१.५ | ०.६ |
| ७ | रो नि म.दि. | लक्ष | ०.०४ | १२.६९ | १०.११ | १८.५१ | १४.६२ | १५.३ | २८.४५ | ३२.२५ | ०.९ |

५९०६८/-, २२५ स्वे. फुट साठी रुपये ३२७४०/-

२) जिल्हा वार्षीक योजना - बेणे पुरवठा - रू १५००/- प्रती टन व कलमे वाहतुक खर्च, अंडीपुंज पुरवठा- ७५ % अनुदान (तुती व टसर), शेतकरी प्रशिक्षण- रू १०००/- प्रती लाभार्थी (तुती व टसर), शेतकरी अभ्यास दौरा- रू १०० /- दैनिक भत्ता व प्रवास खर्च, रेशीम उद्योग प्रचार व प्रसिध्दी रू ५०००० /- प्रति वर्ष, तुती रोपे खरेदी रू ०.५०/- प्रति रोप, शासकीय रिलींग, ग्रेनेज व फार्म देखभाल दुरूस्ती खर्च

३. राष्ट्रीय कृषि विकास योजना - अ) तुती लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना २ हेक्टर पर्यंत अनुदान देण्यात येते. (मनरेगा लाभार्थी वगळून) या योजने अंतर्गत शेतकऱ्यांस तुती लागवडीच्या प्रती एकर क्षेत्रास रू २००००/- अनुदान देण्यात येते. यापैकी प्रथम वर्षात रू ६०००/- रोजमजूरी व रू ८०००/- साहित्य ( बेसीक टुल्स) तसेच दुसरे वर्ष रू ३०००/- व तृतीय वर्ष रू ३०००/- तुती बाग जोपासना अंतर्गत रोजमजूरी अनुदान रूपाने दिली जाते. सदर योजना सन २०१५-१६ पर्यंतच्या लागवडीसाठी आहे.

ब) दर्जेदार टसर अंडीपुंज उत्पादनासाठी अर्थसाहय्य - बीजकोष खरेदी - रू १.८० प्रती कोष, प्रक्रीया, वाहतुक व रसायन खर्च.

क) आधुनिक रेशीम हातमाग उभारणी -रु.४००००/- प्रती हातमाग उभारणी नंतर अनुदान.(१०० लाभार्थी)

ड) शासकीय कोष खरदी विक्री बाजारपेठ उभारणी - मौजे बीबी दारफळ जि. सोलापूर रू २७५.९३/- लक्ष

इ) किटक संगोपनगृह रुपये

८७५००/-

४. केंद्रीय रेशीम मंडळाच्या योजना -सन २०१५-१६ पासून केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये कोषोत्तर प्रक्रीयामधील रिलींग व व्टीस्टींग मशीनरीसाठी अर्थ सहाय व समुह संघटन आधारीत रेशीम उद्योगासाठी अर्थसहाय्य योजना आणि क्षमता बांधणी व प्रशीक्षण योजनांचा समावेश आहे.

**रेशीम उद्योगाअंतर्गची आव्हाने -**

१) कर्नाटक व इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रत कोष / सुत खरेदी विक्री बाजारपेठ उपलब्ध नाही तसेच कोषोत्तर प्रक्रीया म्हणजे रिलींग, व्टीस्टींग, डाईंग व व्हिवींग कमी प्रमाणात आहेत. त्यामुळे राज्यातील कोष शेजारील कर्नाटक राज्यात विक्री होत आहे. राज्यामधील उत्पादीत संपुर्ण कोष राज्यातच प्रक्रीया करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

२) तुती रेशीम या उद्योगाअंतर्गत शेतकऱ्यांना दुसऱ्या वर्षापासून सरासरी रुपये १.२० लक्ष प्रती एकर प्रमाणे उत्पादन मिळते तसेच सदरचा उद्योग उभारणीसाठी सर्व कक्ष शासकीय योजना आहेत. परंतू लाभार्थी सदर उद्योग काही कालावधीनंतर करत नाहीत त्यामुळे राज्यामध्ये सदरच्या उद्योगामध्ये स्थिरता नाही.

३) टसर (वन्य) रेशीम उद्योगामध्ये मध्ये पारंपारिक ढिवर समाजाव्यतीरीक्त इतर समाजाचे लाभार्थी उत्सुक नाहीत. त्यामुळे ऐन व अर्जुन नैसर्गीक खादय वृक्षांचे क्षेत्र उपलब्ध असतांना सुध्दा या उद्योगामध्ये लाभार्थी अभावी मोठया प्रमाणात वाढ होत नाही.

**शेतीस पूरक व्यवसाय**

दुग्ध व्यवसाय आणि कुक्कुट पालन व्यवसाय या सारखाच रेशीम शेती व्यवसाय हा शेतीस पूरक व्यवसाय आहे. हा व्यवसाय, अत्यंत कमी खर्चात व शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेल्या साहित्यातून करता येतो. नवीन तुती लागवड पध्दत व नवीन विक संगोपन पध्दत यामुळे हा व्यवसाय कमी मजूरात मोठया प्रमाणात करता येतो. घरातील लहान थोर माणसांचा उपयोग या व्यवसायात करून घेता येतो. शेतकऱ्यास कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त उत्पन्न मिळविता येते. पक्का

***एक एकर उसासाठी लागणाऱ्या पाण्यात ३ एकर तुती जोपासता येते. तुतीची लागवड एकदा केल्यानंतर १५ वर्षे पर्यंत जिवंत राहत असल्याने, दरवर्षी लागवड करावी लागत नाही. त्यामुळे लागवडीचा खर्च इतर पिकांप्रमाणे वारंवार येत नाही. एप्रिल, मे, महिन्यात पाणी मिळाले नाही तरी तुती मरत नाही.***

माल खरेदीची शासनाने निश्चित दराची हमी दिलेली आहे. तुती लागवड, निचरा होणाऱ्या कोणत्याही जमिनीत करता येते. पट्टा पध्दतीने लागवड केल्याने तुती लागवडीपासून पाल्याच्या उत्पन्नात वाढ होते. पट्टा पध्दतीस अत्यंत कमी पाणी लागते. एक एकर उसासाठी लागणाऱ्या पाण्यात ३ एकर तुती जोपासता येते. तुतीची लागवड एकदा केल्यानंतर १५ वर्षे पर्यंत जिवंत राहत असल्याने, दरवर्षी लागवड करावी लागत नाही. त्यामुळे लागवडीचा खर्च इतर पिकांप्रमाणे वारंवार येत नाही. एप्रिल, मे, महिन्यात पाणी मिळाले नाही तरी तुती मरत नाही. पाणी मिळाल्यानंतर तुती पुन्हा जोमाने वाढते. यामुळे आठमाही पाण्याची सोय असलेल्या शेतकऱ्यांस देखील हा व्यवसाय करता येतो. कमीत कमी बागायत क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांपासून तो जास्तीत जास्त बागायत क्षेत्र असलेल्या सर्व शेतकऱ्यांना हा व्यवसाय चांगल्या रितीने करता येतो. दुग्धव्यवसाय, कुक्कुट पालन यासारखे शेती पूरक व्यवसाय व ऊस, द्राक्षे यासारखी नगदी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना देखील हा व्यवसाय चांगल्या रितीने करता येतो. पट्टा पध्दतीने तुतीची आंतरमशागत मजूंराऐवजी अवजाराने कमी खर्चात व कमी वेळेत वेळेवर करुन घेता येते. यामुळे मजूरी खर्चात व वेळेत मोठया प्रमाणात बचत होते. पट्टा पध्दतीने लागवड केल्याने तुती शेतीत इतर आंतरपिके घेवून उत्पन्नात भर घालता येते. तुती बागेस रोग व किटक यांचा प्रार्दुभाव होत नसल्याने औषधोपचाराचा खर्च वाचतो. रेशीम अळयांची अंडीपुंज सवलतीच्या दराने ४५० टक्के अनुदान दरात शासनामार्फत पुरवली जातात. रेशीम अळयांचे एकूण २८ दिवसांचे आयुष्यमान असते. त्यातील २४ दिवसच त्यांना तुतीचा पाला खाद्य म्हणून द्यावा लागतो. या २४ दिवसांपैक सुरवातीचे १० दिवस शासना मार्फत वाजवी दराने रेशीम किटक जोपासून दिले जातात. यामुळे शेतकऱ्यांस अवघ्या १४ दिवसांत कोश उत्पादनाचे पीक घेता येईल. यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, श्रम, व पैसा वाचेल तसेच एकूण उत्पादनात २५ टक्के पर्यंत वाढ होईल.

शेतीमध्ये रेशीम कोशा शिवाय अवघ्या १४ दिवसांत उत्पन्न देणारे आज एकही नगदी पीक नाही. सुशिक्षीत


बेरोजगारांना यात दरमहा उत्पन्न मिळविता येते. तसेच महिन्यात रविवारप्रमाणे चार दिवस सुट्टी उपभोगता येते. इतर शेती पिकांप्रमाणे यात पूर्ण व मोठया प्रमाणात नुकसान होत नाही. शेतकऱ्यांच्या कोश खरेदीची हमी शासनाने घेतलेली असून त्यांच्या सोयीसाठी आवश्यक त्या ठिकाणी कोश खरेदी केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. सदर कोश खरेदी ही शास्त्रीय पध्दतीने होत असून त्याचा दर रु. ६५/- ते रु.१३०/- प्रती किलो आहे.

**रेशीम उद्योगातून इतर फायदे -**

१. रेशीम अळयांची विष्ठा दुभत्या जनावरांना सुग्रास प्रमाणे खाद्य म्हणून वापरता येते. यातून १ ते दीड लिटर दूध वाढते.
२. वाळलेला पाला व विष्ठेचा गोबरगॅ समध्ये उपयोग करुन उत्तम प्रकारे गॅस मिळतो.
३. तुतीची वाळलेली पाने इंधन म्हणून वापरता येतात. तसेच खत म्हणून सुध्दा वापरता येते.
४. संगोपनासाठी वापरलेल्या चोथा करुन त्यावर अळींबीची लागवड करता येते व त्यानंतर चोथ्यापासून गांडूळ खत करता येते.
५. रेशीम उद्योगापासून देशाला परकीय चलन मिळते व देशाच्या विकासात हातभार लागतो.
६. तुतीची दरवर्षी तळ छाटणी करावी लागते .या छाटणी पासून मिळणारी तुती कोश शासना मार्फत खरेदी केली जातात. त्यामुळे एकरी रु ३५००/- ते ४५००/- जास्तीचे उत्पन्न प्रतीवर्षी मिळते.
७. तुतीच्या पानांमध्ये जीवनसत्वाचे प्रमाण बरेच आढळते. त्यामुळे तुतीचा पाला व रेशीम कोश प्युपा आर्युवेदीक दृष्टया महत्वाचा आहे.
८. विदेशात तुतीच्या पानांचा चहा मलबेरी टी करतात. शिवाय वाईन बनवतात.
९. कोश मेलेल्या प्युपाचा आयुर्वेदीक औषधे व सौंदर्य प्रसाधनात उपयोग करता येतो.

**केंद्रिय रेशीम मंडळाच्या विविध**

***शेतीमध्ये रेशीम कोशा शिवाय अवघ्या १४ दिवसांत उत्पन्न देणारे आज एकही नगदी पीक नाही. सुशिक्षीत बेरोजगारांना यात दरमहा उत्पन्न मिळविता येते. तसेच महिन्यात रविवारप्रमाणे चार दिवस सुट्टी उपभोगता येते. इतर शेती पिकांप्रमाणे यात पूर्ण व मोठया प्रमाणात नुकसान होत नाही.***



**योजना**

देशातील रेशीम उद्योगाच्या विकासाची जबाबदारी प्रामुख्याने केंद्रीय रेशीम मंडळ, बंगलोर यांच्यावर आहे. केंद्रामार्फत महाराष्ट्रासारख्या अपारंपारीक राज्यात रेशीम उद्योग स्थिर व्हावा म्हणून अकराव्या पंचावार्षिक योजनेमध्ये रेशाीम उद्योगाच्या विकासात्मक कामाकरीता राज्य व केंद्र शासनाच्या आर्थिक सहभागावर दोन प्रकारे योजना राबविण्यात आल्या आहेत

१. प्रकल्प योजना (प्रोजेक्ट मोड) - सदर योजना पुणे जिल्हयात राबविण्यात येत आहे. तसेच येवला जि. नाशिक येथे विवरसाठी केंद्रिय रेशीम मंडळामार्फतच योजना राबविण्यात येत आहे, यासाठी राज्य शासन सक्रिय मदत करते.
२. समुह विकास योजना - बीड, उस्मानाबाद व बुलढाणा या तीन जिल्हयांत सन २००९-१० मध्ये ही योजना राबविण्यात आलेली आहे

प्रकल्प योजना व समुह विकास योजना अंतर्गत सन २००९-१० साठी केंद्रिय रेशीम मंडळ, बेंगलोर कडून रु.२१९.३५ लक्ष व राज्य सहभागासाठी रु.१७८.६६ लक्ष निधी प्राप्त झालेला आहे. त्यापैकी केंद्रीय रेशीम मंडळाचे रु. २१२.५३ लक्ष व राज्य शासनाचे रु. १७६.४६लक्ष खर्च झालेले आहे.

राज्यात रेशीम उद्योगासाठी केंद्र शासनाच्या विविध योजना निवडक जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहेत. यात पुणे , उस्मानाबाद, बीड, बुलढाणा या जिल्हयांमध्ये सीपीपी / सीडीपी योजनेअंतर्गत विशेष पॅकेज अंतर्गत पुढील प्रमाणे योजना राज्य शासनाच्या सहभागाने राबविण्यात येत आहेत.

**२) पश्चिम घाट विकास योजना**

राज्य शासनाच्या नियोजन विभागामार्फत राज्यातील पश्चिम घाट विकास क्षेत्रातील ११ जिल्हयातील ६२ तालुक्यांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येतो. संचालनालयामार्फत

सिंधूदुर्ग, कोल्हापूर, सातारा, पुणे, व नाशिक या जिल्हयात उदयोगाच्या विकास करण्यासाठी निर्माण केलेल्या मुलभूत



सुविधाचं बळकटीकरण, व्यवस्थापन व दुरूस्ती या कामासाठी निधी उपलब्ध करून घेतला जातो.सन २००९-१० करीता नियोजन विभागाकडून रु.५३.४९ लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला होता सदर निधीतून रु.३२.३६ लक्ष खर्च झालेला आहे. सन २०१०-११ साठी या योजनेअंतर्गत निधी मिळणार नसल्याचे नियोजन विभागाने कळविलेले आहे.

**३) राष्ट्रीय कृषि तंत्रज्ञान प्रकल्प**

राज्यात रेशीम उद्योगाच्या गावोंगांवी शेतकरी मेळावे व शेतकरी शैक्षणीक सहली तसेच उद्योगाच्या तांत्रिक माहिती पुस्तीका छपाई इत्यादी कामासाठी राष्ट्रीय कृषि तंत्रज्ञान प्रकल्पाअंतर्गत सर्वच जिल्हयातून कृषि खात्यामार्फत निधी उपलब्ध करून देण्यात येतो. या योजनेअंतर्गत प्रामुख्याने उद्योगांची प्रचार व प्रसिध्दी करण्यात येते.

महाराष्ट्रत रेशीम संचालनालयाद्वारे सुरू असलेल्या विविध योजना पुढील प्रमाणे आहेत.

**जिल्हा वार्षिक योजना**

रेशीम संचालनालयामार्फत ग्रामिण भागात प्रत्येक वर्षी तुती लागवड लक्षांक निश्चीत करुन बागायती शेतकरी वर्गाची निवड करण्यात येते. नवीन शेतकऱ्यांसाठी तुती बेणे खरेदी व पुरवठा , अंडीपुज पुरवठा, प्रशिक्षण, शेतकरी अभ्यास दौरा, व अन्य भांडवली खर्चासाठी जिल्हा स्तरीय योजनेअंतर्गत निधी राज्य शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येतो.

**रोजगार हमी योजना**

१२ जाने ०९ च्या शासन निर्णयाप्रमाणे प्रति एकरी २००००/- रु. अनुदान मंजूरी दिलेली आहे. त्यामध्ये मजूरी रक्कम रु. १२०००/- व साहित्य खरेदीसाठी ८०००/- प्रमाणे अनुदानाचा लाभ तीन वर्षामध्ये विभागून शेतकऱ्यांना देण्यात येत आहे.

योजनाविषयक अधिक माहितीसाठी रेशीम संचालनालयाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**तरुणांसाठी चांगली संधी**

रेशीम कापड आकर्षक पॅकिंग करुन विक्रीसाठी पाठविले जाते. ज्याला देश-विदेशात मोठी मागणी आहे. कामधेनु प्रतिष्ठान शेणोली, ता. कराड, जिल्हा-सातारा शेणोली गांवातील तेरा सुशिक्षित पदवीधर बेरोजगार तरूणांनी शेती धंद्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या ध्यासाने एकत्र येऊन कामधेनू प्रतिष्ठान ही संस्था स्थापन केली. प्रथम त्यांनी प्रत्येकी दरमहा ५०० रूपये जमा करून अल्प बचत योजना सुरू केली. या करीता त्यांनी बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा - शेणोली येथे बचत गटाचे स्वंतत्र खाते सुरू केले. त्या खात्यामध्ये वर्षाला ७८ हजार रूपये जमा होऊ लागले व यातूनच त्यांनी प्रत्येकी एक एकर मध्ये तुतीची लागवड करून रेशीम उद्योग सुरू केला. व संगोपनगृह बांधणी करीता बचत रक्कमेतून पैसे घेतले. बँक अधिकाऱ्यांनी सदर योजनेस प्रोत्साहन म्हणुन ६० हजार रू फिरते भांडवल दिले. सदर रकमेमुळे प्रत्येकाचे स्वंतत्र संगोपनगृह निर्माण झाले. त्यामुळे प्रत्येकाला रेशीम उद्योगापासुन भरपूर अर्थिक लाभ झाला. सदर संस्थेचे यश पाहून गावांमध्ये जवळपास ५० एकरवर तुतीची लागवड झाली. कराड तालुक्यातील शेतकरी रेशीम उद्योग पहाण्याकरीता शेणोली गावामध्ये येऊ लागले. संस्थेने यापुढे जाऊन सुत निर्मिती प्रकल्पाकरीता एम आय डी सी कराड येथे जागा घेतलेली आहे. शेतकऱ्यांना रेशीम उद्योगाकरीता आवश्यक असणारे साहित्य व औषधे वाजवी दराने स्थानिक पातळीवर लवकरच उपलब्ध होण्याचे दृष्टीने विक्री केंद्र सुरू केलेले आहे. अशा प्रकारे सुशिक्षित तरूणांनी एकत्र येऊन रेशीम उद्योग केल्यास त्यांची निश्चितच अर्थिक उन्नति होईल.

■■■

*एन.पी.एगलेवाड महाराष्ट्र शासनाच्या रेशीम संचालनालयामध्ये संचालक आहेत. (शब्दांकन: दर्शना राणे)*

email: dos.maha@gmail.com

## विकास पथावर

हातमाग दुकानांच्या वाटपासाठी अलिकडेच वस्त्रोद्योग मंत्रालयाने ऑनलाईन प्रवेशविक्री आरंभ केली. ही सुविधा प्रारंभ करण्यामागील दृष्टीकोन हा विणकरांना त्यांचा हक्काचा मंच मिळावा, ज्यामुळे हातमाग दुकानांचे वाटप त्यांच्या साठी दिशादायी व्हावे असा आहे. अंदाजे वर्षभरात हातमाग विकास आयुक्तालयाच्या पाठिंब्याने ३४१ विपणन कार्यक्रमांचे आयोजन होईल. हे नवीन पोर्टल पारदर्शकता, सोप्या प्रक्रिया देईल अशी अपेक्षा आहे. शिवाय नव्या आवेदकांसाठी, विणकरांसाठी वा संस्थासाठी अशा मंचावर सहज व खात्रीशीर प्रवेश मिळेल तथा त्यांच्या हातमाग उत्पादनांच्या पणन प्रक्रियेला प्रोत्साहन मिळेल अशी अपेक्षा आहे.

**ऑनलाईन पोर्टल काम कसे करते**

विणकर किंवा संस्था ह्या पोर्टलकडून जेव्हा जेव्हा अग्रगण्य वर्तमानपत्रात अर्जमागण्या जाहीर होतील तेव्हा तेव्हा अर्जविनंती करु शकतात. मात्र प्रथमत: अर्ज करणाऱ्यांनी विणकर वा संस्था यांनी नोंदणी करणे गरजेचे आहे. त्यानंतर, त्यांच्या माहितीचे अद्यतीकरण (UPDATION)होत राहील. हा अर्ज प्रस्तुत करण्याआधी अर्जदाराला लॉग इन नंबर म्हणजेच नोंदणी क्रमांक आणि संकेतशब्द (पासवर्ड) दिला जाईल. नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अर्जदार आवेदन करु शकतो. अर्जदाराच्या अखत्यारीनुरुप (वेव्हर्स सर्व्हिस सेंटर) विणकर सेवाकेंद्रांपुढें हा विनंती अर्ज प्रस्तुत होतो. सेवाकेंद्रांकडून ह्या अर्जांची निर्धारित वेळेत फेरतपासणी होते. त्या अर्जाची शिफारस करण्यात काही समस्या असतील तर त्याही अर्जदारास समजावून देण्यात येतात. सर्व अर्जांचे प्रणालीकडून केंद्रीकरण होते आणि शिफारस केलेले अर्ज केंद्रांकडून संकलित केले जातात. अशा अर्जांचे संगणकीकरण होते. अशा संगणकीकृत अर्जदारांची राज्यवार आणि वर्गवार सूची तयार होते. ज्यात प्रतिक्षा सूचीही समाविष्ट असते. त्यानंतर ज्या अर्जदारांना दुकान वाटप झालेले आहे त्यांना एक लघुसंदेश (एसएमएस) पाठवण्यात येतो. ज्यामधून दुकानाचा नंबर स्थळ हे तपशील कळवले जातात. अर्जदारांना लॉग इन केल्यानंतर त्या वाटपाची (नियतनाची) छापील प्रत काढता येऊ शकते. या छापील प्रतीसहित अर्जदार आयोजकांची भेट घेऊ शकतात. आंतरजालाद्वारा खालील संकेतस्थळावर उपरोक्त सुविधा उपलब्ध आहे http://handloomstall.gov.in/HEMS/pages/hems_home.action

**देशातील नैसर्गिक वायू वापराला प्रोत्साहित करण्यासाठी #GAS4INDIA CAMPAIGN**

या मोहिमेचे उद्दीष्ट्य हे की सध्या नैसर्गिक वायूच्या वापराचा टक्का एकूण ऊर्जा वाटपाच्या ६.५% आहे, त्यात वाढ व्हावी.वायू उत्पादनात वाढ व्हावी, यासाठी शासन वायूजाल (गॅस ग्रीड) निर्माण करत आहे.नवनवीन वायूचे पायाभूत सोयी सुविधा निर्माण करत आहे. GAIL ने देशव्यापी वायूजालाकरिता निविदा प्रक्रिया अगोदरच पूर्ण केलेली असून त्यासाठी पाइपलाईन टाकण्यास लवकरच सुरुवात होईल. सध्या शासन कोळशापासून मिळणाऱ्या मिथेनपासून सिंथेटिक वायूनिर्मिती करण्याच्या दिशेने पाऊल टाकत आहे. तसेच जैविक सीएनजी आणि जैविक पीएनजी वायू निर्मितीला प्रोत्साहन देत आहे. तीन नवीन एलएनजी टर्मिनल्ससुध्दा येऊ घातल्या आहेत. इतर देशांशी दीर्घमुदतीच्या करारांमध्ये भारत संलग्न होत असून नव्या मालमत्तेची जुळवाजुळव करीत आहे, जेणे करुन योग्य किमतीत विना अडथळा ऊर्जा पुरवठा करता येऊ शकेल.

ही मोहिम , अलिकडेच देशातील नैसर्गिक वायू वापराला प्रोत्साहन मिळावं यासाठी स्थापन करण्यात आली. या क्षेत्रातील, सार्वजनिक आणि खाजगी कंपन्यांनी या कामास देकार कळवला आहे.ही संयुक्त मोहिम देशाच्या सीमारेषेपलिकडे, प्रसारमाध्यमांच्या अनेक कार्यक्रमांनी जोडलेली मोहिम असून नैसर्गिक वायूंचा दैनंदिन आयुष्यात इंधन म्हणून वापरणाऱ्या नागरिकांना आणि जे येत्या काळात स्वयंपाक, प्रवास,विद्युतिकरण आणि औद्योगिककरणात वापर करणार आहेत त्या सर्व नागरिकांना राष्ट्रीय, सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय स्तरावर होणारे फायदे समजावे म्हणून आयोजित केली आहे. ट्विटर, फेसबुक, युट्युब, लिंक्ड इन आणि त्यांच्या अधिकृत ब्लॉगसाइटवरही ही मोहिम संलग्नित झाली आहे. चर्चासत्रे , कार्यशाळा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसारख्या स्थानिक आणि ऑफलाइन कार्यक्रमांतून सुध्दा ही मोहिम जोडली गेली आहे.आपले पेट्रोलिअम आणि नैसर्गिक वायू मंत्री मा.धर्मेंद्र प्रधान (राज्यमंत्री-स्वतंत्र कारभार) यांनी या मोहिमेसाठी संकेतस्थळ, ट्विटर आणि फेसबुक पेज पत्र आणि मोहिमगीत शुभारंभ केला.

■■■

# महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगासाठी हमखास नगदी पिक : कापूस

डॉ. वैशाली जयंत जोशी



**महाराष्ट्रातील प्रत्येक प्रशासकीय विभागातील जिल्ह्यांचा कापूस विषयक अभ्यास या लेखासाठी केलेला आहे. वस्त्रोद्योगाचे भविष्यात केंद्रीकरण कोठे होऊन शकते, शिवाय स्वस्त व किफायतशीर कच्चा माल महाराष्ट्राच्या कुठल्या विभागातून उपलब्ध होऊ शकतो, यासारख्या सूचक प्रश्नांचा उहापोह येथे मांडला आहे.**

मोठया उद्योगांमध्ये एक महत्वाचा उद्योग म्हणून वस्त्रोद्योगाकडे पाहिले जाते. वस्त्रोद्योग हा ग्रामीण अर्थव्यवस्थेशी पूर्णत: संबंधित आहे. कच्च्या मालाचा पुरवठा, रोजगार निर्मिती, स्वावलंबन, नगदी रोखता, योग्य हवामान, जलसिंचनाच्या पुरेशा सुविधा यामुळे महाराष्ट्रातील कापूस उत्पादनात प्रचंड वाढ होत आहे. प्रस्तुत लेखात सन १९९१ पासुनच्या महाराष्ट्रातील पस्तीस जिल्ह्यांमधील कापूस उत्पादनाचा अभ्यास केलेला आहे. यासाठी महाराष्ट्राचे सहा विभाग विचारात घेण्यात आले आहे. विभागावर केलेल्या कापूस उत्पादनाच्या वर्गीकरणावरुन असे दिसून येते की, विदर्भ व खान्देशात कापूस उत्पादन वाढले असून वस्त्रोद्योग निर्मितीतील या महत्वाच्या कच्च्या मालाची मागणी या विभागात नोंदविली जाते. नविन आर्थिक धोरणानंतर सरकारी योजनांच्या मदतीमुळे व कार्यक्षम प्रगतीमुळे कापूस उत्पादनात सकारात्मकता दिसून येते. यामुळे वस्त्रोद्योग भरभराटीला येत आहे.

खालील तक्त्यात भारतातील राज्यांमध्ये घेण्यात येणाऱ्या नगदी पिकांचे २०१३-१४ साली झालेले उत्पादन दाखविले आहे.

तक्ता क्र. १ भारतातील शेती उत्पादन (%) : २०१३-२०१४

| समूह | पिक | महत्म पिक उत्पादक राज्या | त्या राज्यातील उत्पादन | भारतातील उत्पादन |
|---|---|---|---|---|
| नगदी पिक | कापूस | गुजरात | १०.९५ | ३६.५९ |
| | | महाराष्ट्र | ९.१८ | |

*Source : Agricultural Statistics at a Glance, 2014 PP 61, 62*

महाराष्ट्रातील, जळगाव, धुळे, बूलढाणा, अकोला, अमरावती हे कापूस उत्पादक जिल्हे आहेत. यांना 'पांढरी चांदी उत्पादनाचे जिल्हे' म्हणून ही ओळखले जाते. हे जिल्हे अनुक्रमे नाशिक व अमरावती विभागात येतात. आशावादी व्यापार नितींमूळे महाराष्ट्राच्या ग्रामीण व्यवस्थेतील बळीराजा समाधानी आहे. महाराष्ट्राच्या जैविक, भौगोलिक विविधतेमुळे तसेच तापमानानुसार भिन्न पिक घेण्याच्या नैसर्गिक देणगीमुळे महाराष्ट्राच्या पिक उत्पादन क्षमतेत

मोठया प्रमाणात विविधता दिसून येते. शेती तज्ञांनी सांगितल्यानुसार, शेतकरी बाजारी शक्तीव्दारे तसेच तांत्रिक, संस्थात्मक व संरचनात्मक बदलांमुळे कापूस उत्पादनात बदल घडवून आणत आहेत. आजच्या काळात शेतकरी ज्या पिकांपासून जास्तीत जास्त नगदी रोख मिळेल तीच पिक रचना अवलंबित आहेत असे दिसून येते.

**लेखाची उद्दिष्ट्ये व आकडेवारी :**

या अभ्यास विषयाचा प्रमुख हेतु, महाराष्ट्र राज्यातील १९९१ पासून कापूस उत्पादनातील वृध्दींच्या बदलांचे परिक्षण करणे तसेच उत्पादन वाढीतील आलेखाकरीता परिणाम करणारी कारणे शोधणे हे आहे. जेणेकरुन वस्त्रोद्योगाचा पाया मजबुत होईल.

महाराष्ट्रात कापूस उत्पादन हे वेगवेगळ्या प्रादेशिक विभागात एकसारखे नसते. या गृहीतकानुसार हा अभ्यास विषय हाताळला आहे. यासाठी वापरण्यात आलेली माहिती कापसाचे क्षेत्रफळ, कापसाचे उत्पादन व कापसाची उत्पादकता हे बाह्य घटक तर जलसिंचन सुविधा असलेले शेती क्षेत्र, खतांचा वापर आणि आधुनिक बी-बियाण्यांचा वापर या अंतर्गत घटकांचा यात समावेश होतो. या अभ्यास विषयाचा कालावधी १९९१ ते २०१३ आहे. महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी विभागाकडून वेळोवेळी प्रसिद्ध झालेली कापूस या नगदी पिकाची माहिती वापरली आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालावरूनही व्यापक माहिती उपलब्ध झालेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी मंत्रालयाच्या वार्षिक अहवालावरून तसेच महाराष्ट्र राज्याच्या कृषी संचालनालयाकडून संकलित केलेली आहे.

या उपयोजित अभ्यासासाठी सरासरी संयुक्त वार्षिक वृद्धी दर (CAGR), सरासरी वार्षिक वृद्धी दर (AAGR), प्रमाण विचलन व टी चाचणी (T-Test) या सर्व साधनांचा वापर गृहितके तपासण्यासाठी आणि विविध माहितीच्या वर्गीकरणासाठी केलेला आहे.

प्रस्तुत अभ्यास विषय ''महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगासाठीचे हमखास नगदी पिक : कापूस'' यात कापसाचा विशेष अभ्यास आहे. यासाठी प्रत्येक प्रादेशिक विभागातील दोन जिल्हे घेतले आहेत. यावरून तेथील कापसाचे क्षेत्रफळ, उत्पादन व उत्पादकता कळून येते.

**महाराष्ट्राचे कापूस उत्पादनातील स्थान** :राज्यस्तरीय बँक समिती अहवालानुसार, महाराष्ट्रात कापसासाठी मोठ्या प्रमाणात पिक कर्ज घेतले जाते. महाराष्ट्रात जलसिंचनाखाली १८.९% शेतीचे क्षेत्रफळ आहे. नगदी पिकांमध्ये

***जगात कापसाची उत्पादकता सगळ्यात जास्त ऑस्ट्रेलियात आहे. ती १९२० कि.ग्रॅ./हेक्टर एवढी आहे. भारतात कापसाची एकूण उत्पादकता फक्त ५१७ कि. ग्रॅ. आहे. महाराष्ट्रात जमिनीची उत्पादकता दरवर्षी ४.३४% नी वाढते व मजुरांची उत्पादकता २.१४% दराने वाढते.***

कापसाचे एकूण उत्पादन राज्यात विक्रमी ठरले आहे. रासायनिक खते, सुधारीत बी-बियाणे, जलसिंचनाच्या सोयीसुद्धा वाढत आहेत. वाढत्या कापूस उत्पादनाबरोबर वस्त्रोद्योगांनाही चांगल्या संधी आता उपलब्ध झाल्या आहेत. कच्चा माल स्वस्त आणि किफायतशीर दरात मिळत असल्याने वस्त्रोद्योग व त्याच्या पूरक उद्योगांना चालना मिळत आहे. कापूस उत्पादनासाठी आवश्यक असलेली उद्योगनीती आखली जात आहे. त्यानुसार अंतर्गत आदानांसाठी आर्थिक मदत, शेती कर्ज, अनुदान व आवश्यक बाजार व्यवस्थापन यात शाश्वतरित्या वाढ होऊन कापसाचे उत्पादन वाढत आहे. नविन आर्थिक धोरणानुसार शेती क्षेत्रातील संशोधनाला विशेष उत्तेजन दिले पाहिजे.

देशपातळीवर कापसाचे एकूण महत्त्व लक्षात घेता भारतात इ.स. २००० पर्यंत कापूस शेतजमिनीचे क्षेत्रफळ हे कापूस उत्पादनापेक्षा जास्त होते त्यामानाने उत्पादकता खूपच कमी होती. परंतू २००० नंतर कापूस शेतजमीनीच्या क्षेत्रफळाच्या चौपटीपेक्षा जास्त उत्पादनात वाढ घडून आली आणि उत्पादकतेतही इ.स. २००० पेक्षा जास्त वाढ निदर्शनास येते. जगात कापसाची उत्पादकता सगळ्यात जास्त ऑस्ट्रेलियात आहे. ती १९२० कि.ग्रॅ./ हेक्टर एवढी आहे. भारतात कापसाची एकूण उत्पादकता फक्त ५१७ कि.ग्रॅ. आहे. महाराष्ट्रात जमिनीची उत्पादकता दरवर्षी ४.३४% नी वाढते व मजुरांची उत्पादकता २.१४% दराने वाढते म्हणून सरकारकडून वेळोवेळी मिळणाऱ्या खत अनुदान, वीज अनुदान आणि जलसिंचनाच्या अनुदानात वाढ होतांना दिसते. किमान आधारभूत किंमतीही वाढत आहेत. सधन शेतीचा अवलंब करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढलेला आहे.

**महाराष्ट्रातील कापूस उत्पादनातील प्रवृत्ती व चर्चा :**


महाराष्ट्रात कोकण आणि पुणे विभागात कापूस उत्पादन होत नाही त्यामुळे वस्त्रोद्योगांसाठी ह्या दोन्ही विभागातील सर्व जिल्हे अनुपयुक्त ठरतात. खालील तक्त्यात महाराष्ट्रातील विविध प्रादेशिक विभागातील कापसाचे क्षेत्रफळ, उत्पादन व उत्पादकतेविषयी माहिती दिली आहे.

*तक्ता क्र. २ महाराष्ट्रातील विविध प्रादेशिक विभागातील कापसाचे क्षेत्रफळ, उत्पादन व उत्पादकता :*

| विभाग | जिल्हा | कापसाचे क्षेत्रफळ % | कापसाचे उत्पादन % | कापसाची उत्पादकता % |
|---|---|---|---|---|
| नाशिक | नाशिक | २४.९२ | ४५.३६ | १६.१६ |
| | जळगांव | २.६७ | १४.६८ | ११.१८ |
| औरंगाबाद | औरंगाबाद | ९.८५ | ३१.११ | १७.३८ |
| | जालना | ७.१७ | २२.२८ | १३.७८ |
| | लातूर | -५.८६ | ५.८५ | १२.१३ |
| अमरावती | अमरावती | -१ | १०.२३ | १४.४२ |
| | बुलढाणा | १.८१ | १९.५८ | १७.९६ |
| नागपूर | नागपूर | १९.२७ | ४.७५ | १०.६१ |

*संशोधकाची स्वत:ची आकडेमोड*

वरील तक्त्यावरून आपल्याला असे स्पष्ट दिसून येते की, महाराष्ट्रात अमरावती व लातूर जिल्ह्यात कापसाचे क्षेत्रफळ कमी झालेले आहे. मात्र उत्पादन व उत्पादकता ही धनात्मक वाढतांना दिसते. कापसाखालील क्षेत्र नाशिक जिल्ह्यात पहिल्या क्रमांकावर आहे. त्याखालोखाल नागपूर जिल्ह्याचा दूसरा क्रमांक लागतो. जळगाव जिल्ह्यात कापसाखालील जमिनीचे क्षेत्रफळ त्यामानाने कमी असून उत्पादन मात्र सातपट जास्त म्हणजेच १४.६४% आहे. तसेच बुलढाणा जिल्ह्यातही बघायला मिळते. विरोधाभास असा की नागपूर जिल्ह्यात कापसाचे शेतजमिनीचे क्षेत्रफळ वाढले असले तरी तुलनात्मक दृष्ट्या कापसाचे उत्पादन व उत्पादकता तितक्या वेगाने वाढली नाही. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की कोकण, पुणे व नागपूर विभागापेक्षा नाशिक अमरावती व औरंगाबाद विभागात वस्त्रोद्योगांना आवश्यक असणारा कच्चा माल-कापूस स्वस्त व किफायतशीर दरात उपलब्ध होईल. मजूर पुरवठा वाहतूकीच्या सोयी, साठवणूकीच्या सोयींनी बघता नाशिक, अमरावती व औरंगाबाद विभागात सरकारने वस्त्रोद्योग वाढीसाठी व केंद्रीकरणासाठी चालना द्यावी. खालील आलेखावरून हे अधिक स्पष्ट होईल.




**निष्कर्ष :**

एकूण आठ जिल्ह्यांचा कापूस विषयक सविस्तर अभ्यास वस्त्रोद्योगासाठीचा महत्त्वाचा घटक म्हणून केलेला आहे. महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून या जिल्ह्यांचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे. कापसाचे क्षेत्रफळ, उत्पादन व उत्पादकता ही जिल्ह्यानुसार वेगवेगळी आहे. विविध सरकारी धोरणांमुळे व शेतकऱ्यांच्या वाढत्या नगदी पैशांच्या गरजेमुळे कापसाचे एकंदरीत प्रमाण वाढत आहे. इतर अन्नधान्याचे प्रमाण त्यामानाने कमी असल्याने सातत्याने किंमतीपातळीतील वाढ आपण अनुभवत आहोत. मर्यादित नफा व शेतमालाची शेतातच विक्री झाल्याने शेतकरी वारंवार त्याच पिकाला प्राधान्य देतात. यामूळेही कापूस उत्पादनात, क्षेत्रफळात व उत्पादकतेत वाढ होत आहे. वाढत्या चलांचा वापर करून सरकारने कापसाची घटक देणगी असलेल्या जिल्ह्यांमध्ये लहान जलसिंचन सुविधा, वाहतुकीचे जाळे, मध्यस्थांचे उच्चाटन केल्यास वस्त्रोद्योगांसाठीची प्रमुख केंद्रे म्हणून नागपूर सारखे हे ही जिल्हे अधिक विकसित होतील शिवाय वीजेच्या सोयी, हातमागाचे वाटप व प्रशिक्षण देऊन प्रगतीपथावर राहातील यात शंका नाही.

■■■

लेखिका नाशिक येथील बी.वाय.के. महाविद्यालयातील माजी अध्यापिका असून कृषी अर्थशास्त्र या विषयाच्या संशोधक आहेत.
email: jayant100@hotmail.com

# PUBLICATIONS DIVISION

**website: publicationsdivision.nic.in**

# Some Prestigious Titles Now Available Online

- India 2016 (also available as eBook)
- Bharat 2016 (also available as eBook)
- Legends of Indian Silver Screen (also available as eBook)
- Abode Under The Dome
- Winged Wonders of Rashtrapati Bhavan
- Right of The Line : The President's Bodyguard
- Indra Dhanush
- The Presidential Retreats of India
- Rashtrapati Bhawan
- Belief In The Ballot (also available as eBook)
- Gandhi : Jeevan Aur Darshan (hindi)
- 1857 The Uprising
- Sardar Patel-Sachitra Jeevni(hindi) (also available as eBook)
- Sardar Patel - A Pictorial Biography (also available as eBook)
- Basohli Painting
- Kangra Painting
- Indian Women : Contemporary Essays
- Bharat Ki Ekta Ka Nirman (hindi) (also available as eBook)
- Yuva Sanyasi (hindi)
- Gazetteer of India Vol.2
- The Geet Govinda of Shri Jaydev
- Who's Who of Indian Martyrs (Vol-I)
- Who's Who of Indian Martyrs (Vol-II)
- Saga of Valour
- Some Aspects of Indian Culture
- Art & Science of Playing Tabla (also available as eBook)
- Indian Classical Dance
- Celebration of Life : Indian Folk Dance
- Nataraja
- Bengali Theatre: 200 Years (also available as eBook)
- Bihari Satsai (hindi)
- Bihari Satsai - A Commentary
- Eye In Art
- Looking Again At Indian Art
- The Life of Krishna In Indian Art
- Pahari Painting of Nala Damayanti Theme
- Ajanta Ka Vaibhav (hindi)
- Bharatiya Kala - Udhbhav Aur Vikas (hindi)
- Bharatiya Chitrakala Main Sangeet Tatva (hindi)
- South Indian Paintings
- Garhwal Chitrakala (hindi)
- A Moment In Time
- Samay, Cinema Aur Itihas (hindi)
- Indian Cinema Through The Century
- Bharatiya Cinema Ka Safarnama (hindi)
- A History of Socialism
- Lamps of India
- Bharat Ke Durg (hindi)
- Wood Carving of Gujarat
- Lawns And Gardens
- Paryavaran Sanrakshan : Chunotiyan Aur Samadhan (hindi)

**eBooks**

- Lokmanya Bal Gangadhar Tilak
- The Gospel of Buddha
- Introduction To Indian Music
- Sardar Vallabhbhai Patel
- Sardar Vallabhbhai Patel (Adhunik Bharat Ke Nirmata Series)
- Lauh Purush Sardar Patel
- Aise They Bapu
- Mahatama Gandhi -A Pictorial Biography
- Gandhi In Champaran
- Mahatma Gandhi And One World

**Printed Books available at flipkart.com**
**eBooks at kobo.com**



ही सगळी तर के'सागरचीच पुस्तके आम्ही तर तीच अभ्यासतो! पण, आम्ही ती विद्यार्थ्यांना सुचवीत नाही, असे का ? का ?
कारण आम्ही क्लासेसमध्ये त्यातूनच शिकवतो ना!
MPSC पूर्व परीक्षा पेपर पहिला संपूर्ण तयारी UPSC पूर्व परीक्षेसाठी उपयुक्त By-K'Sagar K'Sagar Publications
MPSC राज्यसेवा पूर्व परीक्षा संस्करित प्रश्नपत्रिका संग्रह विश्लेषणात्मक विस्तृत स्पष्टीकरणे व संदर्भासह के'सागर
PSI STI ASSTT पूर्व परीक्षा के'सागर २०१७
सुबोध भारतीय राज्यघटना डॉ. अनिरुद्ध K'Sagar Publications
महाराष्ट्रातील समाजसुधारक साहित्यिक भारतीय विचारवंत व अन्य महनीय व्यक्ती के'सागर
संपूर्ण अंकगणित सुधारित व विस्तारित By - K'Sagar K'Sagar Publications
K'Sagar's हाऊस ऑफ बुक्स
'दुर्गा चेंबर्स', ३९/१ बुधवार पेठ,
अप्पा बळवंत चौक,
जोगेश्वरी मंदिराशेजारी, पुणे–४११ ००२.
९९२३९०६५००/८०८७७२२२७७
(०२०) २४४८३१६६
३५ वर्षे सातत्याने अग्रेसर के'सागर!
K'Sagar बुक सेंटर
'नुतन क्लासिक', नारायण पेठ,
नू. म. वि. प्राथमिक शाळेसमोर,
अप्पा बळवंत चौक, पुणे–४११ ००२.
९८२३१२१३९५/९५४५५६७८६२/६३
(०२०) २४४५३०६५
समग्र विज्ञान तंत्रज्ञान डॉ. प्रमोद जोगळेकर K'Sagar Publications
महाराष्ट्राचा सामाजिक-सांस्कृतिक इतिहास K'Sagar K'Sagar Publications
संपूर्ण पोलीस कॉन्स्टेबल भरती परीक्षा ७७वी आवृत्ती By-K'Sagar K'Sagar Publications
Success thy name is K'Sagar
मी लिहिलेलं पुस्तक वाच, कारण मी एमपीएस्सीत पहिला आलोय!
ठिकाय! पण पहिला येण्यासाठी तू कोणतं पुस्तक अभ्यासलं होतंस?
स्पर्धा परीक्षा भारताचा भूगोल वस्तुनिष्ठ प्रश्नोत्तरांसह डॉ. अनिरुद्ध
संपूर्ण सामान्य विज्ञान चर्चात्मक व वस्तुनिष्ठ स्वरूपात के'सागर
वर्ल्ड जिऑग्रफी विश्व भूगोल
सन १९८६ पासून प्रत्येक वर्षी पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्याने अन् आज अधिकारी असलेल्या प्रत्येकानं अभ्यासलंय के'सागर!
अधिकाऱ्यांच्या पिढ्यानुपिढ्या घडविणारे संदर्भ!
K'Sagar ज्याला पर्याय नाही!
K'Sagar आयोगाच्या वाढत्या काठिण्यपातळीनुसार अन् प्रश्नांच्या नव्या धर्तीनुसार रचना केलेले संदर्भ

**Yojana Marathi** (Monthly) **October 2016**

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No.G/NMD/137/2016-18

Published Date: 12th **October,** 2016
Date of Posting : 16th **October ,** 2016


# Opinion of some Successful Student MPSC 2015-16



अभिजीत नाईक
(एस.टी. प्रवर्गात प्रथम)
Dy. Collector

" माझ्या यशामध्ये माझ्या कुटूंबियांचा आणि सरांच्या सर्व पुस्तकांचा मोलाचा वाटा आहे. सरांनी घेतलेल्या मॉक इंटरव्हूव मुळे मला खुप फायदा झाला. सरांनी विचारलेले प्रश्न तसेच प्रश्न मला आयोगात विचारण्यात आले. "



उमाकांत पारधी
(राज्यात पाचवा) Dy. Collector

" माझ्यासारख्या कुठलाही क्लास करण्याची परिस्थिती नसलेल्या ग्रामीण भागातील मुलांसाठी कोळंबे सरांचे Economics, Indian Constitution ही पुस्तके म्हणजे One Stop Solution. महाराष्ट्रातला प्रत्येक विद्यार्थी हा सरांशी पुस्तक रुपाने जोडलेला असतो मग तो सरांचा विद्यार्थी असो वा नसो. "



स्नेहा उबाळे
Dy. Collector

When you want something all the universe conspires in helping you to achieve it.... and Ranjan Sir and his Bhagirath Academy provided the requisite universe for me.



संदिप मिटके Dy. SP.

" माझ्या यशाचे संपूर्ण श्रेय श्री. रंजन सर आणि माझ्या कुटुंबाला जाते. रंजन सरांच्या मार्गदर्शनाचा मला परीक्षेच्या Prelim, Main आणि Interview या तिन्ही टप्प्यावर खूप फायदा झाला. संवाद कसा साधायचा आणि कोणत्याही बाऊंसवर शांत कसे रहायचे हे सरांकडून शिकलो. त्यामुळेच मी Jack of everything, though master of none बनू शकलो. Thank you so much Sir.... "



अनुराधा गुरव Dy. SP.
(ओबीसी मुलींमध्ये प्रथम)

" मी फक्त कोळंबे सरांचीच विद्यार्थीनी आहे. Pre पासुन Interview पर्यंत रंजन सर हे असे एकमेव व्यक्तीमत्त्व आहे की, जे स्वतः UPSC, MPSC चे लेक्चर स्वतः घेतात. सोबत सेमीनार घेतात, दर्जेदार पुस्तके लिहितात इतके असुनही UPSC, MPSC चे मॉक इंटरव्हूव सुद्धा घेतात. रंजन सर हेच खरे आमचे प्रेरणास्त्रोत! त्यांनी रचलेल्या पायावरच आम्ही आमची यशाची इमारत उभी




धनंजय पाटील
Dy. SP.


" सरांच्या Teaching चा आणि सर्व पुस्तकांचा माझ्या यशामध्ये प्रचंड मोलाचा आहे. जवळ-जवळ सर्वच विषयांसाठी मी श्री. रंजन कोळंबे सरांचीच पुस्तके वाचली आहेत. सरांच्या Interview चा मला खुप फायदा झाला. One Man Army आहेत सर मी सरांचे आभार मानतो आणि भगीरथच्या पुढील वाटचालीस खुप शुभेच्छा... "


# UPSC | MPSC

श्री. रंजन कोळंबे सर लिखित
भगीरथ प्रकाशनाची
दर्जेदार पुस्तके...




सुधारीत १२ वी आवृत्ती नोव्हेंबर २०१६













सुधारीत २ री आवृत्ती ,फेब्रुवारी २०१७




**Bhagirath IAS Academy**
U P S C • M P S C

ऑफिस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०
ऑफिस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०
**Ph.: 020-64013450 | 9970298197 | 7378406920**
***Web :*** www.bhagirathacademy.com
***E-mail :*** bhagirathacademypune@gmail.com
***Facebook :*** Bhagirath IAS Academy


Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.